**(सभापतीस्थानी माननीय सभापती)**

**पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन**

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा पॉईन्ट ऑफ इन्फर्मेशन आहे. काल अकरावीच्या प्रवेशासंबंधी माननीय शिक्षणमंत्री निवेदन करणार होते ते झालेले नाही.

**सभापती** : सभागृहात निवेदन होईल.

--

**नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करण्यासंबंधीचा प्रस्ताव**

**सभापती** : आज माझ्याकडे सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, शरद पाटील, कपिल पाटील यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. हा विषय नियम 289 अन्वये कसा होतो, याबाबत सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात मांडावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यातील सेझसाठी जमीन संपादन करण्याचे काम आजही चालू आहे. या संबंधाने गेल्या अधिवेशनामध्ये सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी या कारणासाठी सुपीक ओलिताखालील 100 टक्के जमीन ॲक्वीझिशन करू देणार नाही अशाप्रकारचे आश्वासन दिलेले होते. परंतु असे आश्वासन दिलेले असतानाही रायगड जिल्ह्यातील जमिनी मोठ्याप्रमाणावर सेझसाठी ॲक्वायर करण्याचे काम चालू आहे. या संदर्भात तेथील लोकांनी वेगवेगळया माध्यमातूनस आंदोलने केली, धरणे धरली, मोर्चे काढले परंतु त्याचा काही उपयोग झ ााला नाही. म्हणून रायगड जिल्ह्यातील हजारो शेतकरी पेणच्या तहसील कचेरीवर आमरण उपोषणाला बसलेले आहेत. सन्माननीय आमदार श्री.विवेक पाटील, माननीय श्री.एन.डी.पाटील, माजी आमदार श्री.मोहन पाटील इत्यादि मंडळी पेण तहसील कचेरीसमोर आमरण उपोषणास बसलेले आहेत. यामुळे रायगड जिल्ह्यातील स्थानिक जनता भयग्रस्त झालेली आहे. तेव्हा सेझसाठी घेण्यात येत असलेल्या जमिनींच्या संदर्भात शासनाचे धोरण काय आहे, हे रायगड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कळावे म्हणून आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करून या विषयावर चर्चा घडवून आणावी, अशी माझी विनंती आहे.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/ MAP/

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी सेझसाठी घेण्यात येत असलेल्या जमिनीच्या संदर्भात विषय मांडला. महाराष्ट्रामध्ये हा प्रश्न गंभीर बनलेला आहे. विशेषत: रायगड जिल्ह्यामध्ये हा प्रश्न निर्माण झालेला आहे. सन्माननीय मुख्यमंत्री येथे उपस्थित आहेत. त्यांनी गेल्या अधिवेशनामध्ये आश्वासन दिलेले होते की, सेझसाठी जबरदस्तीने शेतकऱ्यांची जमीन घेतली जाणार नाही. शेतकऱ्यांशी वाटाघाटी करून, त्यांच्या इच्छेप्रमाणे योग्य ती किंमत देऊनच त्याबाबतीत पुढचे पाऊल उचलावे. या संदर्भाने मी सन्माननीय मुख्यमंत्र्यांनाही पत्र पाठविलेले आहे. मंत्री मंडळातील त्यांचे सहकारी मंत्री सन्माननीय श्री.नारायण राणे यांनी त्यांच्या विरोधामध्ये स्टेटमेंट केले. त्यांनी सेझसाठी जमिनी ताब्यात घेऊ, अशाप्रकारचे स्टेटमेंट केले. त्यामुळे माननीय मुख्यमंत्री आणि महसूल मंत्री महोदय याची स्टेटमेंटस् क्लॅश व्हावयास लागलेली आहेत. माननीय मुख्यमंत्री महोदयांनी त्यांच्या सहकारी मंत्री महोदयाना या संबंधत काय जाब विचारला हे त्यांना आणि सन्माननीय मंत्री श्री. नारायण राणे यांनाच माहीत. परंतु असे होणे योग्य नाही. कदाचित माननीय मुख्यमंत्री महोदयांचे ते प्रतिस्पर्धी असतील. कारण कालच्या माननीय मंत्री महोदयांच्या भाषणामध्ये ते टारगेटेड, टारगेटेड असा उल्लेख करीत होत, ते आमच्या लक्षात आले. परंतु आम्ही गप्प बसलो. कारण या संबंधाने जेव्हा युध्द होईल तेव्हा त्याबाबत आम्हाला हस्तक्षेप करता येईल. सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी शेतकऱ्यांच्या जमिनीच्या संबंधातील प्रश्न उपस्थित केला. खरोखरच ही ज्वलंत समस्या आहे. या समस्येच्या बाबतीत दोन्ही पक्षातर्फे चर्चा करणार आहोत, त्यावेळेस या बाबतची स्वतंत्र चर्चा केली जावी. सन्माननीय मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, या प्रश्नाच्या संदर्भात सदनाला विश्वासात घ्यावे. आज हजारो शेतकरी पेण तहसील कार्यालयासमोर मोर्चे घेऊन गेलेले आहेत, काही लोक प्राणांतिक उपोषणास बसलेले आहेत.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मधुकर सरपोतदार ...

त्यांच्यावर इतके भव्यदिव्य संकट येऊ नये ही जबाबदारी शेवटी मुख्यमंत्री म्हणून आपली आहे. आपण यासंदर्भात चर्चा घडवून आणू. यासंबंधी आम्ही आमचा प्रस्ताव देऊ. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांना विनंती आहे की, आपला प्रस्ताव आणि आमचा प्रस्ताव एकत्रित घेऊन त्यावर चर्चा करु.. सुर्दैवाने माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. यावर चर्चा होईपर्यंत शेतकऱ्यांना काय मेसेज द्यावयाचा आहे तो त्यांनी द्यावा नाही तर हा प्रस्ताव जरुर विचारात घ्यावा अशी मला आपल्याला विनंती करावयाची आहे.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा प्रश्न सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. गेली तीन चार महिने या प्रश्नासंबंधीची तीव्रता रायगड जिल्ह्यामध्ये आणि त्या परिसरामध्ये वाढत आहे. खरे म्हणजे कोणत्याही परिस्थितीत जबरदस्तीने शेतकऱ्यांच्या जमिनी घेतल्या जाणार नाहीत असे वक्तव्य माननीय मुख्यमंत्र्यांनी केलेले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी वक्तव्य केल्यानंतरही त्या ठिकाणी कार्यवाही सुरु आहे. माझी माहिती चुकीची नसेल तर केंद्र सरकारने सुध्दा असे जाहीर केले आहे की, कोणत्याही परिस्थितीत या जमिनी जबरदस्तीने न घेता शेतकऱ्यांच्या संमतीने घ्याव्यात. रायगड जिल्ह्यामध्ये सेक्शन 4, सेक्शन 5, सेक्शन 6 च्या नोटिसेस इश्यू झालेल्या आहेत आणि त्या ठिकाणी जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरु झाली आहे. त्या परिसरामध्ये प्रचंड असंतोष आहे. आज त्या ठिकाणी प्रचंड मोर्चाचे आयोजन केलेले आहे. लोक आमरण उपोषणाला बसणार आहेत. माननीय मुख्यमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही यासंबंधी सभागृहात विस्तृत चर्चा घडवून आणण्याचे ठरविले आहे. यासंबंधी आपल्या राज्याचे धोरण ठरले पाहिजे यादृष्टीने तो विचार आम्ही केलेला आहे. आज अधिवेशनाचा तिसरा दिवस असताना या प्रश्नाची तीव्रता अधिक वाढली आहे. म्हणून माझी माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती आहे की, राज्य सरकारचे जे धोरण आहे ते आज ताबडतोबीने या ठिकाणी जाहीर केले तर त्या ठिकाणचा असंतोष थांबण्यासाठी थोडीफार मदत होईल. या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नावर सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी प्रस्ताव दिलेला आहे. शेतकऱ्यांच्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर या ठिकाणी सरकारने आपले धोरण जाहीर करावे अशी मी या निमित्ताने विनंती करतो.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MAP/ SBT

प्रा. शरद पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी रायगड जिल्ह्यात पेण येथे आज सुरु असलेल्या बेमुदत उपोषणाच्या संदर्भात या ठिकाणी प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या विषयावर चर्चा घडवून आणावी अशी जी मागणी केलेली आहे त्याला मी पाठिंबा देतो. सदनामध्ये शासनामार्फत जी आश्वासने दिली जातात त्यापेक्षा वेगळ्या प्रकारच्या बातम्या वर्तमानपत्रामध्ये छापून येतात. प्रत्यक्षामध्ये शासकीय यंत्रणेमार्फत जमिनी संपादित करण्याची कार्यवाही सुरु केली जाते. त्यामुळे त्यासंबंधी शासनाचे निश्चित धोरण काय आहे ? शासनाने वेळोवेळी जाहीर केलेले आहे की, शेतकऱ्यांच्या इच्छेविरुध्द जमीन संपादित करणार नाही. त्या ठिकाणी धरणे आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांना आणि नेत्यांना आज या सदनाच्या माध्यमातून आपण निश्चित काय संदेश देणार आहात किंवा त्यासंबंधी आपले काय धोरण आहे याचा खुलासा व्हावयास पाहिजे किंवा त्यासंबंधीचे आश्वासन शासनाने या ठिकाणी द्यावे असे आवाहन मी या निमित्ताने करतो आणि आजचा प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन या प्रश्नासंबंधी चर्चा घडवून आणावी अशी मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करतो.

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी रायगड जिल्ह्यात एस.ई.झेड. साठी ज्या जमिनी सरकारच्या वतीने संपादित केल्या जातात आणि सरकारने जे आश्वासन दिलेले आहे त्यापासून सरकार दूर जात आहे, त्यामुळे या सदनामध्ये त्याची सविस्तर चर्चा व्हावी अशी विनंती आपल्याला केलेली आहे. सभापती महोदय, या विषयावर चर्चा करण्याला आमची काहीही हरकत नाही. आपण जेव्हा वेळ आणि दिवस ठरवाल त्या दिवशी सरकारचे यासंबंधीचे धोरण आपल्याला सांगता येईल. केंद्र सरकारने सुध्दा वारंवार हे धोरण जाहीर केलेले आहे की, एस.ई.झेड. साठी सरकारच्या वतीने कंपल्सरी संपादन केले जाणार नाही. परंतु जी जमीन एस.ई.झेड. साठी वापरावयाची आहे किंवा जी जमीन एस.ई.झेड. खाली आणावयाची आहे त्यासंबंधीचे जे मूळ नोटिफिकेशन आहे, कारण शेवटी शेतकऱ्यांशी वाटाघाटी करावयाच्या असतील तर कोठे जाऊन वाटाघाटी केल्या पाहिजेत, कोणती तरी जमीन घेऊन त्या ठिकाणी एस.ई.झेड. होऊ शकणार नाही.

यानंतर श्री. शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. विलासराव देशमुख...)

म्हणून प्रायमरी नोटिफिकेशन 4 आणि 6 या दोनच गोष्टी कराव्यात अशा स्पष्ट सूचना केन्द्र सरकारची जी कमिटी आहे, ग्रुप ऑफ मिनिस्टर्स, त्यांनी त्यासंबंधी निर्णय केला आहे आणि त्या प्रमाणे त्यांनी सरकारला कळविले आहे की, 6च्या पुढे सरकारने कोणतेही नोटिफिकेशन काढायचे नाही. 7 चे नोटिफिकेशन पास करावयाचे नाही आणि कम्पलसरी ताबा घ्यावयाचा नाही असे स्पष्ट आदेश आम्ही दिलेले आहेत. आमची कारवाई मर्यादित आहे. त्यानंतर त्यांनी वाटाघाटी कराव्यात, वाटाघाटी जमल्या नाहीत तर नोटिफिकेशन आपोआपच रद्द होईल. त्यामुळे सेक्शन 8, 9, आणि 10ची कोणतीही कारवाई करण्याचे कारण नाही. सरकारने ही जमीन संपादित केली अशा प्रकारची ऑर्डर सरकार काढणार नाही इतके स्पष्ट आदेश या संदर्भात काल देण्यात आलेले आहेत. त्यामुळे 6च्या पुढचे नोटिफिकेशन सरकार काढणार नाही हे मी स्पष्टपणे याठिकाणी सांगू इच्छितो. जर पुढचे निगोशिएशन, पॅकेज, किंमत मान्य झाली नाही तर आपोआप नोटिफिकेशन रद्द होईल.

श्री. जयंत प्र. पाटील : शेतकरी आमरण उपोषणाला बसलेले आहेत. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले आहे. परंतु जिल्हाधिकारी वेगळेच बोलतात..

श्री. विलासराव देशमुख : जिल्हाधिका-यांचे ऐकायचे की मुख्यमंत्र्यांचे ऐकायचे हा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. ...प्रश्न असा आहे की, जेव्हा राज्याचा प्रमुख वरिष्ठ सभागृहामध्ये भूमिका मांडतो त्यावेळी पुढे चर्चा करण्याचे कारण नाही असे मला वाटते. शासनाच्या वतीने माझी भूमिका मी स्पष्ट केलेली आहे. त्या ठिकाणी जे काही आंदोलन सुरु आहे ते सन्माननीय सदस्य जयंत प्र. पाटील हेच मागे घेऊ शकतात.

**सभापती** : याठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील यांनी नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. आजच्या कामकाजपत्रिकेवर या विषयाच्या अनुषंगाने कोणताही विषय नाही. तेव्हा तांत्रिकदृष्ट्या प्रस्तुत प्रस्ताव स्वीकारता येणार नाही. सन्माननीय सदस्य श्री. जयंत प्र. पाटील, सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील, सन्माननीय सदस्य श्री. मधुकर सरपोतदार, सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय मुख्यमंत्री यांनी या ठिकाणी आपले विचार व्यक्त केले. हा शेतक-यांच्या अत्यंत जिव्हाळ्याचा आणि हिताचा प्रश्न आहे. या

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती...)

प्रश्नावर चर्चा करण्याची शासनाची तयारी आहे. म्हणून या प्रश्नावर नियम 97 खाली मी जरुर चर्चा मान्य करीन. विरोधी आणि सत्ताधारी पक्षाला विचारुन या चर्चेची वेळ ठरविण्यात येईल व त्यानंतर ही चर्चा होईल. आता प्रश्नोत्तरे घेण्यात येतील.

-----

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तोंडी उत्तरे

**विक्रोळी लिंकरोडच्या कामामुळे विस्थापित झालेल्या कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(१) * २९२८२ श्री. विनोद तावडे , श्री. संजय केळकर , श्री. रामनाथ मोते , श्री. मधुकर चव्हाण : तारांकित प्रश्न क्रमांक २६९५२ ला दिनांक ४ एप्रिल, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :**
सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहे डिसेंबर, २००५ मध्ये एम.यू.टी.पी. अंतर्गत जोगेश्वरी-विक्रोळी लिंकरोडच्या कामामुळे विस्थापित झालेल्या कुटुंबाचे पुनर्वसन मजासवाडी येथे करण्याचे काम पूर्ण झाले त्यामध्ये सुरेश तिवारी, या एकाच व्यक्तीला ३३ सदनिका देणे अन्य कारभाराबाबत निवृत्त आय.ए.एस. अधिकारी श्री.के.सी. श्रीवास्तव, सेवानिवृत्त महानगरपालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र सनियंत्रण समितीमार्फत चौकशी करण्याचा निर्णय घेतला असून, चौकशीचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चौकशीचे काम पूर्ण झाले आहे काय,
(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार दोषी असलेल्यांविरुध्द कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा येत आहे,
(४) अद्याप चौकशी पूर्ण झाली नसल्यास वा कार्यवाही केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) होय.
(२) व (३) श्री.के.सी.श्रीवास्तव, सेवानिवृत्त महापालिका आयुक्त, यांच्या अध्यक्षतेखालील स्वतंत्र संनियंत्रण समितीमार्फत चौकशीचे काम पूर्ण झाले असून चौकशीअंती असे आढळून आले की, एकाच व्यक्तीला ३३ सदनिका देण्यात आलेल्या नाहीत. त्यामुळे संबंधिताविरुध्द कारवाई करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विनोद तावडे : सेवानिवृत्त महापालिका आयुक्तांच्या मार्फत या प्रकरणाची चौकशी करण्यात आली. ३३ सदनिका दिल्या गेल्या नाहीत, सदनिका कमी दिल्या किंवा एकाच व्यक्तीला अधिक दिल्याचे प्रकार चौकशीमध्ये आढळून आलेले आहेत काय ? माजी महापालिका आयुक्तांनी अहवाल सादर केला असेल तर तो पटलावर ठेवण्यात येईल काय ?

श्री. राजेश टोपे : श्री. श्रीवास्तव यांच्या अध्यक्षतेखाली इण्डिपेण्डण्ट मॉनिटरिंग कमिटी स्थापन करण्यात आली होती. त्यांनी जीबीएलआर रोडच्या एकूण 1067 पीएपीज बाबत डेस्क रिव्ह्यू कमिटी नेमली होती. त्या कमिटीने चौकशी केली. श्री. तिवारी यांच्या संदर्भात प्रश्न

...4..

विचारलेला आहे. जे भोगवटादार असतात त्यांना घरे दिली जातात. तिवारी नावाची 33 लोकांची चाळ होती. त्यामुळे त्यांना एका पेक्षा अधिक जागा दिली गेली नाही. वेगळया भोगवटदारांना निश्चितपणे जागा दिली आहे.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ SBT/ MAP/ प्रथम श्री.शिगम एम. ........ 12:15

ता.प्र.क्र.29282........

डॉ.दिपक सावंत : अध्यक्ष महाराज, माझा प्रश्न अतिशय सरळ आणि साधा आहे. माननीय मंत्री महोदयांनी सांगावे की, आपण एकंदर पी.ए.पी देता त्या वेळी कोणते निकष लावले जातात ? आणि साधारणपणे आज मुंबईमध्ये किती पी.ए.पी.देणे बाकी आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, या ठिकाणी पी.ए.पी.च्या दृष्टीकोनातून जो सर्व्हे चालू आहे,त्यामध्ये जो राहणारा भोगवटदार आहे त्याला आपण ज्यावेळी पी.ए.पी.देत असतांना पुढीलप्रमाणे निकष लावतो. एम.यु.टी.पी.मध्ये बेसलाईन सोशो - इकॉनॉमिक सर्व्हे ज्या तारखेला झाला असेल त्या तारखेपासूनचे जे भोगवटदार असतील त्यांना आपण या यादीमध्ये समाविष्ट करीत असतो आणि आतापर्यंत एम.यु.टी.पी.च्या माध्यमातून एकूण पी.ए.पी.19,928 ठरविण्यात आल्या व त्यातील एलिजिबल पी.ए.पी.आहेत एकूण 17,902 आणि शिफ्टेड पी.ए.पी.आहेत 16,931 बॅलेन्स्ड पी.ए.पी. 971 एवढया आहेत.

श्री.दिवाकर रावते : के.सी.श्रीवास्तव,सेवानिवृत्त महापालिका आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली जी स्वतंत्र सनियंत्रण समिती यासंदर्भात नेमण्यात आली होती, त्या समितीची चौकशी पूर्ण होऊन असे उत्तर आले की, एकाच व्यक्तीला 33 सदनिका देण्यात आलेल्या नाहीत, परंतु एकापेक्षा जास्त सदनिका कोणाला दिलेल्या आहेत का ? याचे उत्तर मात्र या चौकशी अहवालामध्ये दिलेले नाही. यामध्ये कोणालाही एकापेक्षा जास्त सदनिका वितरीत करण्यात आलेल्या आहेत का ?

श्री.राजेश टोपे : यामध्ये कोणालाही एकापेक्षा जास्त सदनिका वितरीत करण्यात आलेल्या नाहीत.

श्री.दिवाकर रावते : ठीक आहे, यासंदर्भातील चौकशी अहवाल पटलावर ठेवण्यात यावा.

श्री.राजेश टोपे : ठीक आहे, यासंदर्भातील चौकशी अहवाल तसेच, इतर माहिती देखील मी पटलावर ठेवतो.

-----------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

D - 2

**लातूर व नांदेड शहरालगतच्या अविकसित भागाचा विकास करण्यासाठी सिडकोतर्फे करण्यात येत असलेली कार्यवाही**

**(२) * ३१९८३ श्री. वसंतराव चव्हाण , श्री. जितेंद्र आव्हाड :दिनांक १७ एप्रिल, २००७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या आठव्या यादीतील प्रश्न क्रमांक २२५०७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर व नांदेड शहरालगतच्या अविकसित भागाचा विकास करण्यासाठी सिडकोतर्फे सुरु असलेले सर्व्हेक्षण पूर्ण झाले आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्नी करण्यात येत असलेली कार्यवाही पूर्ण झालेली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) व (२) लातूर शहरालगतच्या झालर क्षेत्राचे प्राथमिक सर्व्हेक्षणाचे काम सिडकोमार्फत सुरु असून नांदेड येथे सिडकोमार्फत पूर्वीपासून सुरु असलेल्या पकल्पाचा विस्तार करता येईल काय याची सिडकोमार्फत पाहणी करण्यात आली आहे. सिडकोकडून नकाशांसह सविस्तर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त दोन्ही शहरांच्या झालर क्षेत्राकरिता सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्तीचा प्रस्ताव कार्यान्वित करण्यात येईल.

(३) वरील प्रमाणे कार्यवाही सुरु असल्याने विलंब झालेला नाही.

श्री.वसंत चव्हाण : अध्यक्ष महोदय, उपरोक्त प्रश्नाच्या छापील उत्तरामध्ये थोडया त्रूटी दिसून येत आहेत. लातूर आणि नांदेड शहरालगतच्या झालर क्षेत्राचे प्राथमिक सर्व्हेक्षणाचे काम सिडकोमार्फत सुरु आहे असे नमूद केलेले आहे, परंतु हे सर्व्हेक्षणाचे काम किती दिवसात पूर्ण होणार आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, लातूर आणि नांदेड या दोन शहरांचा हा विषय आहे. लातूरच्या सर्व्हेक्षणाचे काम पूर्ण होईल आणि सिडकोने यासंदर्भातील प्लॅन डेव्हलप करुन आणि पूर्ण सर्व्हेक्षण करुन हा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीकरिता पाठविलेला आहे यावर शासन यावर लवकरात लवकर कार्यवाही करणार आहे आणि माननीय मुख्यमंत्र्यांचे देखील त्यामध्ये लातूरच्या दृष्टीकोनातून लक्ष आहे. नांदेडच्या संदर्भात जे प्रश्न असतील, त्याच्या सर्व्हेक्षणाचे काम सिडकोने पूर्ण करुन पाठविला आहे, यामध्ये एकूण २०,००० हेक्टर जमिनीचा हा प्रस्ताव आहे. सिडकोकडून नांदेडच्या संदर्भातील प्रस्ताव देखील पाठविण्यात आला आहे,शासनाकडून हे काम देखील दिनांक ३० जुलै,२००७ नंतर केले जाईल.

श्री.श्रीकांत जोशी : या दोन्ही शहरांची अडचण अशी आहे की, ग्रामीण भागांमध्ये

D - ३





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.३१९८३.......

श्री.श्रीकांत जोशी.......

हजारोंच्या संख्येने घरे बांधली जातात. नांदेड जिल्हयामध्ये तरवडा भागामध्ये घरे मोठया प्रमाणात बांधण्यात आलेली आहेत, परंतु तेथे सिडकोमार्फत आवश्यक ते बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर देण्यात आलेले नाही. या शहरालगत बांधण्यात आलेल्या किंवा येणा-या घरांना बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर पुरविण्याचा उल्लेख या प्रस्तावामध्ये केलेला आहे का ? ग्रामपंचायतीकडे पैसे नसल्यामुळे ते या घरांना मुलभूत सुविधा देऊ शकत नाहीत, याबाबत सिडकोला आपण योग्य त्या सुचना दिलेल्या आहेत का ?

श्री.राजेश टोपे : सिडको दोन पध्दतीने टाऊन डेव्हलपमेंट करते. पहिली पध्दत म्हणजे न्यू टाऊन डेव्हलपमेंट ऑथॉरिटी आणि दुसरी म्हणजे स्पेशल प्लॅनिंग ऑथॉरिटी. यामध्ये एन.टी.डी.ए. या पध्दतीनुसार सिडकोने फक्त नवी मुंबई आणि पिंपरी चिंचवड हा भाग विकसित केलेला आहे, बाकी सर्व ठिकाणी एस.पी.ए.म्हणून भूमिका निभावलेली आहे. नवी मुंबई हा भाग विकसित करतांना संपूर्ण जमीन संपादित करुन आणि त्यानंतर ती जागा पूर्णपणे प्लॅन करुन डेव्हलप केलेली आहे. ज्याठिकाणी विकास करण्याकरिता जमीन संपादन करण्याची गरज आहे त्या ठिकाणी सिडको जमीन संपादित करुनच तो भाग विकसित करु शकते आणि बाकीच्या ठिकाणी रेग्यूलेटिंग टोटल प्लॅन या पध्दतीने सिडको काम करते. आज ग्रामीण भागामध्ये मुलभूत सुविधा नसतील तर त्या संदर्भात योग्य तो डेव्हलपमेंट प्लॅन तयार करण्याचे काम सिडकोकडून केले जाईल आणि त्या पध्दतीने विकास केला जाईल.

यानंतर श्री.बी.टी.देशमुख......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31983 पुढे सुरु...

प्रा. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, नियोजनाच्या अभावी विशेषत: जिल्हयाच्या आणि तालुक्याच्या ठिकाणी वाट्टेल तसा विकास केला जातो त्याकडे सुध्दा लक्ष देण्याची आवश्यकता आहे. मूळ प्रश्न विचारला होता त्याचे उत्तर आलेले नाही. विकासाचा कार्यक्रम राबविण्याकरिता निश्चित वेळापत्रक ठरविण्यात आलेले आहे काय ? त्याचप्रमाणे या दोन जिल्हयांप्रमाणेच या भागाशी संबंधित जालना हा अतिशय मागासलेला जिल्हा आहे. दरडोई उत्पन्नाच्या बाबतीत मानव विकास अहवालात याची नोंद आहे. या दोन जिल्हयांच्या विकास कार्यक्रमाप्रमाणेच जालना जिल्हयाचा देखील या विकास कार्यक्रमात समावेश करता येईल काय ? याबाबतीत काही अडचण नसेल तर जालना जिल्हयाचा देखील निश्चितपणाने विकास कार्यक्रमात समावेश करावा.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, विकास कार्यक्रमात निश्चितपणाने जालना जिल्हयाचा समावेश करता येईल.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, जालना का समावेश करने की बात हो रही है. क्या मंत्री महोदय इस विकास कार्यक्रम में परभणी का भी समावेश करेंगे ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, शक्यतो जे अविकसित जिल्हे असतील त्यांचा विकास सिडकोतर्फे नियोजन करुन करीत आहोत. परभणी जिल्हयाच्या बाबतीत योग्य प्रस्ताव असेल तर त्या अनुषंगाने विचार करुन निश्चित निर्णय घेतला जाईल.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी उत्तर देताना अत्यंत महत्वाची गोष्ट निदर्शनास आणून दिली. लातूरच्या झालर क्षेत्राचा विकास करण्याकरिता सिडकोच्या माध्यमातून मुख्यमंत्री स्वत: लक्ष घालीत आहेत. नांदेड जिल्हयाच्या विकासाकडे कोण लक्ष घालत आहे ? त्या ठिकाणी आमदारांनी लक्ष घालून प्रस्ताव सादर केला तर स्वीकारणार काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री हे राज्याचे प्रमुख आहेत आणि ते सर्व राज्याच्या विकासाकडे लक्ष घालीत आहेत. लातूर, नांदेड, जालना या जिल्हयांच्या विकासाकडे लक्ष घालीत आहेत.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, जिल्हयांच्या विकासासाठी सर्वेक्षणाचे काम सुरु झालेले आहे. माझ्यासमोर समस्या आहे ती निराळी आहे. लातूर शहराच्या जोडीला नांदेड या शहरालगच्या भागाचा विकास करण्याचे एक चांगले धोरण शासनाने स्वीकारले आहे. त्यादृष्टीने

.....2

ता.प्र.क्र. 31983 पुढे सुरु...

श्री. मधुकर सरपोतदार...

सर्वेक्षण देखील सुरु केले आहे. या दोन शहरांच्या बाहेरील काही खेडयांचा यामध्ये समावेश केला जाईल काय ? यामध्ये किती कि.मी.जागा अंतर्भूत होणार आहे ? याविकासामधून किती लोकवस्तीवर परिणाम होणार आहे ? यासंदर्भात काही निश्चित माहिती उपलब्ध असल्यास ती सभागृहात शासनाने सांगावी.

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, लातूर आणि नांदेड यातील बरीचशी गावे यामध्ये आहेत. सविस्तर माहिती मी पटलावर ठेवीन. लातूर शहराच्या बाबतीत 25000 हेक्टरचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. त्यापैकी 16500 हेक्टर अर्बनायझेशन एरिया आहे. त्यापैकी 11000 हेक्टर जमीन संपादित करुन विकसित केली जाणार आहे आणि 14500 हेक्टर जमिनीच्या बाबतीत सिडकोच्या वतीने रेग्युलेटरची भूमिका घेण्यात येईल.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, सगळया शहरांचीच ही समस्या आहे. अर्बनायझेशन अतिशय फास्ट होत आहे. ग्रीन बेल्ट विकसित होत आहे. परंतु ड्रेनेज सिस्टीम, पिण्याचे पाणी, रस्ते यासाठी अविकसित भागांना विकसित करण्याकरिता शासनाकडून पैसा देण्यात येत आहे. एकवेळ अशी स्थिती होती की, 75 टक्के ग्रामीण भाग आणि 25 टक्के शहरी भाग पण आता राज्यात पुढील एक-दोन वर्षात 50 टक्के ग्रामीण आणि 50 टक्के शहरी असा रेषो होणार आहे. केवळ नांदेड आणि लातूरच नाही तर महानगरपालिका क्षेत्रानंतर जिल्हा स्तरावर डेन्सीटी वाढणार आहे. त्याअनुषंगाने विचार करुन राज्य शासन काही निश्चित धोरण तयार करणार आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी चांगली सूचना मांडली आहे. निश्चितप्रकारे याबाबतीत शासनाकडून विचार केला जाईल.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ MAP/ SBT/ 12:25

ता.प्र.क्र.31983...............

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, मी जाणीवपूर्वक प्रश्न विचारला होता, त्याचे उत्तर शासनाकडून आलेले नाही. सभापती महोदय, सांगताना सुध्दा संकोच वाटतो, हे जिल्हे पिण्याच्या पाण्याच्या सुविधेबाबत राज्य सरासरीच्या खाली आहेत. शौचालयांच्या बाबतीत सुध्दा राज्य सरासरीच्या खाली आहेत. दुसऱ्या क्रमांकावर प्रश्न चर्चेला येऊनही या जिल्हयांचे वेळापत्रक कळत नसेल तर ते योग्य नाही. मागासलेल्या जिल्हयांबाबत आम्ही नंतर प्रश्न विचारु शकतो. माझा प्रश्न असा आहे की, सिडकोकडून पाहणी करण्यात आली आहे. या दोन शहरांबाबत सिडकोची विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून नियुक्ती करुन प्रस्ताव कार्यान्वित करण्यात येईल. परंतु याचे वेळापत्रक ठरविणार आहात का? दुसऱ्या क्रमांकावर प्रश्न चर्चेला येऊनही दोन्ही जिल्हयांचे वेळापत्रक कळत नसेल तर या आधारावर प्रश्न लावावयाचे की नाही? शासन वेळापत्रक सांगू शकेल काय?

श्री.राजेश टोपे : लातूरच्या संदर्भात शासनाकडे प्रस्ताव आलेला आहे. याचा अर्थ एका महिन्यात निश्चितप्रकारे या प्रस्तावाला मंजुरी दिली जाईल. त्यानंतर सिडकोला एकूण त्या भागाचा विकास आराखडा तयार करावयाचा असतो त्यासाठी वैधानिक कार्यवाही पूर्ण करावी लागते. त्यासाठी समिती स्थापन करावी लागते. सूचना व हरकती मागवाव्या लागतात. ही सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करण्यास सुमारे एक ते दोन वर्षे इतका कालावधी लागणार आहे. त्यामुळे लातूरचा विकास आराखडा तयार करण्यास आज शासनाने मंजुरी दिली तरी पूर्ण होण्यास दोन वर्षे लागतील. दि.30 जुलै, 2007 पर्यंत सिडकोकडून नांदेड शहराबाबत सर्वेक्षण अहवाल सादर केला जाईल. लातूर शहराच्या पध्दतीने नांदेड शहराचा प्रस्ताव लवकरच पाठविला जाईल.

-----------------

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>ता.प्र.क्र.29285 संबंधी</u>

**सभापती** : आजच्या यादीतील ता.प्र.क्र.29285 हा मी रिड्राफ्ट करावयाचे ठरविले आहे. त्यामुळे हा प्रश्न आज चर्चेला घेण्याऐवजी दिनांक 25 जुलै, 2007 रोजी प्राथम्याने चर्चेला घेण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न रिड्राफ्ट करावयाचे आपण ठरविले आहे. परंतु अशा पध्दतीने सन्माननीय सदस्यांनी दिलेला मूळ प्रश्न विधिमंडळ सचिवालयाच्या प्रश्न शाखेकडून बदलला जात असेल तर ही बाब गंभीर आहे. याची चौकशी झाली पाहिजे. सदस्यांनी मूळ प्रश्न दिलेला होता, त्याचे पूर्ण स्वरुप बदलण्यात आले आहे. विधिमंडळ सचिवालयाच्या प्रश्न शाखेकडून अनेक प्रश्नांचे स्वरुप बदलले जाते. प्रामुख्याने भ्रष्टाचाराच्या प्रश्नांचे स्वरुप बदलले जाते. याची गंभीरपणे चौकशी झाली पाहिजे. जे कोणी असे प्रकार करीत असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे.

**सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी सांगू इच्छितो की, अतारांकित प्रश्न क्र.18532 वर आधारित हा तारांकित प्रश्न विचारण्यात आला होता. माझ्याकडे 16 तारखेला तक्रार आली, हा ड्राफ्ट झालेला प्रश्न आहे. मूळ दिलेला तारांकित प्रश्न आणि अतारांकित प्रश्न याच्या स्वरुपामध्ये फरक आहे. त्यावेळी मी निर्णय घेतला. आपण म्हटल्याप्रमाणे या संदर्भात पूर्ण छाननी मी करुन घेईन. यामध्ये जर कोणी दोषी असतील तर त्यांच्यावर योग्य ती कारवाई होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने जरुर लक्ष घातले जाईल. दिनांक 25 जुलै, 2007 रोजी हा प्रश्न प्राधान्याने चर्चेला घेण्यात येईल.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे महानगरपालिकेशी करार झालेल्या कौशल्य**
**मेडीकल फाऊंडेशन मध्ये होत असलेला गैरव्यवहार**

**(४) * ३०४४३ श्री. शरद रणपिसे , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्रीमती सुधा जोशी , श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे महानगरपालिकेशी ९९ वर्षाचा करार करुन चालविण्यात येत असलेल्या कौशल्य मेडिकल फांऊडेशनचा गैरव्यवहार लक्षात घेऊन सदर रुग्णालयावर कारवाई करुन हा ठराव रद्द करण्याची मागणी तेथील काँग्रेस प्रतोद श्री.नारायण पवार यांनी ठाणे महानगरपालिकेच्या महासभेत माहे एप्रिल, २००७ मध्ये केलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) या रुग्णालयातून गरीब व सर्वसामान्य जनतेला माफक दरात रुग्णालयातील सुविधा मिळतील असे सांगण्यात आले परंतू सदर रुग्णालयात येणाऱ्या सरसकट रुग्णांकडून मोठ्या प्रमाणात पैसे उकळण्यात येत असल्याचे आढळून आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने वरील प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात त्यांना काय आढळून आले व पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, उक्त प्रकरणी चौकशी केली नसल्यास त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) होय,

(२) कौशल्य मेडिकल फौंडेशन या संस्थेबरोबर ठाणे महानगरपालिकेने केलेल्या करारनाम्यात गरीब व सर्वसामान्य जनतेला माफक दरात सुविधा पुरविण्याबाबतची अट समाविष्ट नाही. तथापि सदर रुग्णालयाकडून काही रुग्णांना मोफत व सवलतीच्या दरात आरोग्य सेवा पुरविण्यात आल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे,

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या प्रश्नाच्या माध्यमातून एक फार महत्वाचा धोरणात्मक प्रश्न उपस्थित करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. शासनाकडून सोयी-सवलती घेतल्या जातात, मात्र गोरगरिबांना त्याचा फायदा दिला जात नाही. या संदर्भात कौशल्य मेडिकल फाऊंडेशन या संस्थेसोबत ठाणे महानगरपालिकेने केलेल्या करारनाम्यात गरीब आणि सर्वसामान्य जनतेला माफक दरात सुविधा पुरविण्याबाबतची अट का समाविष्ट करण्यात आली नाही? ठाणे महानगरपालिकेच्या महासभेमध्ये लोकप्रतिनिधींनी तक्रार करुनही, चर्चा करुनही याची दखल शासनाने घेतली नाही आणि उत्तरामध्ये मात्र म्हटले आहे की, सोयी-सुविधा पुरविल्या जातात.

(नंतर श्री.जुन्नरे.....

अस्थापित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 30443 पुढे सुरु.......**

श्री. संजय दत्त ....

कुठल्याही प्रकारे सोयी सवलती दिल्या जात नाहीत त्यामुळे यासंदर्भातील सविस्तर माहिती माननीय मंत्री महोदय देतील काय? तसेच मी जो पहिला प्रश्न विचारला होता त्याप्रमाणे ती अट समाविष्ट करण्यात येईल काय?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, ठाणे महामहानगरपालिकेने 1990 मध्ये भूखंड डिस्पेनसरीसाठी कौशल्य मेडिकल फाऊन्डेशनला विकसित करण्यासाठी दिला होता. कौशल्य मेडिकल फौन्डेशन या संस्थेबरोबर ठाणे महानगरपालिकेने केलेल्या करारनाम्यात गरीब व सर्वसामान्य जनतेला माफक दरात सुविधा पुरवण्याबाबतची अट समाविष्ट केली नव्हती हे उत्तरात सुध्दा सांगण्यात आलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांना मी सांगू इच्छितो की, गरीब जनतेला माफक दरात सुविधा पुरविण्याबाबतचा विषय अत्यंत महत्वाचा असल्यामुळे, सार्वजनिक हिताचा असल्यामुळे ही बाब लक्षात घेता बीपीटी ॲक्टखाली अशा प्रकारे ज्या संस्था रजिस्टर्ड असतात त्यांना अशा अटी घातल्या जातात. या रुग्णालयामध्ये गरीब जनतेला सवलतीच्या दराने उपचार देण्यात यावे असे म्हटले आहे. बीपीटी ॲक्ट 41 AA(B) च्या अनुषंगाने राज्यशासन निश्चित असे आदेश देईल. अशा प्रकारचे आदेश नसले तरी निदेश देऊन निश्चित प्रकारे सूचना दिल्या जातील. या सूचनांच्या अनुषंगाने विचार करावा अशा सूचना महानगरपालिकेला देण्यात येतील. तसेच उत्तरामध्ये म्हटले आहे की, सदर रुग्णालयाकडून काही रुग्णांना मोफत व सवलतीच्या दरात आरोग्य सेवा पुरवण्यात आल्याचे ठाणे महानगरपालिकेने कळविले आहे. इनपेशंट डिपार्टमेंट अंतर्गत सवलतीच्या दराने 7 ते 8 टक्क्यापर्यंत सेवा दिली जाते. ही जी आकडेवारी आहे ती मागील चार-पाच वर्षापूर्वीची आहे. आयपीडीमध्ये मोफत दराने ट्रिटमेंट दिल्याचे रेकॉर्ड उपलब्ध आहे. तसेच ओपीडीमध्ये 10 टक्के कमी दराने सेवा उपलब्ध करुन दिली जाते. त्यामुळे बीपीटी ॲक्टच्या प्रोव्हीजन प्रमाणे नगरविकास विभागाकडून अशा प्रकारच्या सूचना देण्यात येतील.

श्री. सुधा जोशी : सभापती महोदय, जसलोक, ब्रीच कॅन्डी तसेच लीलावती अशा प्रकारची मोठमोठी हॉस्पीटल्स शासनाकडून कमी दराने तसेच सवलतीच्या दराने जमिनी घेतात तसेच वीज

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. 30443 पुढे सुरु.......**

श्रीमती सुधा जोशी .....

पाणी आणि टॅक्स मध्येही भरपूर सवलती शासनाकडून घेत असतात. तरी सुध्दा ही रुग्णालये गोरगरिबांना कोठल्याही प्रकारे मदत करीत नाहीत किंवा गरिबांवर उपचार व्यवस्थितपणे करीत नाहीत. 10 टक्के खाटा हया गरींबाना दिल्या पाहिजेत असा नियम असतांना सुध्दा त्या दिल्या जात नाही त्यामुळे अशा पध्दतीने जी रुग्णालये कामे करतात त्यांच्यावर शासनाने आतापर्यंत कोणती कारवाई केलेली आहे किंवा करीत आहे? त्याच बरोबर कौशल्या फौन्डेशनला ठाणे महानगरपालिकेने कायद्याप्रमाणे 30 वर्षाचा करार करावयास पाहिजे परंतु ठाणे महानगरपालिकेने कौशल्य फौन्डेशन बरोबर 99 वर्षाचा करार का केलेला आहे? यासंदर्भात ठाणे महानगरपालिकेच्या महापौरांनी सांगितले आहे की, यासंदर्भात चौकशी करण्यात येईल त्यामुळे आतापर्यंत कोणत्या प्रकारची चौकशी करुन कोणती कारवाई करण्यात आलेली आहे? सभापती महोदय,..

**सभापती** : सन्माननीय सदस्यांनी चार-पाच प्रश्न न विचारता एक दोन प्रश्न विचारावेत.

श्री. दिवाकर रावते : आरोग्या संदर्भात आमदार म्हणून सन्माननीय सदस्य प्रश्न विचारीत असतात. परंतु या प्रश्नाच्या संदर्भात मला सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई यांना विचारावयाचे आहे की, आमदार म्हणून आपण काही जे. जे. रुग्णालयात जाऊन उपचार करीत नाही तर आपण मोठया रुग्णालयामध्ये जाऊन उपचार घेत असतो व लाखो रुपयाचे बील सादर करीत असतो.

यानंतर श्री. अजित.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र..30443.....
श्री.दिवाकर रावते..........

सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी गरीब रुग्णाला रुग्णालयात घेऊन गेल्या आणि ट्रीटमेंट नाकारली असे उदाहरण सांगावे. सन्माननीय सदस्या फक्त बोलत आहेत, त्यांनी एखाद्या रुग्णाचे नाव सांगावे.

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, याठिकाणी फक्त बोलण्याचा प्रश्न नाही. आम्हाला जनतेकडून जी माहिती मिळते त्यावरुन मी हे सांगत आहे. मी प्रत्यक्ष रुग्णास रुग्णालयात न्यावे असा प्रश्न नाही. आम्हाला जनतेकडून मिळालेल्या फीडबॅकवरुन आम्ही प्रश्न विचारु शकतो. मी सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांना विचारु इच्छिते की, त्यांनी आतापर्यंत कोणत्या झोपडपट्टीतील रुग्णांना रुग्णालयात घेऊन गेले ?

सभापती महोदय, मी मूळ प्रश्नाकडे येते. गोरगरिबांना मोफत व सवलतीच्या दरात औषधोपचार करण्याची अट घातलेली नाही. तेव्हा करारामध्ये नेमक्या कोणत्या अटी घातलेल्या आहेत ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती सुधा जोशी यांनी जे विवेचन केले त्यातील मला तीन मुद्दे प्रश्नाच्या स्वरुपात समजलेले आहेत. बीएमसी ॲक्टमधील तरतुदीनुसार भूखंड विकसित करण्यासाठी तो भाडे तत्वावर देऊ शकतो. त्या तरतुदीप्रमाणे या सर्व बाबी झालेल्या आहेत आणि 1990 मध्ये शासनाने परवानगी दिलेली आहे. त्यामुळे हा भूखंड मोफत दिलेला नाही. बाजारमूल्य 50 टक्के समजून त्याच्या 13 टक्के भाडे असावे अशी सर्वसाधारण अट आहे. 99 वर्षासाठी हा भूखंड भाडे तत्वावर दिला असला तरी 30 वर्षांनी सुधारित अट घालण्याची तरतूद आहे. यामध्ये मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त आरबिट्रेटर आहेत. जर अटी आणि शर्तीचा भंग झाला तर त्या रुग्णालयावर आयुक्त कारवाई करु शकतात. मी मधाशी सांगितल्याप्रमाणे गरीब रुग्णावर मोफत आणि सवलतीच्या दरात औषधोपचार करण्याची अट नसली तरी अशा रुग्णांवर औषधोपचार करण्याच्या सूचना देण्यात येतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र..30443.....

श्री.अरुण गुजराथी : सभापती महोदय, केवळ अटी टाकून हा प्रश्न सुटणार नाही. बीएमसी, बीपीएमसी आणि एनएमसी या तीन कायद्यांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता आहे त्याबाबत शासन विचार करणार आहे काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, प्रश्नात नमूद करण्यात आले आहे की, कौशल्य मेडिकल फाऊन्डेशनचा गैरव्यवहार लक्षात घेऊन कारवाई करावी. तेव्हा नेमका गैरव्यवहार काय होता ? त्याबाबत शासनाने कोणती कारवाई केलेली आहे ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न उपस्थित केलेला आहे. बीपीटी ॲक्टच्या माध्यमातून शासनाकडून निर्देश दिले जातील असे मी सुरुवातीला उत्तर देताना सांगितले. बीपीएमसी कायद्यातील तरतुदीनुसार रुग्णालयांना भाड्याने जमिनी देत असताना अशाप्रकारच्या अटींचा समावेश करावा अशा सूचना नगर विकास विभागामार्फत देण्यात येतील. गरज पडल्यास कायद्यामध्ये आवश्यक तो बदल केला जाईल. याठिकाणी कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार झालेला नाही. येथे फक्त गरिबांना मोफत व सवलतीच्या दरात औषधोपचार करण्याचा विषय होता. गरीब व गरजू रुग्णांवर मोफत व सवलतीच्या दरात इलाज करण्याबाबत सूचना दिल्या जातील.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ SBT/ MAP/ पूर्वी श्री.अजित... 12:40

ता.प्र.क्र.30443.....

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, कौशल्य मेडिकल फौंडेशन या संस्थेने अतिशय कौशल्याने स्वत:चे राजकीय लागेबांधे वापरुन सर्व अटी व शर्तींचा, नियमांचा भंग करुन हे सर्व काम केलेले आहे. मीही त्याचा साक्षीदार आहे. याबाबतीत मी तक्रारही केलेली आहे. याबाबतीत मी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मागविली असता, महापालिकेने मला सांगितले की, यासंबंधीची ओरिजनल फाईल हरवलेली आहे. आपण याठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, "सर्वसामान्य जनतेला माफक दरात सुविधा पुरविण्याबाबतची अट समाविष्ट नाही." मग, हे ॲग्रीमेंट कोणी केले ? ज्यांनी कोणी हे ॲग्रीमेंट केले, त्यांना या अटी व शर्तींचे पालन करावे असे वाटले नाही का ? त्यामुळे या ॲग्रीमेंटवर ज्या कोणत्या अधिकाऱ्याने सही केलेली आहे, त्यांच्यावर आपण कारवाई करणार का ? तसेच, कौशल्य मेडिकल फौंडेशन या संस्थेविरुध्द ठाणे महापालिकेच्या अनेक नगरसेवकांनी व तेथील नागरिकांनी तक्रारी केलेल्या आहेत. त्याची दखल घेऊन आपण एखादा चौकशी अधिकारी नेमून कौशल्य फौंडेशनची चौकशी करणार का ? तसेच, भूईभाडयासंबंधी कौशल्य फौंडेशन ठाणे महापालिकेकडे किती भाडे भरले ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, यासंदर्भात अटी व शर्ती घातल्या नसल्यामुळे दोषींवर कारवाई करण्याची सूचना वा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला. याबाबत मी सांगू इच्छितो की, निश्चित प्रकारे यासंदर्भात चौकशी आम्ही करु. तसेच, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, या संस्थेच्या विरुध्द अनेक तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. त्यांनी त्या तक्रारी शासनाला जर प्राप्त करुन दिल्या तर निश्चितपणे त्याबाबतीत चौकशी करण्यात येईल व चौकशीअंती कारवाईही केली जाईल. अजूनपर्यंत तक्रारी शासनाकडे आलेल्या नाहीत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, याठिकाणी मूळ मुद्दा 99 वर्षाच्या करारासंबंधीचा असून मुंबई महापालिकेच्या, ठाणे महापालिकेच्या हद्दीत अशाप्रकारच्या जागा दवाखान्यासाठी ज्यावेळी देण्यात येतात, त्यावेळी 99 वर्षांच्या कराराची अट आपण घालतो. परंतु ही अट आपण कमी वर्षाची केली पाहिजे. ही अट 15, 20 किंवा 30 वर्षांची केली पाहिजे. अशाप्रकारचे प्रमाण ठेऊन आपण पुन्हा त्यांच्या कारभाराचा आढावा घेतला पाहिजे, तो आपण घेणार का ? मुंबईतही आपण अशाप्रकारे महापालिकांच्या दवाखान्यांना जमिनी दिल्या गेल्या असून या सर्व दवाखान्यांवर

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.30443.....

डॉ.दीपक सावंत....

प्रत्येक महापालिकेमध्ये एक मॉनेटरिंग कमिटी ठेऊन कस्टमर पाठवून ते कन्सेशन देतात का ? याची माहिती घेतली पाहिजे, ती आपण घेणार का ? व त्यांच्यावर काय कारवाई करणार ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, 99 वर्षांची अट किंवा 99 वर्षांचा जो नियम आहे, तो कमी करुन 30 वर्षांचा करण्याबाबत जरुर विचार करणे आवश्यक आहे. याबाबतीत आम्ही नगरपालिकेच्या दृष्टीकोनातून विचार केलेला आहे. त्या पध्दतीने संचालक नगर प्रशासनाकडून परिपत्रक इश्यू करणार आहोत. अशाच पध्दतीने महानगरपालिकेच्या दृष्टीकोनातूनही विचार करण्यात येईल व मॉनेटरिंग करण्याच्या दृष्टीने यामध्ये अनेक अटी व शर्ती असल्यामुळे किंवा त्यांची व्यवस्थित अंमलबजावणी करण्यात येत नाही, ही सर्व वस्तुस्थिती लक्षात घेऊन यावर दाद म्हणून संनियंत्रण करण्यासाठी चांगल्या प्रकारची व्यवस्था करण्याचा विचार करण्यात येईल.

-------

..3.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मीरा-भाईंदर (जि.ठाणे) पालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याने लाच मागीतल्याबाबतची चौकशी**

**(५) * २९५४० श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद , श्री. संजय दत्त , श्री. धनाजी साठे , श्री. गोविंदराव आदिक , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री. रमेश निकोसे , श्री. सुधाकर गणगणे , श्री.सय्यद जामा , श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील , मेजर सुधीर सावंत :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मीरा-भाईंदर (जि.ठाणे) पालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी औषधांचा पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराकडून दिड लाखाची लाच मागितल्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने वैद्यकीय आरोग्य अधिकाऱ्याला दिनांक २६ एप्रिल, २००७ रोजी वा त्यासुमारास अटक केली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचा तपशील काय व त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सिध्दाराम म्हेत्रे, श्री. आर.आर.पाटील यांच्याकरिता** : (१) मीरा- भाईंदर महानगरपालिकेच्या प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी औषधांचा पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराकडून १.४५ लाख रूपयांची लाच स्वीकारल्या प्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून डॉ. श्री. रूंदन राठोड, वैद्यकीय व आरोग्य अधिकारी यांचे सह अन्य दोन खाजगी इसमांना दिनांक २६ एप्रिल, २००७ रोजी रंगेहात पकडण्यात आले असून सदर गुन्ह्यात सर्व आरोपींना दिनांक २७ एप्रिल, २००७ रोजी अटक केली, हे खरे आहे.

(२) , (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी श्री. राठोड यांच्यासह अन्य दोन खाजगी व्यक्ती विरूध्द भाईंदर पोलीस स्टेशन येथे गु.रक्र. ८ /२००७ लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम, १९८८ कलम ७,१२,१३ (१) ( ड ) सह. १३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. श्री. राठोड यांना महानगरपालिकेच्या वैद्यकीय व आरोग्य अधिकारी पदावरून प्रत्यावर्तीत केले असून त्यांना दिनांक २७ एप्रिल, २००७ पासून शासन सेवेतून निलंबीत करण्यात आले आहे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, श्री.राठोड यांच्या विरोधात विभागीय चौकशी करण्याचे काम सुरु करण्यात आले आहे काय ? तसेच, याठिकाणी उत्तरामध्ये आपण माहिती दिलेली आहे की, "त्यांचेसह अन्य दोन खाजगी इसमांना रंगेहात पकडण्यात आले." हे दोन इसम कोण आहेत, याची माहिती माननीय गृह राज्यमंत्री देतील काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नंतर श्री.रोझेकर....

**ता.प्र.क्र.29540 पुढे सुरु.........**

श्री.सिद्धाराम म्हेत्रे : सभापती महोदय, डॉ.राठोड यांची विभागीय चौकशी सुरु करण्यात येऊन त्यांना निलंबित करण्यात आले आहे. त्याबरोबर सहआरोपी म्हणून श्री.राधेय सिंघानिया, ट्रॅव्हल एजन्सी मालक व मंडलम शिवाजी, ऑफीस बॉय हे लोक होते.

-----------------

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**मौजे आगाशी, ता. वसई, जि. ठाणे येथील वक्फच्या जमीन मिळकतीवर इमारती बांधण्यास देण्यात आलेली परवानगी**

**(६) * ३१८३३ श्री. जगदीश गुप्ता , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आगाशी, ता. वसई, जि. ठाणे येथील वक्फच्या जमीन मिळकतीवर इमारती बांधण्यासाठी दिनांक २२ जानेवारी, २००७ रोजी क्र. सिडको /व्हीव्हीएसआर/ सीसी/ बीपी- ३४७६/ डब्ल्यु/१६२२ अन्वये सिडकोने बांधकाम परवानगी मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बांधकाम परवानगी मिळण्याकरिता संबंधितानी सादर केलेल्या अतितातडी मो.र.नं ७०५ /९६ दि. २ डिसेंबर.२००६ या मोजणी नकाशात संबंधित जमिनीवर चार इमारती व दर्गा असल्याचे दाखविण्यात आले आहे, तसेच त्याच जमिनीच्या अतितातडी मो.र.नं. ३६७/२००४ दि. १५ ऑक्टोबर.२००४ या मोजणी नकाशात संबंधित जमिनीवर इमारती नसल्याचे व फक्त दर्गा असल्याचे दाखविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संबंधित जमिनीवर ७० वर्षापूर्वी बांधलेल्या चार इमारती अद्यापर्यंत अस्तित्वात आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सरकारी मोजणी नकाशात बेकायदेशीरपणे फेरबदल करून मिळविण्यात आलेली बांधकाम परवानगी रद्द करण्यासाठी तसेच सरकारी मोजणी नकाशात बेकायदेशीर फेरबदल करणाऱ्याविरूध्द व त्याकडे हेतुपुरस्सरपणे दुर्लक्ष करून बांधकाम परवानगी मंजूर करणाऱ्या सिडकोच्या अधिकाऱ्याविरूध्द कोणती कार्यवाही करण्यता आली आहे वा येत आहे ?

**श्री.राजेश टोपे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) नाही. श्रीमती सय्यदा सबीन द्वारा कुलमुखत्यार श्री.मुमताज शेख यांच्या खाजगी जमीनीवर इमारती बांधण्यासाठी सिडकोने बांधकाम परवानगी दिली आहे. सदर जमीन वक्फ बोर्डाची असल्याचा कुठेही दप्तरी उल्लेख नाही.

(२) होय.

(३) होय. तथापि, सदर चार घरांचा सिडकोने ज्या जमीनीवर बांधकाम परवानगी दिली आहे, त्या जमीनीशी संबंध नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, माझ्याकडे माहिती आहे त्यानुसार वक्फ ट्रिब्युनलने दि.29 जुलै, 2006 रोजी ही जमीन बोर्डाची आहे, असा निर्णय दिला व त्यानंतर ॲड.जोशी यांनी ही माहिती सिडकोच्या अधिका-यांना दिनांक 24/1/2007 रोजी कळविली. त्यानंतर सुध्दा परवानगी देण्यात आली आहे, हे खरे आहे काय ? असल्यास, याबाबत चौकशी करुन दोषी अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल का ?

..3..........



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.31833 पुढे सुरु...............**

श्री.राजेश टोपे :सभापती महोदय, मला जी माहिती प्राप्त झाली आहे त्यानुसार ज्यावेळी बांधकाम परवानगी दिनांक 22 जानेवारी 2007 रोजी दिली त्यावेळी सर्व माहिती उपलब्ध करुन घेण्यात आली होती. त्यामध्ये ही जमीन गावठाणामध्ये आहे, गावठाणामध्ये जमीन असल्यामुळे ग्राम सेवकांचा दाखला घेण्यात आला, सहाय्यक धर्मादाय आयुक्त यांचा दाखला घेण्यात आला, तहसिलदार यांचा दाखला घेण्यात आला. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जी माहिती दिली आहे ती ग्राहय धरुन योग्य ती कारवाई करण्याच्या दृष्टीकोनातून कार्यवाही केली जाईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी अशी माहिती दिली की, ही जमीन गावठाणामध्ये आहे. ही जमीन वक्फ बोर्डाची प्रॉपर्टी आहे, असा निर्णय ट्रिब्युनलने दिलेला आहे. सन्माननीय सदस्य, श्री.जगदीश गुप्ता यांनी या ठिकाणी याबाबतची माहिती दिलेली आहे. यासंबंधीचे पत्र माझ्याकडे देखील उपलब्ध आहे. दि.24/1/2007 रोजी हे पत्र ॲड.जोशी यांनी सिडकोला पाठविले आहे. त्यावरुन हे स्पष्ट होते की, ही जमीन वक्फ बोर्डाची आहे. ज्या जागेवर सिडकोने परवानगी दिलेली आहे त्यामध्ये घर क्रमांक 101, 922 व 923 ही घरे देखील आहेत. अशा प्रकारची परवानगी देण्यात आली, हे खरे आहे काय, असल्यास ज्यांनी परवानगी दिली त्यांच्यावर कारवाई करणार काय ?

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, इतर ठिकाणी कुठेही परवानगी दिलेली नाही. जी परवानगी दिली आहे ती एकाच ठिकाणी म्हणजे मौजे आगाशी, ता.वसई, जि.ठाणे येथील श्रीमती सय्यदा सबीन व्दारा कुलमुखत्यार श्री.मुमताज शेख यांच्या खाजगी जमिनीवर इमारती बांधण्यासाठी परवानगी दिलेली आहे. घर क्रमांक 101, 922, 923 अशी परवानगी दिलेली नाही. दुस-या ठिकाणी कुठेही घरांना परवानगी दिलेली नाही. या ठिकाणी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी पत्राचा उल्लेख केला आहे. जरुर वक्फ बोर्डाच्या सी.ओ.यांच्याकडून सविस्तर चौकशी करण्यात येईल. तशी परवानगी दिली असेल तर संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हा प्रश्न राखून ठेवणे क्रमप्राप्त होईल, अशी मी विनंती याकरिता करतो की, प्रश्नाच्या भाग दोनमध्ये असे म्हटले आहे की, "संबंधित जमिनीवर चार इमारती व दर्गा असल्याचे दाखविण्यात आले आहे, तसेच त्याच जमिनीच्या अतितातडी

..4........



SRR/ MAP/ SBT/ 12:45

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र.31833 पुढे सुरु...............**

श्री.दिवाकर रावते............

मो.र.नं.367/2004, दि.15 ऑक्टोबर 2004 या मोजणी नकाशात संबंधित जमिनीवर इमारती नसल्याचे व फक्त दर्गा असल्याचे दाखविण्यात आले आहे, हे खरे आहे काय ?" या प्रश्नाला शासनाने 'होय' असे उत्तर दिले आहे. फेब्रुवारीमध्येच संबंधित वकिलांनी सिडकोला ट्रिब्युनलचा निर्णय कळविला आहे. आता या ठिकाणी असे रेकॉर्डवर आले आहे की, ही जमीन वक्फची नाही तर गावठाणामधील आहे. आम्हाला जे लेखी उत्तर देण्यात आलेले आहे ते वेगळे आहे.

यानंतर श्री.बोरले..........

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.31833 ......

श्री.दिवाकर रावते .....

वक्फ बोर्डाने आपली नसलेली जमीन असल्याचे दाखविलेली आहे की अधिका-यांनी आपल्याला चुकीचे उत्तर दिलेले आहे ? असा सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांचा प्रश्न आहे. सन्माननीय सदस्य श्री. जगदीश गुप्ता यांनी "....संबंधित जमिनीवर इमारती नसल्याचे व फक्त दर्गा असल्याचे दाखविण्यात आले आहे, हे खरे आहे काय काय, असा लेखी प्रश्न विचारलेला आहे. त्या प्रश्नाला "होय" असे उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, हा संभ्रम निर्माण करणारा प्रश्न आहे. प्रश्नाला उत्तर मिळत नसल्यामुळे प्रश्न राखून ठेवावा, असे मी म्हणत नाही. परंतु वक्फ बोर्डाचा निर्णय योग्य आहे की शासनाकडील माहिती योग्य आहे ? संभाजीनगरला इंजिनिअरींग कॉलेज बांधण्यासाठी परवानगी मागितली असता ही वक्फ बोर्डाची जमीन आहे, असे सांगून परवानगी देत नव्हते. म्हणून मला असे म्हणावयाचे आहे की, योग्य ती माहिती सभागृहासमोर आली पाहिजे. त्यासाठी हा प्रश्न राखून ठेवावा आणि उद्या किंवा परवा चर्चेला घ्यावा. प्रश्नाचे उत्तर येत नाही म्हणून प्रश्न राखून ठेवावा, असे मी म्हणत नाही.

श्री.राजेश टोपे : सभापती महोदय, मी जबाबदारीने सांगतो की, शासनाने टाऊन प्लॅनिंग डिपार्टमेंट, आयुक्त, ग्रामसेवक, तहसिलदार यांच्याकडून सर्टिफिकेट घेतलेले आहे. या जमिनीवर दर्गा आहे, तो वेगळा विषय आहे. परवानगी दिली तेथे गावठाण आहे. प्रायव्हेट जमिनीवर परवानगी दिलेली आहे. सिडकोने तपासणी करुनच परवानगी दिलेली आहे. तरी पण मी माननीय विरोधी पक्ष नेते श्री.पांडुरंग फुंडकर आणि सन्माननीय सदस्य श्री.जगदीश गुप्ता यांना सांगू इच्छितो की, एक आठवडयाच्या आत संबंधितांबरोबर बैठक घेऊन व सर्व संबंधित सर्व अधिका-यांना बैठकीला बोलावून सन्माननीय सदस्यांचे समाधान केले जाईल.

--------

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उच्च न्यायालयाने जेम्स लेनच्या वादग्रस्त पुस्तकावरील बंदी उठविल्याबाबत**

**(७) * २९२८९ श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. धनाजी साठे , श्री. रमेश निकोसे, श्री.सय्यद जामा , श्री. यशवंतराव गडाख , श्री.सागर मेघे , श्री. नितीन गडकरी , श्री. पांडुरंग फुंडकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेम्स लेनच्या वादग्रस्त पुस्तकावरील उच्च न्यायालयाने दिनांक २७ एप्रिल, २००७ रोजी वा त्यासुमारास बंदी उठविल्यामुळे महाराष्ट्रातील तमाम जनतेमध्ये संतापाची लाट पसरली आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निर्णयाविरोधात राज्य शासनाने सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्याची भूमिका जाहीर केली आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास, त्या अनुषंगाने कोणती कारवाई राज्य शासनाने केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.विलासराव देशमुख यांच्याकरिता** : (१) जनतेमध्ये संतापाची लाट पसरली आहे हे अंशत: खरे आहे. तथापि उच्च न्यायालयाने या पुस्तकावरील बंदी दि. २६ एप्रिल, २००७ रोजी उठविली आहे.

(२) होय,

(३) या निर्णयाविरोधात राज्य शासनाच्यावतीने सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे एस.एल.पी (Special Leave Petition) क्र. ८९३१/२००७ दाखल करण्यात आले आहे. या प्रकरणी दि. १८ मे, २००७ रोजी सुनावणी होऊन जप्त केलेली पुस्तके वितरित करण्यास स्थगिती देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

..३...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. २९२८९ .....

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांना मानणारा वर्ग किती आहे हे दाखविण्यासाठी राज्य शासन न्यायालयात पुरेसा तपशील सादर करु शकले नाही किंवा कमी पडले म्हणून हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले, हे खरे आहे काय ? तसेच, दिनांक 18 मे, 2007 रोजी न्यायालयात जी सुनावणी झाली त्यावेळी राज्य शासनाने कोणती भूमिका मांडली, याबाबत माहिती मिळू शकेल काय ?

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांच्या प्रश्नावर माझा हरकतीचा मुद्दा आहे. कृपया आपण मला परवानगी द्यावी. प्रश्न विचारणारे सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त हे ज्या पक्षाचे सदस्य आहेत त्या पक्षाचे सरकार केरळमध्ये आहे. केरळमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेल्या वहया वाटपावर बंदी घालण्यात आली. केरळमध्ये त्यांच्या पक्षाचे सरकार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल बोलण्याचा त्यांना नैतिक अधिकार आहे काय ?

**सभापती** : त्यांना छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल बोलण्याचा नैतिक अधिकार आहे.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयामध्ये आहे. जेम्स लेन यांच्या पुस्तकावरील बंदी उठविल्यानंतर गृह विभागाच्यावतीने सर्वोच्च न्यायालयात स्पेशल लिव्ह पिटीशन दाखल केलेले आहे आणि स्थगिती मिळविलेली आहे. दिनांक 26 जुलै रोजी पुढील सुनावणी होणार आहे. दिनांक 26 जुलै रोजी सुध्दा महाराष्ट्र शासनाच्यावतीने चांगले वकील देऊन न्यायालयात बाजू मांडून या पुस्तकावरील बंदी कायम ठेवण्याचा आपला प्रयत्न राहणार आहे.

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, सर्वोच्च न्यायालयात आपण बाजू मांडणार आहोत, असे मंत्री महोदयांनी सांगितले. माझा मुद्दा असा आहे की, उच्च न्यायालयाने या पुस्तकावरील बंदी उठविल्यानंतर गुजरात सरकारने दुस-या एका पुस्तकाबद्दल मत मागितले होते.

यानंतर श्री.गागरे .........

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ KGS/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.बोरले 12:55

ता.प्र.क्र.29289 .....

डॉ.नीलम गोऱ्हे .....

सर्वोच्च न्यायालयाने सूचना केली आहे की, पुस्तकावरील बंदी हा विषय राज्य सरकारच्या अखत्यारीतील निर्णय आहे. अशा वेळी राज्य सरकारने स्वत:च्या जबाबदारीवर पुस्तकावरील बंदी उठविण्याच्या बाबतीत निर्णय घ्यावयास पाहिजे. शासन म्हणते की, सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडण्यात येईल, असे म्हणणे योग्य नाही. मुळात महाराष्ट्र शासन स्वत:चा अधिकार वापरत नाही तर सर्वोच्च न्यायालयात बाजू मांडण्याबाबत विचारत आहे. माझा प्रश्न असा आहे की, महाराष्ट्र सरकार स्वत:च्या अधिकारात ताबडतोब या पुस्तकावर बंदी घालेल का ? तसेच जेम्स लेनचे एक वक्तव्य वृत्तपत्रात प्रकाशित झालेले आहे. जेम्स लेन म्हणतात की, त्यांना भारतात व महाराष्ट्रातही भेट द्यायला आवडेल. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, जेम्स लेनला भारतामध्ये व महाराष्ट्रामध्ये येण्यासाठी व्हिसा नाकारण्याची शिफारस महाराष्ट्र सरकार करेल का ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, या पुस्तकावर अगोदरच महाराष्ट्र सरकारने बंदी घातलेली आहे. परंतु नुकतीच सन्माननीय सदस्यांनी ज्या सूचना केलेल्या आहेत त्या विधी व न्याय विभागाकडून तपासून घेण्यात येईल.

( गोंधळ )

**सभापती** : सर्व सदस्य एकाच वेळी बोलणार असतील तर माननीय मंत्र्याकडून अपेक्षीत उत्तर मिळणार नाही.

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये या पुस्तकावर अगोदरच बंदी घातली आहे आणि सर्वोच्च न्यायालयानेसुध्दा ही बंदी कायम ठेवली आहे.

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, जेम्स लेनने म्हटले आहे की, त्यांना महाराष्ट्रामध्ये यायला आवडेल. याबाबत सन्माननीय सदस्यांनी भावना व्यक्त केलेल्या आहेत. जेम्स लेन महाराष्ट्रात आले तर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न फार गंभीर होईल, महाराष्ट्रातील जनता जेम्स लेनला जोडयाने बडविल्याशिवाय राहणार नाही, कारण त्यांची तीच लायकी आहे. त्यामुळे माझी सरकारला विनंती आहे की, जेम्स लेनच्या बाबतीत भारत सरकारच्या विदेश मंत्रालयाकडे व जेम्स लेनच्या देशातील ॲम्बेसीकडे पत्र पाठविण्यात यावे की, ते जर महाराष्ट्रात आले तर भारतातील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.29289 .....

श्री.नितीन गडकरी .....

कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न चिघळेल, त्यामुळे त्यांना व्हिसा देऊ नये. अशा प्रकारचे पत्र पाठवून महाराष्ट्रातील जनतेच्या तीव्र भावना त्यांना कळविल्या पाहिजेत, अशी मी विनंती करतो.

श्री.विलासराव देशमुख : सभापती महोदय, या प्रकरणाबाबत दोन्ही सभागृहातील माननीय सदस्यांच्या व महाराष्ट्रातील जनतेच्या भावना आम्ही विचारात घेतलेल्या आहेत. कायदा व सुव्यवस्था अतिशय महत्वाची आहे. याबाबत लोकांच्या भावना अतिशय तीव्र आहेत. त्यामुळे महाराष्ट्र सरकारच्या वतीने केंद्र सरकारच्या एक्स्टर्नल अफेअर्स मिनिस्ट्रीला मी स्वत: पत्र लिहणार असून आपल्या भावना कळविणार आहे.

------

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**यवतमाळ जिल्हयाला पंतप्रधानानी जाहीर केलेल्या**
**पॅकेजचा निधी सम प्रमाणात मिळण्याबाबत**

**(८) * २९३६५ श्री.सय्यद जामा , श्री. संजय दत्त , श्री. गोविंदराव आदिक , श्री. रमेश निकोसे, श्री. धनाजी साठे , श्री. यशवंतराव गडाख , श्री.सय्यद जामा , श्री. यशवंतराव गडाख , श्री. धनाजी साठे , श्री. मुझफ्फर हुसेन सय्यद :** सन्माननीय **महसूलमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयाला पंतप्रधानानी जाहिर केलेल्या पॅकेज पैकी केवळ ३२२ कोटी प्राप्त झाल्याची बाब दिनांक ११ मे, २००७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनस आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ६ जिल्हयांसाठी ३ हजार ७५० कोटी जाहिर केले असताना सम प्रमाणात वाटप न करण्याचे कारण काय आहे,
(३) असल्यास, सम प्रमाणात निधी देण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**डॉ.राजेंद्र शिंगणे, श्री.नारायण राणे यांच्याकरिता:** (१) यवतमाळ जिल्हयाकरिता मा.पंतप्रधानांनी जाहीर केलेल्या पॅकेज अंतर्गत सन २००६-०७ व २००७-०८ या वर्षामध्ये आजपर्यंत एकूण रुपये २१,१०६.७९ लक्ष इतका निधी प्राप्त झालेला आहे.
(२) व (३) : मा.पंतप्रधानांनी घोषित केलेल्या पॅकेजमधील रकमेतून विविध योजना राबवावयाच्या आहेत. या कारणास्तव या निधीचे प्रत्येक जिल्हयासाठी समप्रमाणात वाटप करता येत नाही.

श्री.रमेश निकोसे : सभापती महोदय, यवतमाळ जिल्हयाला पंतप्रधानांनी निधी दिलेला आहे, परंतु त्याचे वाटप बरोबर झालेले नाही, असे निदर्शनास आलेले आहे. काही चेक बाऊन्स झालेले आहेत. या पॅकेजपैकी किती रक्कम यवतमाळ जिल्हयामध्ये खर्च करण्यात आलेली आहे ? पंतप्रधानांनी घोषित केलेल्या पॅकेजमधून कोणत्या विविध योजना राबविण्यात येणार आहेत ?

डॉ.राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय पंतप्रधानांनी विदर्भातील 6 जिल्हयांकरीता 3650 कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केलेले आहे. त्या संदर्भात यवतमाळ जिल्हयाकरिता 271.79 लाखाचा निधी आतापर्यंत वितरीत केलेला आहे. यामध्ये शिक्षण, आजार, रोजगार, व्याजमाफी, सिंचनामध्ये सुक्ष्मसिंचन व लघुसिंचन, बियाणे वाटपात 50 टक्के अनुदान, दुधाळ जनावरे व वासरे संगोपन याकरिता निधी देण्यात आला आहे.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

KBS/SBT/MAP/KGS. श्री. गागरे नंतर --- 13:00

ता. प्र. क्र. 29365 .....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, एकंदरीतच या पॅकेजची फार दुरावस्था या सहा जिल्ह्यांमध्ये आहे. 3750 कोटी रूपयांचे पॅकेज या सहा जिल्ह्यांसाठी जाहीर झाले पण त्याबाबत कोणत्याही प्रकारे अमलबजावणी मात्र होत नाही, झालेली नाही. यवतमाळ जिल्ह्यामध्ये हे पॅकेज जाहीर झाल्यानंतर आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या वाढते आहे. अर्बन को-ऑप.बँका आहेत त्यांच्याकडील कर्जाच्या बाबतीत खरे तर सरकारने निर्णय घ्यायला पाहिजे होता पण सहकार विभागाने अद्याप तो घेतलेला नाही. याशिवाय देखील अनेक त्रुटी आहेत. त्यामुळे या पॅकेजमधील पूर्ण पैसे केव्हा, किती दिवसात खर्च होतील आणि त्यासाठी एक मॉनेटरींग कमिटी करून हा पैस कसा खर्च होईल या दृष्टीने उपाय योजना आपण करणार आहात का ?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय पंतप्रधानांचे 3750 कोटी रूपयांचे जे विशेष पॅकेज या सहा जिल्ह्यांसाठी जाहीर केलेले आहे ते 3 वर्षांसाठी आहे आणि आताशी एकच वर्ष याला झालेले आहे. उरलेल्या दोन वर्षांमध्ये पंतप्रधानांच्या पॅकेजच्या माध्यमातून या सहा जिल्ह्यांसाठी पैसे मिळणार आहेत आणि आपल्याला त्या दोन वर्षात ते खर्च करावयाचे आहेत. सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.गडकरी यांनी विचारल्याप्रमाणे अर्बन को-ऑप.बँकांचे प्रस्ताव आलेले आहेत मात्र त्याबाबत कारवाई झालेली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तेव्हा निश्चितपणे मॉनेटरींग कमिटीच्या माध्यमातून आणि शासनाकडून तसे प्रस्ताव मंजूर होतील. माननीय मुख्यमंत्री तसेच इतर खात्यांचे जे मंत्री असतील ते त्या त्या विभागांचा आढावा या संदर्भात घेत असतात. तो घेताना त्यात काही त्रुटी राहिल्या असतील तर त्या दूर करून हे पैसे पूर्णपणे योग्य मुदतीत खर्च होतील या दृष्टीने प्रयत्न केले जातील.

**सभापती** : मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सुरूवातीस नियम 289 खाली दिलेल्या सूचनेसंबंधात सुमारे 8 मिनिटे चर्चा झाली आहे त्यामुळे प्रश्नोत्तराचा तास 8 मिनिटांसाठी मी वाढवून देत आहे.

श्री. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, पंतप्रधानांनी घोषित केलेल्या पॅकेजमधून विविध योजना आपल्याला राबवावयाच्या आहेत. त्यामुळे सर्व जिल्ह्यांना सम प्रमाणात त्यातील पैशाचे वाटप करता येत नाही असे येथे सांगण्यात आलेले आहे. त्याबद्दल मी काहीही म्हणत नाही. परंतु माननीय मुख्यमंत्री तसेच जलसंधारण मंत्री देखील आता येथे उपस्थित आहेत. त्यांच्या उपस्थितीत

....... एम 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मला आपल्या हे निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, यामध्ये आपण सिंचनाचाही कार्यक्रम दिलेला आहे आणि त्यात जलसंधारणाच्या देखील योजना आहेत. मात्र त्यांच्याबाबतीत अजूनही शासनाने शासन निर्णय दुरूस्त केलेला नाही. सभापती महोदय, या सभागृहामध्ये खूप मोठा संघर्ष झाल्या नंतर पाटबंधारे विभागाने जी.आर. काढला. परंतु जलसंधारण विभागाने मात्र अजून तसा जी.आर. काढलेला नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्याबाबतीत परवाच अकोल्यामध्ये 'होय' म्हणून सांगितले इतकेच नाही तर अमरावतीमध्ये देखील सांगितले. सभापती महोदय, घटनेप्रमाणे देखील काही गोष्टी बरोबर झालेल्या नाहीत, माननीय राज्यपालांच्या निदेशांप्रमाणेही बरोबर झालेल्या नाहीत. पाटबंधारे विभागाने पाटबंधाऱ्यांसाठी जी.आर. काढला आहे त्यासाठी 2005 पासून 2007 पर्यंतचा काळ गेला आहे. आता जलसंधारणाचा जी.आर. काढण्यासाठी आणखी किती वर्षे शासन घेणार आहे ? म्हणून माझा या ठिकाणी स्पेसिफिक प्रश्न आहे की, पाटबंधारे विभागासाठी आपण जी.आर. काढला आहे तसा जी.आर. जलसंधारण विभागाकडूनही चार दिवसात काढला जाईल का ? वित्त विभागाकडे किती दिवसांपासून याची फाईल पडलेली आहे ? सभापती महोदय, विदर्भातील छोटे छोटे प्रकल्प आहेत ते होऊ नयेत म्हणून काहींचा हा डाव आहे असे मला वाटते. तेव्हा चार दिवसात जलसंधारणासाठी जी.आर. आपण काढणार आहात का ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जलसंधारणाचा जी.आर.देखील निघणे आवश्यक आहे म्हणून या आठवड्यामध्ये तो जी.आर. काढण्यात येईल.

श्री. बी.टी.देशमुख : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी हे सांगितले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. परंतु पाटबंधारे विभागाने जी.आर. काढला आहे त्याच पद्धतीचा जी.आर., अधिकार देणारा जी.आर. काढणार आहात का ?

श्री. बाळासाहेब थोरात : होय.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, आता या ठिकाणी माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देताना सांगितले की, तीन वर्षात या पॅकेजचे पैसे दिले जातील व खर्च केले जातील. यावरून या पॅकेजच्या बाबतीत हे सरकार किती गंभीर आहे हे लक्षात येते. सभापती महोदय, या पॅकेजच्या अंतर्गत दिलेले चेक्स परत गेले आहेत आणि त्यासंबंधात आपण चौकशी लावली आहे तसेच जिल्हाधिकारी, तहसिलदार, नायब तहसिलदार यांच्यावर कारवाई करणार आहात असे आम्ही ऐकले आहे, ते खरे आहे का ? ....

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MAP/ 13:05

ता.प्र.क्र. 29365...

श्री. दिवाकर रावते...

हिंदुस्थानामध्ये अशाप्रकारचे अनेक पॅकेज जाहीर होत असतात. त्या पॅकेजचे वाटप पूर्ण झाल्यानंतर ते योग्य प्रकारे झाले आहे की नाही याची चौकशी होते. आपल्या राज्यामध्ये जाहीर करण्यात आलेल्या पॅकेजचे वाटप योग्य प्रकारे झालेले नाही अशाप्रकारचे रेकॉर्ड तयार केले गेले. तेव्हा या जाहीर केलेल्या पॅकेजचे वाटप पूर्ण होण्याअगोदर केंद्र सरकारने या पॅकेजच्या चौकशीसाठी समिती नियुक्त केली आहे काय?

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी चेकच्या संदर्भात उल्लेख केला. त्या संदर्भात शासनाने चौकशी केली असून काही अधिकाऱ्यांवर कारवाई केली आहे. त्यामध्ये जिल्हाधिकारी असतील....

श्री. विलासराव देशमुख : सभापती महोदय, या प्रकरणी तेथील संबंधित आर.डी.सी. ना निलंबित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे एका क्लर्कला निलंबित केले आहे. तसेच, संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या विरुध्द विभागीय चौकशीचे आदेश दिले आहेत. यामध्ये अकाऊंटमध्ये पैसे नसतांना मुख्यमंत्र्यांच्या निधीमधून चुकीच्या पध्दतीने पैसे काढण्यात आले आहेत. मुख्यमंत्र्यांच्या निधीमधून पैसे काढतांना पुष्कळ चुकीच्या गोष्टी केल्या आहेत. म्हणून कारण नसतांना केंद्र सरकारची बदनामी झालेली आहे. त्याकरिता संबंधितांविरुध्द कठोर कारवाई केली आहे. या प्रकरणी चौकशी करण्याकरिता केंद्रीय चौकशी समिती आलेली नाही. या निधी वाटपाच्या संदर्भात माननीय पंतप्रधान यांच्या कार्यालयामार्फत त्यांच्या राज्यमंत्र्यांमार्फत वारंवार आढावा घेण्यात येत आहे. त्याचप्रमाणे माननीय पंतप्रधानांच्या प्रधान सचिवांमार्फत आढावा घेण्यात येत आहे. या संदर्भात होत असलेल्या कामाचा वेग लक्षात घेता त्यामध्ये काही अडचणी आहेत. त्या संदर्भात वेळोवेळी आढावा घेण्यात येत असून आतापर्यंत झालेल्या कामाच्या संदर्भात परवा झालेल्या बैठकीमध्ये त्यांनी समाधान व्यक्त केले आहे.

श्री सय्यद कमरुझ जामा :सभापति महोदय, सिंचाई के लिए 3750 करोड़ रुपये के प्रधानमंत्री पॅकेज के बारे में दुविधा है. क्योंकि राज्यपाल महोदय ने सिंचाई के लिए धनराशि मंजूर की है. इसी के साथ साथ केन्द्रीय सरकार ने भी कहा है कि सिंचाई व्यवस्था के लिए अलग से फंड दिया जाएगा. इस धनराशि में से 240 करोड़ रुपये चेक बांध के लिए दिए जाने हैं. इसलिए

...2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 29365... श्री सय्यद कमरुझ जामा....

मैं यह जानना चाहता हूं कि प्रधानमंत्री पॅकेज के अन्तर्गत चेक बांध के लिए 240 करोड़ रुपये प्राप्त हुए या नहीं ? मेरा दूसरा प्रश्न यह है कि विदर्भ के 6 जिलों में प्रधान मंत्री के पॅकेज के अमल के लिए क्या कोई मॉनेटरिंग कमेटी बनाई गई है ?

**(सभापतीस्थानी माननीय उपसभापती)**

डॉ. राजेंद्र शिंगणे : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नासंबंधी सांगू इच्छितो की, जाहीर झालेल्या पॅकेजमधून यावर्षी 48 कोटी रुपये प्राप्त झाले आहेत. आणि जस जशा योजना मंजूर होतील त्याप्रमाणे पुढील दोन वर्षात उर्वरीत निधी प्राप्त होणार आहे.

**उपसभापती** : प्रश्नोत्तरांचा तास संपलेला आहे.

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/ KGS/ MAP/

**पृ.शी./मु.शी.: कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे**

श्री. धर्मरावबाबा आत्राम (महिला व बालकल्याण राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा सन 2001-2002 व 2002-2003 चा अनुक्रमे नववा व दहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतो.

**उपसभापती** : महाराष्ट्र राज्य महिला आयोगाचा सन 2001-2002 व 2002-2003 चा अनुक्रमे नववा व दहावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवण्यात आले आहेत

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.व मु. शी. : विधेय□ां□ संमती व अधिसंमती**

**उपसभापती** : दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाल्यासंबंधीची यादी प्रधान सचिव वाचू□दा□वतील.

**विशेष कार्य अधिकारी** : खालील विधेयकांना राज्यपालांची अधिसंमती मिळाली.

1) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 7 - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, 2007

2) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 8 - महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, 2007

3) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 10 - विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ आणि कोकण पाटबंधारे विकास महामंडळ (सुधारणा) विधेयक, 2007

4) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 11 - महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध (सुधारणा) विधेयक,2007

5) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 12 - महाराष्ट्र राज्य सार्वजनिक उपक्रम (पुनर्रचना व इतर विशेष तरतुदी) (निरसन) विधेयक, 2007

6) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 13 - महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोकऱ्या यांवरील कर आणि महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक, 2007

7) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 14 - मुंबई महानगरपालिका आणि मुंबई प्रांतिक महानगरपालिका (तात्पुरती सुधारणा) विधेयक, 2007

8) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 26 - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) विधेयक, 2007

9) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 27 - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, 2007

10) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 28 - महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते (सुधारणा) विधेयक, 2007

11) सन 2007 चे वि.स.वि. क्रमांक 29 - महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारण) विधेयक, 2007

12) सन 2007 चे वि.प.वि. क्रमांक 1 - मुंबई प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक, 2007

------------

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**<u>प्रश्न स्वीकृत,अस्वीकृत करण्याच्या संबंधात</u>**

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, प्रश्नाच्या संदर्भात माझा हरकतीचा मुद्दा आहे.

..(अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी बोलण्यासाठी परवानगी मागतात.)..

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी आपले म्हणणे थोडक्यात सांगावे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये सन्माननीय सदस्य श्री.श्रीकांत जोशी यांनी विचारलेला प्रश्न बदलूनच छापण्यात आला असल्याचा आक्षेप घेतल्यामुळे माननीय सभापती महोदयांनी तो प्रश्न राखून ठेवला. हा योग्य निर्णय दिला. सभागृहाच्या सदस्यांनी प्रश्न शाखेच्या प्रमुखांना आग्रहाने सांगितले होते की, आम्ही जे आग्रहक्काचे प्रश्न देतो त्याऐवजी बॅलेट पध्दतीमध्ये दुसरे प्रश्न येतात, असे बऱ्याचवेळेला होते. याला दुसरी बाजूही आहे, असे सांगून आम्ही विनंती केली होती की, आमच्या समाधानासाठी मागच्या अधिवेशनातील बॅलेट घेऊन सदस्यांनी दिलेले प्रश्न असे लागले, अशाप्रकारचे प्रेझेंटेशन केले तर सर्व सदस्यांना वास्तव चित्र कळेल. आम्हाला असे उगाचच वाटते की, ठराविक सन्माननीय सदस्यांचेच प्रश्न लागतात, आमचे प्रश्न लागतच नाहीत. याबाबतीत प्रेझेंटेशन केले तर सुस्पष्टता येईल, असे आग्रहाने म्हटले होते. मला असे वाटले की, मलाच बॅलटच्या पध्दतीबाबत दोन-पाच वर्षे काही कळत नाही. इतर सदस्यांना मी विचारले असता, त्यांनी सांगितले की, आमच्या दोन टर्म्स झालेल्या आहेत, आम्हालाच बॅलेटप्रमाणे प्रश्न कसे लागतात, हे कळत नाही. त्यानंतर तिसरी टर्म असणारे सदस्यही म्हणाले की, बॅलेटप्रमाणे कसे प्रश्न लागतात, हे आम्हालाच कळत नाही. सभापती महोदय, ही सायंटिफिक पध्दती असेलच. या बॅलेट पध्दतीवरचा विश्वास वाढवावयाचा असेल तर झालेल्या अधिवेशनातील बॅलेटच्या पध्दतीचे प्रेझेंटेशन सदस्यांना दाखविले पाहिजे, त्याचा उपयोग होईल, असे मला वाटते.

**उपसभापती** : यामध्ये काही सेटिंग आहे असे आपल्याला म्हणायचे आहे काय ?

श्री.श्रीकांत जोशी : तसे म्हणावयाचे नाही.

अनेक सन्माननीय सदस्य : आम्हाला तसे म्हणायचे नाही.

श्री.नितीन गडकरी : मला तसे म्हणायचे आहे.

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, मी 117 प्रश्न दिलेले आहेत. या प्रश्नामधील जे जे भ्रष्टाचाराच्या संबंधातील प्रश्न विचारलेले होते त्याच्याशी संबंधित लोकांचे मला 15 टेलिफोन आले. 117 प्रश्नांपैकी लहान लहान असे 22 प्रश्न फक्त स्वीकृत केले. या संबंधात मी प्रश्न



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण (पुढे सुरू...

शाखेमध्ये तक्रार केली असता मला असे सांगण्यात आले की, आम्हाला माहीत आहे की, प्रश्न शाखेतील काही लोक नीट वागत नाहीत. या अधिवेशनामध्ये काही लोकांना आम्ही बदलणार आहोत. त्यानंतर माझ्या स्वीय सहाय्यकाला 14 तारखेला फोनवरुन सांगितले गेले की, साहेबांचे प्रश्न परत पाठवा. हे काय चाललेले आहे ? आम्ही प्रश्न दिल्यानंतर आम्हाला असे सांगण्यात येते की, हे प्रश्न बरोबर नाहीत. हे शासनामध्ये बसत नाही.. हा काय प्रकार चाललेला आहे ? होय, आमचा आरोप आहे की, प्रश्न शाखेमध्ये भ्रष्ट माणसे बसलेली आहेत. सच्चर कमिटीच्या संदर्भात मी प्रश्न विचारला असता, त्या संदर्भात असे कळविण्यात आले की, " हा प्रश्न उद्‌भवत नाही ". मग त्या जेम्स लेनचा प्रश्न कसा उद्‌भवतो ? " अतारांकित, अस्वीकृत" अशी प्रश्नांच्या संदर्भात उत्तरे पाठविली जातात. माझी विनंती आहे की, आम्ही पहिले प्रश्न विचारल्यानंतर ते बॅलेटमध्ये टाकण्यापूर्वी त्यामधील 50 प्रश्न अस्वीकृत असतील तर ते बाजूला काढून उरलेले स्वीकृत प्रश्न बॅलेटमध्ये टाकावेत. परंतु नंबर लागल्यानंतर आमचा एक क्रमांकाचा प्रश्न स्वीकारतात. परंतु जो प्रश्न आलाच पाहिजे,असे वाटते तो प्रश्न अस्वीकृत केला जातो. दुसऱ्या राऊंडला पहिले पाच प्रश्न विचारले तर ते पाचही प्रश्न अस्वीकृत केले जातात. हा काय प्रकार चाललेला आहे ?

श्री.नितीन गडकरी : सभापती महोदय, मी गेल्या 18 वर्षापासून या सभागृहातील सदस्य आहे, पण या प्रश्न आणि लक्षवेधी सूचनांचे काय गौडबंगाल आहे, काय चालू आहे, याबाबत माझ्या मनामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. त्यावेळेस सभापती म्हणून श्री.जयंतराव टिळक साहेब असतांना आणि इतरवेळी सभागृहाच्या कामकाजाबद्दल, प्रश्नाबद्दल, लक्षवेधी सूचनेबद्दल, तेव्हापासून मला माहिती आहे.पण मला हे माहित नाही की, आपले कार्यालय शासनाला आम्ही कोणते प्रश्न विचारायचे हे सांगण्यासाठी नाही, तो आमचा प्रश्न आहे. आपले कार्यालय हे योग्य आहे की अयोग्य आहे हे कशाला सांगते ? शासनाला वाचविण्याकरिता विधानमंडळाचे कार्यालय नाही, हे सत्तारूढ पक्षाचे कार्यालय नाही.

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी ....

आपली भूमिका निरपेक्ष आहे. जे प्रश्न सन्माननीय सदस्य विचारत असतील ते त्यांना विचारु द्यावेत. शासन त्याबद्दल आपली भूमिका मांडील. सत्ताधारी पक्षाला अडचणीत आणणे हे विरोध पक्ष म्हणून आमचे कर्तव्य आहे आणि सत्ताधारी पक्षाने त्याचे उत्तर दिले पाहिजे. कधी आम्ही इकडे राहू कधी ते इकडे राहतील. पण आमचे प्रश्न स्वीकृत करणे, अस्वीकृत करणे, प्रश्न टाळणे, हे जे काही प्रकार सुरु आहेत त्याबाबत मी आज एवढेच सांगतो की, गेल्या काही वर्षापासून मी या सभागृहाच्या कामकाजाबद्दल अतिशय दु:खी आहे आणि याचा स्फोट झाला तर त्यानंतर ज्या भयानक गोष्टी बाहेर येतील त्या चांगल्या राहणार नाहीत. या सभागृहाची प्रतिष्ठा ठेवावयाची असेल तर या विषयावर सगळ्या गोष्टीचे नियम, त्यातील ट्रान्स्परंसी आणि त्याचे विस्तृत प्रकारचे प्रोसीजर आपण तयार केले पाहिजे. याकरिता नियम समितीची बैठक बोलवावी. आम्ही या विषयावर अतिशय नाराज आहोत. कोणत्या प्रश्नाला किंवा लक्षवेधीला महत्व मिळते, कोणाला मिळत नाही. नागपूरला पाच महिलांनी मुंडन केले, मिहानमध्ये काही लोकांनी आत्महत्या केल्या परंतु आमचे प्रश्न लागतच नाहीत. ते प्रश्न बाजूलाच पडतात. जे कमी महत्वाचे प्रश्न आहेत ते वर येतात. सभापती महोदय, हे चांगले नाही. आम्ही यापेक्षा जास्त कडक शब्दात बोलणे बरोबर होणार नाही. माझी आपल्याला विनंती आहे की, आपण या सगळ्याची दखल घ्यावी. हे सगळे प्रोसीजर बदलावे. अन्यथा या सभागृहामध्ये आम्ही सगळे बसून याविरुध्द प्रतिक्रया देऊन बोलण्यास सुरुवात केली तर आपण आम्हाला असे म्हणून नका की, आम्ही माननीय सभापतींची, सभागृहाची प्रतिष्ठा ठेवली नाही. आपण याची काळजी घ्यावी. याबाबत इंडिपेंडंट, इम्पार्शल आणि फेअर असाच व्यवहार या ठिकाणी झाला पाहिजे.

( अनेक सन्माननीय सदस्य बोलण्यासाठी परवानगी मागतात )

**उपसभापती** : सगळ्या सन्माननीय सदस्यांना जर याच मुद्यावर प्रतिक्रिया व्यक्त करावयाच्या असतील तर मला असे वाटते की, मला याचे गांभीर्य समजलेले आहे.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, गेल्या अधिवेशनात आपल्यासमोरच आम्ही सगळ्यांनी भावना व्यक्त केल्या होत्या. याबाबतीत काहीच झाले नाही. आपण स्वत: लक्ष घालणार होता.

श्री. विनोद तावडे : बैठक घेतो असे आपण म्हणाला होता.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी माननीय सभापती )**

प्रा. बी. टी. देशमुख : सभापती महोदय, या सभागृहामध्ये ट्रान्सपरंसीच्या ज्या दोन पध्दती आहेत त्या पूर्णपणे बंद झाल्या. त्या ताबडतोब सुरु केल्या तर निम्म्या तक्रारी कमी होऊ शकतात. ज्यावेळी संगणक नव्हते आणि टाईपरायटरवर काम होत होते त्यावेळी प्रश्न का अस्वीकृत केला हे दुसऱ्या तिसऱ्या दिवशी प्रत्येक सदस्याला पोस्टाने घरी कळविले जावयाचे. त्यामध्ये 10, 15, 20 कारणे होती. ती सर्व कारणे टाईप न करता त्या कारणांवर टिकमार्क करावयाचे. 20 पैकी 14 कारणे, 15 कारणे आहेत हे प्रत्येकाला कळविले जात असे. माझ्याकडे सर्व रेकॉर्ड व्यवस्थित लावून ठेवलेले आहे. माझा अनुभव असा आहे की, त्यामुळे त्या कारणांची दुरुस्ती करण्याची संधी मला मिळत असते. वस्तुस्थितीचा आधार नाही, खात्याने कळविले नाही अशी कारणे असतात. माझ्याकडे वस्तुस्थिती आहे. ती वस्तुस्थिती आणून दिली की, ते प्रश्न स्वीकृत होत असत. ती जी कारणे होती त्यांचा बंदोबस्त करण्याची व्यवस्था त्यामध्ये होती. ती पध्दत ज्यांनी कोणी बंद केली असेल त्यांचा शोध घेऊन ती पध्दत सुरु केली पाहिजे. आज आता संगणकीकरण झालेले आहे. म्हणजे ते जे कारण आहे ते संगणक ताबडतोब कळवतो. त्याशिवाय पोस्टाचा खर्च होऊ नये याची हे जी काळजी घेतात ते बंद करा. एकदम गठ्ठा येतो. शेवटी शेवटी एक गठ्ठा त्या ठिकाणी येतो आणि एक गठ्ठा आमच्या खणात टाकतात. त्याचा काय निकाल लावला असेल त्याप्रमाणे ते देतात. अस्वीकृत प्रश्नाबाबत कळवतच नाहीत. स्वीकृत बाबत थोडेसे उशिरा कळवा पण अस्वीकृत बाबत ताबडतोब कळविले पाहिजे तसेच पोस्टाचे एवढे मोठे खाते आहे त्याचा आपण उपयोग करावा. या दोन पध्दती सुरु केल्या तर यातील पुष्कळ तक्रारी बंद होतील.

श्री. विनोद तावडे : आम्हाला ई-मेल करा.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी अतिशय गंभीर मुद्दा या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. मी सुध्दा याबाबतीत अनेकदा तक्रारी केलेल्या आहेत. मी नवीन सदस्य आहे त्यामुळे तक्रार करण्यासाठी मला जागा नाही असे आपल्याला म्हणता येईल. पण मला आपल्या कार्यालयाबद्दल आक्षेप नाही. मी या प्रश्नाचा जो काही थोडासा अभ्यास केला त्यामध्ये असे दिसून येते की, या ठिकाणी जे प्रश्न दिले जातात त्याच्या भागाबद्दल हा खरा

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. कपिल पाटील .....

प्रश्न आहे. त्या ठिकाणी अनेक गोष्टी बरोबर चालत नाही हे माझ्या निदर्शनास आले आहे. ज्यावेळी आपल्या सभागृहात बोलतो त्यावेळी मला जपून बोलावे लागते. त्याबाबतीत मर्यादा आहेत. त्या ठिकाणी जे काही चालते ते दुरुस्त केले पाहिजे. दुसरी बाब अशी की, कोणता प्रश्न स्वीकृत करावयाचा, कोणता प्रश्न अस्वीकृत करावयाचा याबाबत सन्माननीय सदस्य प्रा. बी. टी. देशमुख यांनी सांगितल्याप्रमाणे जो प्रश्न अस्वीकृत असेल त्याबाबत लगेच कळविले पाहिजे. बऱ्याचदा जी कारणे दिली जातात ती उशिरा कळविली जातात. जो प्रश्न स्वीकृत केला जातो त्याचे व्याकरण चुकीचे असते, भाषा चुकीची असते. म्हणजे इथून खरी सुरुवात आहे. ज्या कर्मचाऱ्यावर विसंबून हे प्रश्न तयार करतो, त्यासंदर्भात सन्माननीय सदस्य श्री. श्रीकांत जोशी यांनी सांगितल्याप्रमाणे त्याची भाषा पूर्णपणे बदलली जाते. अनेक प्रश्न योग्य असतात. मराठी हा माझा आवडीचा विषय आहे. पण त्या ठिकाणी आशय, भाषा, व्याकरण बदलतात.

यानंतर श्री. शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 13:20

(श्री. कपिल पाटील...)

आणि त्यातील सर्व आत्मा घालवून टाकून विषय सुरक्षित करतात. त्यांचा हेतू स्पष्ट असतो. सभापती महोदय, प्रश्नाच्या बाबतीत तेच, लक्षवेधीच्या बाबतीत तेच, विशेष उल्लेखाच्या बाबतीत तेच, 93च्या सूचनांच्या बाबतीत तेच घडते. आपल्या कार्यालयापर्यन्त लक्षवेधी पोहोचतच नाही. खालच्या खालीच त्या लक्षवेधीचा गर्भपात झालेला असतो. लक्षवेधी वरती सरकतच नाही. या गोष्टींचा शोध घेण्याची आवश्यकता आहे. या निमित्ताने मी अशी सूचना करु इच्छितो की, सर्व स्वीकृत प्रश्नांचे बॅलट काढले गेले पाहिजे. दुसरे बॅलट हे कार्यालयात काढले जाते. त्या वेळी आम्ही कोणीही तेथे हजर नसतो. त्यावेळी संगणकामध्ये जी माहिती भरावयाची असते तेथे गडबड केली जाते. या सर्व बाबतीत चौकशी झाली पाहिजे. तेथील सर्व कर्मचा-यांची दर दोन-तीन वर्षांनी बदली केली पाहिजे. वर्षानुवर्षे तेच कर्मचारी असतील तर आपोआपच त्यांचा इंण्टरेस्ट तयार होतो. तो मनुष्य स्वभाव आहे. हा दोष सुधारला पाहिजे अन्यथा दोष आपणावर येतो. हजारो प्रश्न येत असल्यामुळे ते सर्वच प्रश्न पाहणे वरच्या अधिका-याला शक्य नसते. म्हणून खालच्या पातळीवर बदल्या अनिवार्य केल्या पाहिजेत. या कामाची पध्दत पारदर्शी असली पाहिजे. सध्याची पध्दत सदोष आहे एवढेच आम्हाला सांगावयाचे आहे.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, विधान भवनाच्या व्यवस्थेच्या संदर्भात या ठिकाणी प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. खूप मेहनतीने सन्माननीय सदस्य प्रश्न तयार करतात, ते आपल्या कार्यालयाकडे पाठवितात. लक्षवेधी सूचना तयार करतात, ती आपल्या कार्यालयाकडे पाठवितात. ज्या लक्षवेधी अतिशय महत्वाच्या असतात त्या बाबतीत सन्माननीय सदस्य आपणास येऊन भेटतात आणि सांगतात की, आमची लक्षवेधी महत्वाची असल्यामुळे कृपा करुन ती लावावी. त्यानंतर विशेष उल्लेख आणि 93च्या सूचनांच्या बाबतीतही तशीच परिस्थिती आहे. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांसाठी उपलब्ध करुन दिलेल्या या विविध आयुधांचा उपयोग निराळया पध्दतीने केला जात आहे. आम्हाला त्याबाबत आरोप करता येत नाही आणि शेवटी जबाबदारी म्हणून आपल्याकडे बोट दाखविले जाते. आपण या सार्वभौम सदनाचे पीठासीन अधिकारी आहात. आपणावर कोणत्याही प्रकारे दोषारोप व्हावेत असे मला वाटत नाही. परंतु जर आम्ही आपणा समोर काही सांगितले नाही तर हे वाढत जाईल. म्हणून या गोष्टीला वाचा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री. मधुकर सरपोतदार...

फोडण्याची आवश्यकता आहे. मी एसआरएच्या संदर्भात मागील जुलैच्या अधिवेशनामध्ये एक लक्षवेधी सूचना दिली होती.ती त्यावेळी लागली नाही. डिसेंबर मधील नागपूर येथील अधिवेशनामध्ये मी आपणास आपल्या दालनामध्ये येऊन भेटलो आणि आपण त्यावेळी लिहून दिले आहे. त्यावेळी श्री. कळसे हे देखील तेथे होते. ती लक्षवेधी लागली नाही. त्यानंतर मागील अधिवेशनामध्ये ती लक्षवेधी दिली. त्यावेळीही ती लागली नाही. एसआरएच्यासंदर्भात तीन वेळा दिलेली लक्षवेधी सूचना डावलली गेली. तळागाळातील लोकांना घरे उपलब्ध करुन देण्याची ही एसआरए योजना आहे. त्या योजनेमध्ये भ्रष्टाचार आणि गैरव्यवहार होत असतील तर त्या बाबतीत वाचा फोडणे हे लोकप्रतिनिधीचे कर्तव्य आहे. तीन वेळा दिलेली लक्षवेधी लागली नाही म्हणून मी आता लक्षवेधी देण्याचे कमी केलेले आहे. तारांकित प्रश्न, 93च्या सूचना, विशेष उल्लेख , लक्षवेधी सूचना ही जी आयुधे सन्माननीय सदस्यांना दिलेली आहेत त्याबाबतीत सन्माननीय सदस्य नाराज आहेत. आजची प्रश्नोत्तराची यादी पाहिली तर पहिल्या 10 मधील 7 प्रश्न हे सन्माननीय सदस्य श्री. संजय दत्त यांचे आहेत. त्यांचे प्रश्न येऊ नयेत असे आमचे म्हणणे नाही. ते नवीन सदस्य असले तरी त्यांचे प्रश्न लागले पाहिजेत. नवीन सदस्यांचे प्रश्न लागले पाहिजेत त्याच प्रमाणे इतरही सदस्यांचे प्रश्न लागले पाहिजेत. परंतु एकाच सन्माननीय सदस्याचे एका पाठोपाठ एक प्रश्न लागतात, एका पाठोपाठ एक लक्षवेधी लागतात, 93च्या सूचना लागतात, हा काय प्रकार आहे ? यासाठी काही जादुची कांडी असेल तर ती शोधावी आणि आम्हा सर्वांना उपलब्ध करुन द्यावी.

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार........

सभापती महोदय, या आमच्या व्यथा आहेत,वेदना आहेत, दु:ख आहे, ते आम्ही या सदनामध्ये मांडत आहोत, कृपाकरुन त्याचा निराळा अर्थ लावू नका या संदर्भातही अंतिम निर्णय आपल्यालाच घ्यावयाचा आहे आणि सभापती महोदय आपणच तो घ्यावा, अशी मी आपल्याला विनम्र विनंती करतो.

श्री.अरविंद सावंत : सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार साहेबांनी आताच आजच्या तारांकित प्रश्नाच्या यादीचा उल्लेख केला. उद्याच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये एकूण 71 प्रश्न आहेत आणि त्या 71 प्रश्नांमध्ये तीन प्रश्न प्राथम्यक्रमाने सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांचे आहे. दुसऱ्या प्राथम्यक्रमाचे एकूण 24 प्रश्न एकाच सदस्याचे दिलेले आहेत. एकूण 71 प्रश्नांमध्ये 24 ते 27 प्रश्न काही ठराविक सदस्यांचेच प्राथम्यक्रमाने लागतात आणि आजही आपण पाहिले की प्रथम क्रमांकाचा सदस्य उपस्थित नसतो. आजही हे वारंवार घडले की, सन्माननीय सदस्य श्री.मुझफ्फर हुसेन व इतरही काही सदस्य उपस्थित नव्हते त्यानंतर मग त्यानंतरचे नाव असलेले सदस्य हे त्या प्रश्नावर बोलण्यासाठी उभे राहतात. ही कोणती नवीन पध्दत किंवा जादू आहे ? ती आम्हालाही कळली तर फार बरे होईल. सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी म्हटल्याप्रमाणे नवीन सदस्यांचे प्रश्न लागू नयेत, असे आमचे म्हणणे नाही. मी या सन्माननीय सभागृहामध्ये गेल्या 10 वर्षांपासून काम करीत आहे परंतु हा नवीनच अनुभव मला यावेळी येत आहे. आमचे प्रश्न जर भ्रष्टाचाराच्या संदर्भात असतील तर ते अजिबातच लागत नाहीत आणि त्या प्रश्नांबद्दल कोणत्याही प्रकारची माहिती व वस्तुस्थिती आम्हाला प्राप्त होत नाही. सदर बाब अतिशय गंभीर अशा स्वरुपाची असून त्यावर लवकरात लवकर कारवाई व्हावी, अशी मी या ठिकाणी विनंती करतो.

श्री.नितीन गडकरी : आम्हालाही यासंदर्भामध्ये जरा मार्गदर्शन करावे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, या सभागृहामध्ये ज्या प्रश्नाच्या संदर्भात माझ्या नावाचा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार व इतर यांनी केला त्यासंबंधी मला जो खुलासा करावयाचा आहे तो असा आहे की, आजच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये पहिल्या 10 प्रश्नांमध्ये क्रमांक सातचा जो प्रश्न आहे तो माझा आहे आणि इतर जे प्रश्न आहेत, ते काँग्रेसच्या इतर सन्माननीय सदस्यांचे प्रश्न आहेत हे सदस्य कोणत्यातरी कारणास्तव जर सभागृहामध्ये अनुपस्थित असतील तर तसे त्यांनी सभागृहाला पत्राद्वारे कळविलेलेही असेल आणि सभागृहातील





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय दत्त

प्रथेप्रमाणे प्रश्न मांडलेल्या सदस्यांपैकी जर पहिला सदस्य अनुपस्थितीत असेल तर दुसरा सदस्य बोलण्यासाठी उभा राहतो आणि दुसराही सदस्य उपस्थित नसेल तर तिसरा सदस्य त्या प्रश्नावर बोलण्यासाठी उभा राहतो.

श्री.विनोद तावडे : सदर सदस्य हे बॅलेटलाही उपस्थित नसतात.

श्री.संजय दत्त : या सभागृहामध्ये आपणा सर्वांसमोर मी अतिशय सन्मानाने बोलत आहे की,या सदनातील कामाची पध्दत या सदनातील काही ज्येष्ठ सदस्यांकडूनच मी जाणून घेतलेली आहे. या सिस्टममध्ये जर कोणत्याही प्रकारची शंका कोणाला असेल तर प्रश्नांच्या बॅलट सिस्टमसमोर आपण सर्व एकत्र बसून तारांकित प्रश्नांचे बॅलेट काढूया व प्रेझेंटेशन करुया म्हणजे हे पॅटर्नही मेंटेन राहील माझी यालाही संमती आहे म्हणजे पुढच्या सेशनला कोणाच्याही मनामध्ये कोणत्याही प्रकारची शंका राहणार नाही. तरीदेखील त्यामध्ये जर काही शंका आपल्याला आढळून आल्या तर आपण त्यासंबंधी योग्य ती कारवाई करावी.

श्री.विक्रम काळे : तारांकित प्रश्नांसबंधी अतिशय गंभीर अशा प्रकारचा मुद्दा या ठिकाणी उपस्थित झालेला आहे. आमच्या प्रश्नांच्या संदर्भातील सर्व माहिती आम्हाला वेळेवर प्राप्त होत नाही. सदस्यांनी प्रश्न विचारल्यानंतर त्याची गोपनीयता सुध्दा राखली जात नाही. संदर्भित विषयाबाबत अमुक अमुक या आमदारांनी यासंदर्भात प्रश्न विचारलेला आहे,अशा प्रकारची माहिती संबंधितांना जाते आणि मग ते लोक आम्हाला भेटावयाला येऊन आमच्यावर निरनिराळया प्रकारे दबाव टाकण्याचेही प्रकार घडलेले आहेत. ज्या व्यक्तीच्या संदर्भात प्रश्न आहे त्या व्यक्तीला त्या जिल्हयामध्ये तालुक्यामध्ये फोन करुन कळविले जाते म्हणजे आम्ही विचारलेल्या प्रश्नांबाबत आणि आमच्या नावांबाबत गोपनीयता राखली जात नाही. तारांकित प्रश्नांच्या बाबतीतील ही कोणत्या प्रकारची व्यवस्था आहे ? याविषयी गंभीर दखल सभागहाने घेतली पाहिजे, असे माझे मत आहे.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय,आपल्याला सगळयात पहिल्यांदा मला विनंती करावयाची आहे आपण गेल्या अधिवेशनामध्ये कबूल केले होते की, अधिवेशन काळामध्ये विशेष वेळ देऊन नियम समितीची बैठक तातडीने आयोजित करण्यात येईल. या बैठकीमध्ये या सर्व गोष्टींची सविस्तर चर्चा करुन लिखित स्वरुपात आपल्याकडे देता येईल. या ठिकाणी दोन महत्वाचे गोंधळ झालेले आहेत, एक म्हणजे तारांकित प्रश्नांच्या संदर्भातील माझाही एक असा अनुभव आहे की,

R - 3



JPK/ KGS/ MAP/ प्रथम श्री.शिगम एम. ........ 13:25

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी......

सचिव स्तरावरील जेवढे प्रश्न आहेत,त्यांची उत्तरे किंवा माहिती व्यवस्थित व वेळेवर येत नाहीत. आमच्या सचिवांविषयीच्या तक्रारींच्या संदर्भातील प्रश्न जाणीवपूर्वक डावलले जातात. मला असे वाटते की, ब्यूरोक्रसी ही लेजिस्लेशनवर ओव्हरपॉवर होत आहे आणि हाच त्यातील एक सर्वमुखी सूर आहे. या दृष्टीकोनातून मला आपल्याला विनंती करावयाची आहे की, तारांकित प्रश्नांच्या स्वीकृती व अस्वीकृतीविषयी योग्य ती काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. सचिवांच्या तक्रारीविषयीचे माझे चार प्रश्न जे मी प्रायोरिटीने दिलेले होते ते प्रश्न अजूनही चार ठिकाणी प्रलंबितच ठेवण्यात आलेले आहेत. या निमित्ताने माझी शासनाला एकच विनंती आहे की, यासंदर्भात योग्य ती दखल वेळेवर घेणे आवश्यक आहे व ती घेण्यात यावी. स्वीकृत तारांकित प्रश्नांची बॅलट सिस्टम ही खूप फॉल्टी आहे. जो प्रश्न माननीय सभापतींनी स्वीकृत केला तो स्वीकृत झाला अशी पध्दत या ठिकाणी आहे आणि दुसरे म्हणजे सकाळी 11.00 वाजता स्वीकृत केलेले प्रश्न 1.3.5.मध्ये येतात आणि दुपारी 3.00 वाजता स्वीकृत केलेले तारांकित प्रश्न 2.4.6. मध्ये स्वीकृतीसाठी येतात.

यानंतर श्री.कानडे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. श्रीकांत जोशी ....

ही जी घोळ घालण्याची पध्दत आहे ती बरोबर नाही. एखाद्या सदस्याने दिलेले सगळे प्रश्न असतील त्यातील स्वीकृत झालेले प्राथम्यक्रमावर येतील आणि अस्वीकृत झालेले बॅलटमध्ये आले पाहिजेत. प्रश्नांच्या बाबतीत पारदर्शकता असली पाहिजे. प्रेझेंटेशन होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे संगणकाचा वापर होणे आवश्यक आहे. ऑनलाईन व्यवस्था सुरु केली व आम्हांला आमचा पासवर्ड दिला तर ट्रॅक रेकॉर्ड होऊ शकेल. या सर्व व्यवस्थेमध्ये अत्याधुनिकता आणावी अशी माझी आपणांस विनंती आहे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, सदनामध्ये मी एकमेव दलित आमदार आहे. यापूर्वी माझ्याबरोबर प्रा. जोगेंद्र कवाडे होते परंतु त्यांनी सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे.....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, ॲड. प्रीतमकुमार शेगांवकर यांच्यावर अन्याय होत आहे.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, ॲड. शेगांवकर हे मंत्री आहेत. मी आमदारांसंबंधी बोलत आहे. मंत्र्यांसंबंधी नाही. सभापती महोदय, दलितांसंबंधी घटनेमध्ये कलम 14,14(1),16,35,46 अनुसार तरतूद करण्यात आली आहे......

**सभापती** : या सदनामधील जे सन्माननीय सदस्य आहेत त्यांना सदनामध्ये विषय उपस्थित करण्यासंबंधी जी वेगवेगळी आयुधे दिलेली आहेत त्या आयुधांच्या वापरासंबंधी आपल्या काही सूचना असतील तर त्या मांडाव्यात.

श्री. रमेश निकोसे : सभापती महोदय, मी दिलेले प्रश्न आणि लक्षवेधी रिजेक्ट करण्यात आल्या आहेत. ज्या अधिकाऱ्यांनी माननीय मुख्यमंत्र्यांची दिशाभूल केली त्यांच्यावर आयपीसी प्रमाणे गुन्हा दाखल होऊ शकतो. कृपा करुन आमचे प्रश्न लागले जावेत अशी माझी विनंती आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मुझे ऐसा लगता है कि सिस्टम को अपग्रेड करने का समय आ गया है. पिछले 5 साल से हमें लॅपटॉप दिए गए हैं, उनका वापर अच्छी तरह से करना चाहिए. पारदर्शकता के लिए ऑन-लाइन सिस्टम निर्माण करने की आवश्यकता है. आजकल परीक्षाएं भी ऑन-लाइन होती हैं. बॅलट निकालने की शुरुआत ऑन-लाइन करनी चाहिए, ताकि घर बैठे हम बॅलट में भाग ले सकें.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

18-07-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) S-2

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, आता आम्ही नवीन सदस्य राहिलो नाहीत. आमचे हे तिसरे अधिवेशन आहे. तारांकित प्रश्न आणि लक्षवेधी मी दिल्या होत्या त्यातील माझा एक प्रश्न लागला होता परंतु तो सभागृहातील गोंधळामुळे चर्चेला येऊ शकला नाही.

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर.........

एक लक्षवेधी सूचना स्वीकृत झाली. त्यापलिकडे आम्हाला काहीही मिळालेले नाही. सभागृहामध्ये आमच्या मतदारक्षेत्रातील प्रश्न मांडण्याची संधी आम्हाला मिळत नाही. खऱ्या अर्थाने कार्यपध्दती चुकीची आहे. माझी सूचना आहे की, विधिमंडळाच्या वैधानिक समित्यांच्या बैठका बुधवारी घेतल्या जातात. त्या दिवशी बॅलेट घेण्यात आले तर अनेक सन्माननीय सदस्यांना उपस्थित राहता येईल. बॅलेट ज्या दिवशी घेण्यात येते त्या दिवशी अनेक अडचणींमुळे सन्माननीय सदस्य उपस्थित राहू शकतच नाही. म्हणून बॅलेटचा दिवस बुधवारी किंवा मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या दिवशी निश्चित केला तर सर्वच सन्माननीय सदस्यांना न्याय मिळेल अशी माझी सूचना आहे.

**सभापती** : दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांनी या सदनाचे प्रतिनिधी या अनुषंगाने याठिकाणी येत असताना जनतेच्या ज्या काही व्यथा, प्रश्न आहेत ते मांडण्याकरिता ज्या प्रकारची आयुधे आहेत, ती आयुधे वापरण्याच्या अनुषंगाने अत्यंत योग्य पध्दतीने न्याय मिळावा यादृष्टीने अनेक विधायक सूचना केलेल्या आहेत. मी या संदर्भात दोन सूचना आपल्याला करणार आहे. हा प्रश्न व्यापक म्हणून चर्चेसाठी एका ठराविक दिवशी आपण मध्यवर्ती सभागृहामध्ये एकत्र बसू. आज प्रचलित असणारी पध्दत, त्या पध्दतीच्या अनुषंगाने सुध्दा आपण चर्चा केली पाहिजे. ही पध्दत गेली साडेतीन वर्षे मी या स्थानावर आहे, त्या दरम्यानच्या काळात निर्माण झालेली पध्दत नाही. त्यापूर्वीची ही पध्दत आहे. मधल्या काळात मी नियम समितीच्या एक-दोन बैठका घेतल्या होत्या. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य प्रा.बी.टी.देशमुख व इतर काही सन्माननीय सदस्य बैठकीला उपस्थित होते. दिनांक 12 जून, 2007 रोजी मी नियम समितीची बैठक आयोजित केली होती. काही सन्माननीय सदस्यांनी मला विनंती केली की, तो दिवस त्यांना सोयीचा नाही. त्यामुळे मी ती बैठक पुढे ढकलली होती. या पध्दतीमध्ये काही त्रुटी आहेत किंवा अन्य अडचणी आहेत त्या अनुषंगाने मला देखील वाटते की, नियम समिती व विरोधी पक्षनेते, गटनेते यांच्या माध्यमातून चर्चा करुन काही सन्माननीय सदस्यांच्या मनामध्ये असणारी भावना पूर्णपणे दूर करावयाची असल्यास एका ठराविक दिवशी मध्यवर्ती सभागृहामध्ये एकत्रित चर्चा करु. आज विधानपरिषदेमध्ये जी पध्दत आहे, विधानसभेमध्ये जी पध्दत आहे त्यामध्ये कोणता बदल हवा आहे यावरही आपण चर्चा करु. कोणत्या निकोप पध्दतीचा अवलंब करावयाचा हे निश्चित करु. एक गोष्ट निश्चित आहे की,

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**...............

सन्माननीय सदस्यांनी विचारलेला कोणताही प्रश्न असेल, नियम 93 ची सूचना किंवा अन्य कोणता प्रश्न असला तरी त्याची गोपनीयता 100 टक्के पाळली पाहिजे या अनुषंगाने अत्यंत कठोर पध्दतीने विधिमंडळ सचिवालयाला सूचना देण्याची व्यवस्था केली जाईल. यामध्ये ज्यांच्याकडून अशा पध्दतीची काही चूक दिसून येईल त्यांच्यावर मी कठोर कारवाई करेन. त्या त्या विभागामध्ये जे कर्मचारी 2-3 वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी एकाच ठिकाणी कार्यरत असतील त्यांना तातडीने बदलण्याची व्यवस्था करण्यात येईल. सध्याच्या पध्दतीमध्ये काहीतरी बदल झाला पाहिजे असे मला स्वत:ला वाटते. तो बदल करुन सुध्दा तुमच्या मनातील शंकांचे पूर्णपणे समाधान होणार नाही असे मला वाटते. म्हणून मी यापूर्वी माझ्यासमोर एक नस्ती आली होती त्यामध्ये मी असे ठरविले की, येत्या आठवड्यात विरोधी पक्षनेते व गटनेते यांची एक बैठक माझ्या दालनात एक-दोन तासाकरिता घेईन. त्यापेक्षा अधिक माझी सूचना आहे की, एक दिवस आपण मध्यवर्ती सभागृहामध्ये एकत्रित बसू आणि मध्यवर्ती सभागृहामध्ये सध्याची संपूर्ण पध्दत समजावून घेऊ. त्यामध्ये असणारे दोष किती आहेत तेही आपण समजावून घेऊ. कोणाच्याही मनामध्ये कोणताही संदेह न राहता एकंदरीत ही व्यवस्था अत्यंत सुदृढ होईल असा प्रयत्न केला जाईल.

(नंतर श्री.जुन्नरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती .....**

सन्माननीय सदस्य श्री. मधुकर चव्हाण यांनी या पूर्वीच्या अधिवेशनामध्ये विचारलेले प्रश्न, यावेळच्या अधिवेशनामध्ये विचारलेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने त्यांचे किती प्रश्न ॲडमिट झाले, किती प्रश्न अतारांकित झाले, किती प्रश्न अन्य प्रश्नांना जोडले गेले याची सर्व माहिती माझ्या दालनात माझ याकडे आहे. ज्यावेळी विरोधी पक्ष नेते तसेच गटनेते उपस्थित असतील त्यावेळी किंवा त्यांना बोलावून यासंदर्भातील ही सर्व माहिती देण्याची माझी इच्छा आहे. यासंदर्भातील जी पध्दत आहे ती अत्यंत निकोप झाली पाहिजे अशा पध्दतीने आपण प्रयत्न करीत असतांना एका सिटींगमध्ये किती लक्षवेधी सूचना द्याव्यात, खरे तर नियमाप्रमाणे दोन आहेत. मी असा निर्णय घेतला की, आपण चार लक्षवेधी सूचना घेऊ या. यासंदर्भात मी काही सन्माननीय सदस्यांबरोबर तसेच विरोधी पक्ष नेत्यांबरोबर अशी चर्चा केली की, एका तासात जर पाच लक्षवेधी सूचना घेतल्या परंतु, आज चार लक्षवेधी सूचना घेतलेल्या आहेत. कालच्या कामकाजामध्ये आपल्या लक्षवेधी सूचना घेता आल्या नाहीत. परंतु यासंदर्भात मी सांगितलेले आहे की, कालच्या लक्षवेधी सूचना लॅप्स झालेल्या नाहीत. या ठिकाणी अनेक जुने सन्माननीय सदस्य आहेत तसेच काही नवीन सन्माननीय सदस्य सुध्दा आहेत. मी सुध्दा जुना सदस्य होतो. माझ्या अनेक लक्षेवधी सूचना लॅप्स व्हायच्या तेव्हा कोणत्या पध्दतीचे दु:ख होते ते मी स्वत: अनुभवले आहे. त्यामुळे यासंदर्भात मी एक निर्णय घेतला आहे की, लक्षेवधी सूचना एक वेळ कार्यक्रम पत्रिकेवर आली तर तांत्रिक कारणासाठी ती लॅप्स करावयाची नाही. दुसरे असे की, लक्षवेधी सूचना जर 500 असतील आणि वर्कींग डे 15 जरी धरले तरी पंधरा चोक साठ तरी लक्षवेधी सूचना येणार, आणि 500 लक्षवेधी सूचना असतांना, त्यापैकी 350 किंवा 400 लक्षवेधी सूचना ॲडीमीट झाल्या असतांना कोणत्याही 60 लक्षवेधी सूचना येणार. आणि कोणत्याही 60 लक्षवेधी सूचना आल्यानंतर राहिलेल्या ज्या लक्षवेधी आहेत त्या जर ॲडमीट असतील तर आपण त्यांची उत्तरे शेवटच्या दिवशी देत असतो. पण त्या लक्षवेधी सूचना चर्चेला येतीलच अशी परिस्थिती नाही. जर प्रत्येंक सन्माननीय सदस्यांनी हीच इच्छा प्रगट केली की, माझ या जास्तीत जास्त लक्षेवधी सूचना चर्चेला याव्यात, तेव्हा त्या सुध्दा चर्चेला येण्याच्या दृष्टीने ज्या पध्दतीचा आपले कामकाज आहे त्यामध्ये त्या येण्याची शक्यता नाही. मी ढोबळ निर्णय असा घेतलेला आहे की, मी त्यामध्ये संख्याबळ बघितलेले नाही. काँग्रेस, राष्ट्रवादी, शिवसेना, भाजपची संख्या किती



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

हे न बघता मी ढोबळ निर्णय असा घेतला आहे की, दररोज चार लक्षवेधी सूचनेमध्ये प्रत्येक पक्षाची एक एक लक्षवेधी सूचना येईल. एखाद्या पार्टीची सदस्य संख्या 9 असेल तर त्यांची लक्षवेधी सूचना एक येईल. एखाद्या पार्टीची संख्या 20 असली तरी सुध्दा त्यांचीही लक्षवेधी सूचना एक येईल. अपक्ष जे सन्माननीय सदस्य आहेत त्यांच्याही लक्षेवधी सूचना दरम्यानच्या काळामध्ये बसविण्याचा मी प्रयत्न करीन. सन्माननीय सदस्यांना मी यादृष्टीने विचारेन की, उद्या आपल्याला पाहिजे असेल तर गेल्या अधिवेशनामध्ये ज्या लक्षवेधी सूचना आपण ॲडमिट केल्या, ज्या लक्षवेधी सूचना चर्चेला आल्या त्याचे सर्व डिटेल्स जरुर देण्याची व्यवस्था करेन. या व्यतिरिक्त 93 च्या सूचनेच्या अनुषंगाने सन्माननीय सदस्यांची अपेक्षा अशी आहे की, नियम 93 ची सूचना मी जेव्हा ॲडमिट करतो तेव्हा त्याचे निवेदन तातडीने यावे. यासंदर्भात मी माझ्या कार्यालयाला सूचना केलेल्या आहेत की, त्या दिवशी किती निवेदने आली, कोणत्या विभागाला गेली या अनुषंगाने संसदीय कामकाज विभागाच्या माध्यमातून येथे तातडीने निवेदन होईल अशी व्यवस्था करा. दैनंदिन जर विचार केला तर आपण किती निवेदन स्वीकारली त्याचा उपयोग होईल. कालच्या कामकाजात आपण 93 च्या सूचना घेऊ शकलो नाही. 93 च्या सूचनेच्या संदर्भात माझा जो निर्णय आहे तो कालचा जो आहे तोच आजचाही आहे. विशेष उल्लेखाच्या संदर्भात बोलावयाचे झाल्यास कालसुध्दा आपण विशेष उल्लेख घेऊ शकलो नाही त्यामुळे कालचेही विशेष उल्लेख आज घेण्याचे मी ठरविलेले आहे.

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय सभापती**..........

आपण या सर्व पध्दती केल्या तरी काही सन्माननीय सदस्यांच्या अपेक्षा असतात त्या पूर्ण करण्याकरिता एकंदरीत जे टाईम शेड्युल आहे त्यामध्ये बसविण्याचा प्रयत्न केला तरी त्याला काही मर्यादा आहेत. मी स्वत:बद्दल असे सांगू इच्छितो की, माझे सभापती या नात्याने जे वर्तन आहे, त्याबाबत या सभागृहात यत्किंचितही संशय व्यक्त केला तर त्या क्षणी या खुर्चीवर बसण्याचा मला नैतिक अधिकार नाही म्हणून मी येथून जाण्याची मानसिक तयारी करणारा एक प्रामाणिक कार्यकर्ता आहे यादृष्टीने माझी मानसिकता आहे.

मी आपणा सर्वांना सांगू इच्छितो की, यापूर्वी सुध्दा नियम समितीच्या दोन वेळा बैठका घेतल्या होत्या. दिनांक 12 जून 2007 रोजी सुध्दा नियम समितीची बैठक ठेवली होती. त्या बैठकीमध्ये प्रश्नोत्तराच्या तासाला जास्तीत जास्त प्रश्न चर्चेला यावेत याकरिता ती बैठक ठेवली होती. परंतु त्या दिवशी नियम समितीची बैठक झाली नाही. येत्या चार दिवसांत माननीय विरोधी पक्ष नेता, गट नेत्यांची बैठक घेतली जाईल. तसेच येत्या सात-आठ दिवसांमध्ये सेंट्रल हॉलमध्ये बैठक घेऊ. त्या बैठकीत सन्माननीय सदस्यांच्या सर्व शंकाचे निरसन होईपर्यंत चर्चा करु. या सर्व गोष्टी करीत असताना जर एका अधिवेशनात 500 लक्षवेधी सूचना आल्या असतील तर प्रत्येक सदस्याने माझी प्रत्येक लक्षवेधी सूचना चर्चेला आली पाहिजे अशी अपेक्षा करणे बरोबर होणार नाही. सन्माननीय सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांच्या 20 लक्षवेधी सूचना मंजूर झाल्या असतील तर त्या 20 लक्षवेधी सूचना चर्चेला आल्या पाहिजेत असा आग्रह धरणे बरोबर होणार नाही. यापैकी काही सूचना स्टेटमेंटमध्ये येतील तर काही प्रेस होतील. माझी स्वत:ची अशी इच्छा आहे की, प्रश्नोत्तराच्या तासामध्ये दररोज किमान 10-12 प्रश्न पूर्ण केले पाहिजेत. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीमध्ये सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांचा नवव्या क्रमांकावर प्रश्न होता. तो प्रश्न चर्चेला यावा असे मलाही वाटत होते. परंतु प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात झाल्यानंतर नियम 289 अन्वये सूचना देण्यात आली होती त्यावर प्रश्नोत्तराच्या तासाची आठ मिनिटे गेली म्हणून मी आठ मिनिटे वाढवून दिली. कारण प्रश्नोत्तराच्या तासाचा पूर्ण वेळ प्रश्नोत्तरासाठी खर्च व्हावा असे मला वाटते. एवढे करुनही सन्माननीय सदस्य श्री.मधुकर चव्हाण यांचा प्रश्न त्या वेळेमध्ये चर्चेला येऊ शकला नाही.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**माननीय सभापती**..........

माझी स्वत:ची अशी इच्छा आहे की, आपण सर्वांनी मला किंवा पीठासीन अधिकाऱ्यांना सहकार्य देणे गरजेचे आहे. त्यामुळे दररोज एका दिवशी किमान 10-12 प्रश्न उत्तरीत होतील. जेणेकरुन सन्माननीय सदस्यांनी प्रयत्न करुन तारांकित प्रश्न शेडयुलमध्ये आणले त्यास न्याय मिळू शकेल. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील पहिले दहा प्रश्न पाहिल्यास पहिला प्रश्न सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे यांचा होता, दुसरा प्रश्न श्री.वसंतराव चव्हाण यांचा होता, तिसरा प्रश्न श्री.श्रीकांत जोशी यांचा होता, तो मी तहकूब केलेला आहे. चौथा प्रश्न श्री.शरद रणपिसे यांचा, पाचवा प्रश्न श्री.मुझफ्फर हुसेन यांचा, सहावा प्रश्न श्री.जगदीश गुप्ता यांचा, सातवा प्रश्न श्री.संजय दत्त यांचा, आठवा प्रश्न श्री.सय्यद जामा यांचा, नववा प्रश्न श्री.मधुकर चव्हाण यांचा तर दहावा प्रश्न श्री.अरविंद सावंत यांचा होता. आपण दहा प्रश्नांचा हिशेब काढला तर मघाशी सांगितलेली परिस्थिती आणि येथे असणारी परिस्थिती त्यामध्ये नकळत थोडा फरक आहे.

माझी इच्छा आहे की, प्राथम्यक्रम कसा लावला जातो हे आपण सर्वांनी समजून घेतले पाहिजे. हे गणित तसे फार क्लिष्ट आहे असे मला वाटते. गेल्या तीन वर्षात मी हे गणित केलेले नाही. यापूर्वी नियम समितीच्या माध्यमातून केलेली जी पध्दत आहे, ती काही प्रमाणात बदलावी असे मला स्वत:ला वाटते. त्या दृष्टीने हे दोन निर्णय घेतलेले आहेत. अत्यंत आपुलकीने आणि आपल्या मनामध्ये जी खदखद होती ती आपण याठिकाणी मांडलेली आहे. माननीय उपसभापती येथे असताना हा विषय उपस्थित झाला. तेव्हा मी बाजूच्या कक्षात बसलो असल्यामुळे मला लगेच येथे येता आले आणि याबाबतीत आपल्या सर्वांचे म्हणणे ऐकून निर्णय दिलेला आहे. मी एवढेच सांगेन की, ट्रान्सपरन्सी आणि ऑन लाईनच्या दृष्टीने निश्चितपणे प्रयत्न होतील ज्यामुळे अत्यंत चांगल्या पध्दतीने हा निर्णय होऊ शकेल.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही.

प्रा.बी.टी.देशमुख : सभापती महोदय, आपण सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना विचारात घेऊन जे मत व्यक्त केले, त्याबद्दल मी आपला मन:पूर्वक आभारी आहे. आपण आता जे दोन निर्णय घेतले, त्याप्रमाणे दोन्ही बैठका होतील व त्यामध्ये निर्णयही आपण घेऊ. या दोन-तीन गोष्टीबाबत आपण आता जी घोषणा केली, ती पुढच्या आठवडयात जरी केली असती तरी चालली असती. कारण, हा भाग पूर्णपणे प्रशासकीय आहे. याठिकाणी मी अशीही विनंती करतो की, अस्वीकृत प्रश्नांची कारणे ताबडतोबीने कळविणे आवश्यक आहे. तसेच, दुसरी गोष्ट स्वीकृत/अस्वीकृत प्रश्नांचे निर्णय कळविण्याच्या बाबतीतची आहे. आता आपण प्रत्येकांस संगणक दिलेले असल्यामुळे ई-मेल ॲड्रेसवर कम्युनिकेट करु शकता, तशा पध्दतीची ताबडतोबीने व्यवस्था करावी. तसेच, हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपीही आपण देऊ शकता. आपली जूनी पध्दत बंद करुन हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपीही देण्याची व्यवस्था करावी. मंत्रालयातूनसुध्दा हार्ड कॉपी व सॉफ्ट कॉपी आली पाहिजे. आपण आता जो निर्णय घेतला, तो भाग पूर्णपणे प्रशासकीय असल्यामुळे याबाबतीत आपण पुढच्या आठवडयात जरी निर्णय घेतला असता तरी चालले असते. आपण याठिकाणी बैठक बोलावण्याचा जो निर्णय घेतला त्याबद्दल मी आपला मन:पूर्वक आभारी आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, आम्ही याठिकाणी ज्या व्यथा मांडल्या त्याची नोंद आपण घेतली, याबद्दल मी आपला आभारी आहे. त्याचबरोबर याठिकाणी मी मुद्दाम सांगू इच्छितो की, विशेष उल्लेखाच्या सूचना सन्माननीय सदस्यांकडून देण्यात येतात, परंतु त्याचे उत्तर शासनाकडून एक महिन्यात येत नाही. आपण ज्या ज्या प्रश्नाबाबत निर्देश देता, त्या बाबतीत शासनाकडून जसा प्रतिसाद यावयास पाहिजे तसा तो येत नाही. त्यामुळे यासंदर्भात ज्यावेळी सदनामध्ये माननीय मुख्यमंत्री व माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित असतात त्यावेळी आपण हा विषय काढून त्यांना याबाबतीत सक्त सूचना द्याव्यात. मंत्रिमहोदयांच्या भेटी घेऊन त्यांना आम्ही पत्र देतो त्याची साधी पोचही ते पाठवत नाहीत, अशी आजची परिस्थिती आहे. अशाप्रकारे लोकप्रतिनिधींची किंमत कमी करण्याचे शासनाचे प्रयत्न चालले आहेत, याला कुठेतरी आवर घालण्याची आवश्यकता आहे. माननीय सभापती महोदय, हे आपणच करु शकता, म्हणून मी आपल्याला विनंती करीत आहे. ही जी सगळी आयुधे आहेत, ती इन-इफेक्टीव्ह न होऊ देता, ती परिणामकारक व्हावयास पाहिजेत, असे मला आपणांस विनम्रपणे सुचवावयाचे आहे. आणखी दोन

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार....

गोष्टींचा उल्लेख मला करावयाचा आहे. एक म्हणजे, प्रोटोकॉलबद्दल आपण आपल्या दालनात बैठक घेऊन संबंधितांना सूचना दिल्या, परंतु प्रोटोकॉलचा निर्णय आम्हा कोणालाही अजूनही मिळालेला नाही. त्याचा खूप मोठा प्रॉब्लेम आहे. तसेच, दुसरी गोष्ट अशी की, सर्व लोकप्रतिनिधींना टोलनाक्यावर त्यांचे कार्ड दाखविण्याची पाळी येते. त्याठिकाणी असलेला अशिक्षित कर्मचारी आमचे कार्ड घेऊन, त्याला दोन तीन वेळा उलटपालटे करुन पाहतो, तो माणूसही बिहारी असतो, नंतर आणखी दोन माणसांना तो कार्ड दाखवतो, ते फार इन्सल्टिंग आहे. त्यामुळे याबाबतीतही उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. यासंदर्भात आपण काहीच करणार नसाल तर आपण जाहीर करुन टाकावे की, कुठल्याही लोकप्रतिनिधीस अशाप्रकारची सवलत मिळणार नाही. मग, हा प्रश्नच मिटून जाईल.

**सभापती** : प्रोटोकॉलच्या अनुषंगाने आणि आपण प्रवास करतो त्यावेळी अनेक टोलनाक्यावर ज्या पध्दतीने प्रयत्न होतो, त्याबाबतीत यापूर्वीच चर्चा झालेली आहे. यामध्ये एक म्हणजे, अत्यंत चांगल्या पध्दतीचे ओळखपत्र देणे व दुसरे म्हणजे, प्रोटोकॉलच्या अनुषंगाने कुठल्याही टोलनाक्यावर आपले वाहन अडवता कामा नये, असे त्यावेळी मी सांगितले होते. परंतु याबाबतीत मला कायदेशीर अडचण सांगितली गेली. परंतु ती ताबडतोबीने सॉल्व्ह करावी व कायदेशीर अडचणीच्या नावाखाली आपण लोकप्रतिनिधींना अकारण थांबवू नये, असेही मी सांगितले होते. याठिकाणी माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री, श्री.अनिल देशमुख साहेब उपस्थित आहेत, त्यांनी याबाबतीत पुढकार घेणे आवश्यक आहे.

श्री.अनिल देशमुख : सभापती महोदय, होय.

श्री.श्रीकांत जोशी : सभापती महोदय, काल टेबल केलेली कागदपत्रे आम्हाला मिळालेली नाहीत. गेल्या अधिवेशनातील आश्वासनांची यादी पटलावर ठेवली जाते, ती मिळालेली नाही.

**सभापती** : ठीक आहे. ते मी तपासून पाहतो.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्र्यांचे निवेदन येणे बाकी आहे.

**सभापती** : ते निवेदन करणार आहेत.

नंतर श्री.रोझेकर....

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(**सभापतीस्थानी** : **माननीय उपसभापती**)

**पृ.शी.**: अकरावी महाविद्यालयीन प्रवेश मिळण्याबाबत

**मु.शी.**: अकरावी महाविद्यालयीन प्रवेश मिळण्याबाबत यासंबंधी माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे निवेदन

प्रा.वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, अकरावी महाविद्यालयीन प्रवेश मिळण्याबाबतच्या प्रश्नासंबंधी नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने माननीय सभापती महोदयांनी दिलेल्या निदेशानुसार मी आपल्या अनुमतीने नियम 47 अन्वये पुढील निवेदन करतो :-

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

..2..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, या अनुषंगाने सभागृहामध्ये विचारलेले एक-दोन प्रश्न फार महत्वाचे आहेत. सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई..व एस.एस.सी.यामध्ये मार्किंगमुळे निर्माण झालेल्या फरकाचा हा भाग आहे. बोर्डात पहिली आलेली मुलगी सी.बी.एस्.ई. व आय.सी.एस.ई.च्या विद्यार्थ्यांमुळे दहावी ठरते. सभागृहाला माझी विनंती आहे की, भविष्यातील प्रवेश प्रक्रिया निश्चित करण्यासाठी एका अभ्यास गटाची निर्मिती करणे गरजेचे आहे. कारण, प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांमध्ये 80 टक्के विद्यार्थी बोर्डाचे आहेत व केवळ 10 ते 20 टक्के विद्यार्थी सी.बी.एस.ई.किंवा आय.सी.एस.ई.ची आहेत. या विद्यार्थ्यांमुळे स्थानिक मुलांना प्रवेश मिळत नाही. परंतु, यासंदर्भात शासनाकडून निश्चित भूमिका घेतली जाईल. अभ्यास गट तयार करुन महाराष्ट्रातील विद्यार्थी वंचित राहणार नाहीत, याची दक्षता घेण्यात येईल. निश्चित यासंदर्भातील ज्या कायदेशीर बाबी आहेत त्याही लक्षात घेतल्या जातील. चांगल्या महाविद्यालयात प्रवेश मिळावा, अशी सर्वच विद्यार्थ्यांची इच्छा असते व तो त्यांच्या स्वातंत्र्यांचाही भाग आहे, याचीही दखल घेतली जाईल.

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या विषयावर काल विधानसभेमध्येही चर्चा झालेली आहे. खालच्या सभागृहामध्ये शासनाला असे आदेश दिलेले आहेत की, ज्या ठिकाणी विद्यार्थ्यांना प्रवेश मिळत नाही, त्या ठिकाणच्या महाविद्यालयामध्ये जादा तुकडया वाढवून विद्यार्थ्यांचे समायोजन करण्याचा निर्णय झालेला आहे. या जादा तुकडया कायम विनाअनुदानित किंवा विनाअनुदानित तत्वावर न देता त्या शाळेमध्ये किंवा त्या महाविद्यालयांमध्ये अनुदान तत्वावरच द्याव्यात, अशा प्रकारचा निर्णय खालच्या सभागृहामध्ये झालेला आहे. या ठिकाणी मात्र माननीय मंत्री महोदय निवेदन करतांना कायम विनाअनुदानित असा उल्लेख करीत आहेत. याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, खालच्या सभागृहातील सर्व सन्माननीय सदस्यांनी अशी आग्रही भूमिका घेतली होती की, तुकडया विनाअनुदान तत्वावर द्याव्यात. आठ दिवसामध्ये ही नस्ती मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येईल आणि यासंदर्भात मंत्रिमंडळाने योग्य तो निर्णय घ्यावा, अशी मी विनंती करणार आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मूळ प्रश्न अजूनही सुटलेला नाही. शासनाने तुकडया वाढवून दिलेल्या आहेत किंवा विद्यार्थी संख्या वाढवून देणार दिली जाणार आहे. प्रवेश प्रक्रिया देतांना विशिष्ट टक्क्यांवर कट ऑफ असतो. मागच्या वर्षी एखाद्या महाविद्यालयात 83 टक्क्यांवर कटऑफ होता तर तो आता या वर्षी 85 टक्क्यांवर आला आहे. वास्तविक पाहता विद्यार्थ्यांना त्याच कॉलेजमध्ये प्रवेश मिळणे क्रमप्राप्त आहे. ही तुमची चूक आहे, विद्यार्थ्यांची चूक नाही. तुम्ही गणिताचे 30 मार्क वाढवून दिले म्हणून टक्केवारी वाढलेली आहे. विद्यार्थ्यांवर तुम्ही अन्याय का करीत आहात ? विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षेमतेनुसार ज्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळावयास पाहिजे, त्या कॉलेजमध्ये त्यांना प्रवेश मिळालाच पाहिजे, ही आमची आग्रही भूमिका होती. आज सकाळी मी साठे महाविद्यालयामध्ये जाऊन आलो. साठे महाविद्यालयाच्या संचालकांनी मला असे सांगितले की, तुम्ही तिकडे बसून कायदे तयार करता, परंतु येथे आमची काय परिस्थिती होते याची तुम्हाला कल्पना आहे काय ? अशा प्रकारचा प्रश्न विचारला जातो. शिक्षण संस्थांवर शासनाचे नियंत्रण नाही, हे यातून स्पष्ट होते.

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, प्रवेशाच्या संदर्भात एखादा शिक्षण संचालक अशा प्रकारे उद्दामपणे वागत असेल तर शासन त्याची निश्चितपणे दखल घेईल.

श्री.जी.एल.ऐनापुरे : सभापती महोदय, अद्याप मूळ प्रश्न सुटलेला नाही. माननीय शिक्षण मंत्री महोदयांनी जे निवेदन केलेले आहे, ते पूर्णपणे विसंगत आहे. शासनाने सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याचे मान्य केलेले आहे. मग या अटी कशासाठी ? यामुळे सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश मिळणार नाही. डिसेंबर पर्यंत प्रवेश प्रक्रिया सुरु राहणार आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला प्रवेश दिला जाईल, असे शासनाने जनतेला आश्वासन दिलेले आहे. सर्व विद्यार्थ्यांना जर शासन प्रवेश देणार असेल तर या अटी कशासाठी ? विना अट सर्व विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाला पाहिजे. तुकडया किती वाढतात याचा शासनाने विचार करु नये.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, तुकडया किती वाढतात याचा विचार केला जाणार नाही. कायम विनाअनुदान तत्वावर तुकडया दिल्या जातील.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, शासनाचे आदेश अतिशय संभ्रमात टाकणारे आहेत. अनेक पालक सकाळी जिल्हापरिषदेमध्ये जातात आणि दुपारी कॉलेजमध्ये जातात. कॉलेजमध्ये गेल्यानंतर असे सांगितले जाते की, शासनाची परवानगी आलेली नाही. मग पालकांनी काय करावयाचे ?

यानंतर श्री.गागरे ........

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

PNG/ MAP/ SBT/ पूर्वी श्री.बोरले 14:05

डॉ.दीपक सावंत.....

लोक फी भरण्यास तयार आहेत परंतु कोठेही ॲडमिशन मिळत नाही. याबाबत शासनाने अक्षम्य दिरंगाई व चूक केलेली आहे आणि त्याचे परिणाम सर्वसामान्य पालकांना भोगावे लागत आहेत. माननीय सभापतींनी याबाबत लक्ष घालून स्वत:हून आदेश द्यावेत. कॉलेजला विनाअनुदान तत्वावर तुकडया मिळतील अशी व्यवस्था केली पाहिजे तसेच कॉलेजमध्ये येणाऱ्या मुलांना सरसकट ॲडमिशन देण्याचे अधिकार मॅनेजमेंटला देण्यात यावेत. परंतु शासनाचे अधिकारी काहीही करु देत नाही. माननीय सभापतींनी यामध्ये लक्ष घालून आदेश द्यावेत, अशी सभागृहाच्या वतीने मी विनंती करतो.

**उपसभापती** : प्रवेशाचा प्रश्न खरोखरच इतका निकडीचा असेल व सर्वत्र पालकांची कुतरओढ होत असेल तर शासनाने याबाबत सर्वांकडून व्यवस्थित माहिती मागवावी. प्रवेशापासून वंचित राहणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचा प्रवेश झाला पाहिजे.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, पुढील दोन दिवसात संपूर्ण चित्र स्पष्ट होणार आहे. कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही याची दक्षता घेतली जाईल. एकाच कॉलेजमध्ये आग्रही भूमिकेने प्रवेश मिळणार नाही. रुईया, डहाणूकर, साठे अशा काही नामांकित महाविद्यालयांना 10-10 सीटस् वाढवून दिलेल्या आहेत.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, केवळ शहरी विभागातील नव्हे तर ग्रामीण भागातील एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नये.

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, मी वारंवार सांगत आहे की, राज्यातील एकही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही.

**उपसभापती** : माननीय मंत्री महोदयांनी सांगितले आहे की, विशिष्ट कॉलेजमध्ये प्रवेश मिळण्यासाठी आग्रह धरु नये, हे बरोबर आहे. परंतु कॉलेजमध्ये प्रवेश प्रक्रिया करीत असताना त्या कॉलेजमध्ये प्रवेशापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची वेगळी मेरीट लिस्ट केली पाहिजे व त्यातल्या त्यात तुलनेने विद्यार्थ्यांला जवळ असलेल्या कॉलेजमध्ये प्रवेश दिला तर मोठया प्रमाणावर प्रश्न सुटेल. तशा प्रकारच्या काही सूचना आपण संबंधितांना करणार आहात का ?

प्रा.वसंत पुरके : प्रवेश प्रक्रियेविषयी एक नियमावली करणे गरजेचे आहे. दूरची मुलेही येथील चांगल्या कॉलेजमध्ये येतात व काही स्थानिक मुलांना प्रवेशापासून वंचित राहावे लागते. यासाठी काही उपाययोजना करण्याची देखील काळजी घेतली जाईल. .....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, प्रवेश प्रक्रियेत प्रचंड गोंधळ झाल्यामुळे एकूणच शिक्षण पध्दतीबद्दल निर्माण झालेला संताप मी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. स्टेट बोर्डामध्ये पहिली आलेली मुलगी प्रवेश प्रक्रियेत अनुक्रमे अकरावी गेलेली आहे. जेव्हा ती केळकर कॉलेजला ॲडमिशनसाठी गेली, तेव्हा तिचा मेरीटलिस्टमध्ये अकरावा नंबर लागला आहे. याचे कारण सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई. बोर्ड व आय.बी. हया शाळा 20 पैकी 19 मार्क विद्यार्थ्यांना देऊनच टाकतात. हा या दोन पॅटर्नमधील विद्यार्थ्यामध्ये होणारा गुणात्मक बदल आहे. या बदलाकडे महाराष्ट्र शासन कधी लक्ष देणार आहे ? नाही तर स्टेट बोर्ड पूर्ण बंद करुन टाकावे. महाराष्ट्रात सर्वत्र सी.बी.एस.ई. व आय.सी.एस.ई. बोर्ड करुन टाका, मराठी हद्दपार करुन टाका.

श्री.अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.जितेंद्र आव्हाड यांनी आताच त्यांच्या तीव्र भावना व्यक्त केलेल्या आहेत, त्यामध्ये एक मुद्दा मी सांगतो. सी.बी.एस.ई., आय.सी.एस.ई. बोर्डाची परीक्षा 500 मार्काची आहे. स्टेट बोर्डाची परीक्षा 650 मार्काची आहे. सी.बी.एस.ई. व आय.सी.एस.ई. बोर्डाच्या शाळांना 20 मार्क स्वत: देण्याचे अधिकार आहेत, त्यामुळे ते पैकीच्या पैकी मार्क विद्यार्थ्यांना मार्क दिले जातात. त्यामुळे स्टेट बोर्डाचे विद्यार्थी गुणवत्तेमध्ये चांगले असूनसुध्दा गुणात्मक पातळीमध्ये खाली जातात. याचे दुष्परिणाम पालकांना व विद्यार्थ्यांना भोगावे लागत आहेत. आता आपण उपाययोजना करीत आहात. तुकडया वाढविणे कठीण जाते परंतु संस्था तुकडया वाढविण्यास नकार देणार नाहीत. परंतु तुम्ही जेव्हा कायम विनाअनुदानित व विनाअनुदानित तत्वावर तुकडयांना मान्यता द्याल तेव्हा संस्था माघार घेतील. अनुदानित तत्वावर तुकडयांना मान्यता दिली तर ॲडमिशनच्या प्रश्नाबाबत अडचण येणार नाही. परंतु यामुळे परमनंट लायबिलीटी सरकारवर होणार आहे म्हणून या संदर्भातील निर्णय साकल्याने विचार करुन घेतला पाहिजे. याबाबत माझी विनंती आहे की, प्रत्येक कॉलेजमध्ये सायन्सच्या किमान 3-4 तुकडया असतात. सर्वसाधारणपणे 10 विद्यार्थी वाढवून हा प्रश्न सुटणार नाही तर प्रत्येक तुकडीमागे दहा विद्यार्थी असा विचार केला तर विद्यार्थी सामावले जातील.

नंतर श्री.सुंबरे .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. अरविंद सावंत ....

एका कॉलेजमध्ये मग ते एफ.वाय.सायन्स असेल वा आर्टस्, कॉमर्स असेल, त्या ठिकाणी चार तुकड्या असतील तर प्रत्येक तुकडीमागे 10 विद्यार्थी आपण वाढवून दिले असतील तर तेथे 40 विद्यार्थी वाढतील. तेव्हा तसे होऊ शकणार आहे काय या बाबत आपण स्पष्टपणे सांगावे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, तुकडीमागे 10 विद्यार्थी वाढवून देण्याचे आपण मान्य केलेले आहे. आता या ठिकाणी सीबीएससी, आयसीएसइ शाळांतील विद्यार्थ्यांच्या मानाने गुणांमध्ये आपल्या एसएससी बोर्डाचे विद्यार्थी मागे पडतात असा सन्माननीय सदस्यांचा वस्तुनिष्ठ प्रश्न आहे आणि मी आपल्याला सांगू इच्छितो की, एसएससी बोर्डाच्या बाबतीत आपण त्रिभाषा फॉर्म्युला स्वीकारला आहे आणि त्यामुळेच या प्रश्नावर विचार करून आम्ही येत्या आठ दिवसात कॅबिनेट पुढे जाऊ.

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्री प्रा. पुरके हे वेळोवेळी त्यांच्या खात्याशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांच्या संबंधात वेळोवेळी स्पष्टीकरण करीत असतात. खरे तर ते अधिकारी त्यांच्या त्या पदावर राहता कामा नयेत अशी त्यांची कार्यक्षमता असतानाही त्या अधिकाऱ्यांची अशा प्रकारे वेळोवेळी मंत्री महोदय भलामण करीत असतात की, ते अधिकारी चांगले काम करीत आहेत म्हणून. वस्तुत: आज राज्यामध्ये जी काही परिस्थिती निर्माण झ ालेली आहे त्याला संपूर्णत: त्यांची मशिनरी, शिक्षणाधिकारी आहेत मग ते तालुका पातळीवर असतील, जिल्हा पातळीवर असतील, त्यांच्या खात्याचे अधिकारी जबाबदार आहेत. उद्या परीक्षांचे निकाल लागल्यानंतर अशी अशी परिस्थिती निर्माण होईल हे लक्षात घेऊन त्यादृष्टीने आराखडा तयार त्यांच्याकडे नाही. सत्तारूढ बाकांवर बसून आम्हाला हे खेदाने सांगावेसे वाटते की, जी काही पाठ्यपुस्तके आपण निर्माण केली त्या अनुषंगाने गेली दोन अडीच महिने सातत्याने मंत्री महोदय टीव्ही वर आणि अन्य मार्गाने चर्चेमध्ये आहेत. त्या विषयातील एक्स्पर्टस् कडून जी पाठ्यपुस्तके तयार करवून घेण्यात आली म्हणून सांगितले गेले. त्या अनुषंगाने येथे लक्षवेधी सूचना दिलेली आहेच पण तरीही त्यामध्ये 350 च्या वर चुका मिळतात आणि या चुका दुरूस्त केल्यानंतर देखील ....

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जो विषय सांगत आहेत तो विषय वेगळा आहे. या विषयाचे आकलन होणे गरजेचे आहे. ....

...... एए 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. ....

श्री. गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मंत्री महोदय कोणाला संरक्षण देत आहेत ? ज्या अधिकाऱ्यांना खरोखरी त्या पदावर राहण्याचा देखील हक्क नाही त्यांना ते संरक्षण देत आहेत. खरे तर अशा अधिकाऱ्यांना रस्त्यावर उभे करून मारले पाहिजे, त्या अधिकाऱ्यांना ते संरक्षण देत आहेत, पाठीशी घालत आहेत ....

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कुलकर्णी यांना मी सांगू इच्छितो की, त्यांनी अतिशय जबाबदारीने येथे बोलले पाहिजे. मी कोठल्याही अधिकाऱ्याला पाठीशी घातलेले नाही, घालत नाही. मात्र चांगले काम करणाऱ्यांना चांगले म्हणण्याची भूमिका मी घेतली आहे. वाईट काम करणाऱ्याला मी कधीही पाठीशी घालणार नाही. ....

**उपसभापती** : या निवेदनावरील चर्चा संपली आहे .... आता यानंतर नियम 93 खालील सूचना घेण्यात येतील. ....

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कृपया आपण मला बोलण्यास परवानगी द्यावी. सभापती महोदय, माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांच्या संदर्भात आमचे लर्नेड फ्रेंड सन्माननीय सदस्य ॲड. गुरूनाथजी कुलकर्णी यांनी आज येथे फार गंभीर स्वरूपाचे आरोप केलेले आहेत. या सभागृहामध्ये सन्माननीय सदस्य श्री.कुलकर्णी यांनी पटापट अनेक आरोप, अगदी जोरदार असे आरोप शालेय शिक्षण मंत्र्यांवर केलेले आहेत. परंतु या बाबतीत पद्धत अशी आहे की, कोणावरही असे आरोप करावयाचे असतील तर त्यासाठी संबंधितांना अगोदर नोटीस दिली पाहिजे होती. आमचे मित्र सुसंस्कृत, सुशिक्षित, उच्च विद्याविभूषित आहेत, ते ॲडव्होकट जनरल या पदापर्यंत जाऊ शकतील अशी त्यांची योग्यता आहे. ....

( यानंतर श्री. सरफरे ..... बीबी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी व्यक्तिगत आरोप केलेले नाहीत. माननीय प्रा. वसंतराव पुरके हे या राज्याचे शिक्षण मंत्री आहेत. त्या पदावर असलेल्या व्यक्तिच्या संदर्भात मी बोललो आहे. त्यामुळे माननीय सदस्यांनी आरोप करण्यापूर्वी नोटीस द्यावी लागते हा उपस्थित केलेला मुद्दा मला मान्य नाही.

श्री. नितीन गडकरी : तुम्हाला डबल ॲडव्होकेट केले पाहिजे. याठिकाणी व्यक्ती आणि मंत्री असा भेदभाव होऊ शकत नाही. प्रा. वसंतराव पुरके यांच्यावर व्यक्ती म्हणून आरोप केले असा त्याचा अर्थ होऊ शकत नाही. प्रा. वसंतराव पुरके हे माननीय श्री. विलासराव देशमुख यांच्या सौजन्याने त्यांच्या मंत्रिमंडळामध्ये मंत्री म्हणून काम करीत आहेत. त्यामुळे ते व्यक्ती नसून मंत्री आहेत. तेव्हा माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांनी त्यांची क्षमा मागावी. त्यांनी व्यक्ती म्हणून नाही तर राज्याच्या शिक्षण मंत्र्यांवर फार गंभीर आरोप केले आहेत. खरे म्हणजे प्रा. पुरके साहेबांच्या कार्याबाबत मतभेद असू शकतात, त्यांनी घेतलेल्या निर्णयाबाबत नाराजी असू शकते. मी त्यांना गेल्या 20 वर्षापासून ओळखतो. त्यांनी घेतलेल्या चुकीच्या निर्णयाबाबत आपण त्यांच्यावर टीकाही केली आहे. परंतु आदिवासी समाजातील एक सुसंस्कृत सरळ व्यक्ती राज्याचे शिक्षण मंत्री म्हणून पुढे आली आहे...

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब आज आपण कुणाच्या फोटोला हार घालावयाचे ठरविले आहे? माननीय प्रा. वसंतराव पुरके साहेबांच्या की, माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांच्या?

श्री. नितीन गडकरी : त्यांच्या फोटोला हार घालण्याचा माननीय मुख्यमंत्र्यांचा प्रयत्न आहे. माझी माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना विनंती आहे की, त्यांनी स्वत: चर्चा ठेवावी. परंतु सभागृहामध्ये माननीय प्रा. वसंतराव पुरके यांच्या विरुध्द महाराष्ट्राच्या शिक्षण मंत्र्यांच्या विरुध्द आणि त्यांच्या विभागाच्या अधिकाऱ्यांबाबत ते जे काही बोलले ते सभागृहाच्या कार्यवृत्तामध्ये आहे. ते मी याठिकाणी उद्‌धृत करु इच्छित नाही. वास्तविक पहातां ही चर्चा अकरावी प्रवेशासंबंधीची आहे. आपण ॲडव्होकेट असल्यामुळे आपण याठिकाणी विषयाला धरुन बोलले पाहिजे. परंतु आपण विषयाला सोडून बोलला आहात. ज्या विषयासंबधी आपण बोलला आहात त्या विषयावर याठिकाणी चर्चा नव्हती.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : माननीय सदस्य श्री. गडकरी साहेब आपण थोर विधिज्ञ आहात. दोन्ही बाजूला दोन विधिज्ञ सभागृहामध्ये असल्यामुळे बाहेर जनतेचे फार नुकसान होत आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माझ्या पत्नीने मला काल फोन केला. आणि मला म्हणाली की, तुमच्या संदर्भातील वक्तव्य मी ऐकले आहे. तुम्ही देशामधील एक उत्कृष्ट वकील होऊ शकता. तेव्हा तुम्ही या सभागृहामध्ये कशासाठी वेळ फुकट घालविता? माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी यांना विनंती करतो की, तुम्ही नोटीस देऊन तुम्हाला जे बोलावयाचे असेल ते बोलावे. परंतु सभागृहामध्ये तो विषय नसतांना महाराष्ट्राच्या माननीय शिक्षण मंत्र्यांवर त्यांच्या अधिकाऱ्यांवर अशाप्रकारचे हेत्वारोप करणे बरोबर नाही, तोंडसुख घेणे बरोबर नाही. सभापती महोदय, मी आपणास विनंती करतो की, आपण त्यांचे शब्द कामकाजातून काढून टाकावेत. आणि त्यांनी सभागृहामध्ये दिलगीरी व्यक्त करावी. त्यांनी केलेले वक्तव्य या सभागृहाची प्रतिष्ठा वाढविणारे नाही. ते सभागृहाच्या नियमाविरुध्द आहे. सभागृहापुढे विषय नसतांना देखील त्यांनी माननीय शिक्षण मंत्र्यांविरुध्द आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या, हेत्वारोप केले ते नियमाला धरुन नाहीत म्हणून त्यांनी दिलगीरी व्यक्त करावी अशी माझी त्यांना विनंती आहे. अन्यथा, आपण त्यांनी केलेले वक्तव्य सभागृहाच्या कामकाजातून काढून टाकावे असा माझा हरकतीचा मुद्दा आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांच्या हरकतीच्या मुद्दयावर मला बोलावयाचे आहे....

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी माननीय प्रा. वसंतराव पुरके यांच्यावर आरोप केलेला नाही किंवा आक्षेप घेतलेला नाही हे मी याठिकाणी स्पष्ट करतो. त्याकरिता आपण सभागृहाचे कामकाज तपासावे. त्यामुळे मी याठिकाणी विषयांतर करुन बोललो नाही. या सभागृहामध्ये अकरावीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याच्या संदर्भात चर्चा सुरु असतांना मी विषयाला सोडून बोललो हे माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी यांचे म्हणणे मला मान्य नाही. या ठिकाणी चर्चा सुरु असतांना मी माननीय मंत्र्यांवर कोणतेही आरोप केलेले नाहीत. त्यामुळे दिलगीरी व्यक्त करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, माननीय शिक्षण मंत्री प्रा. पुरके साहेब आपणा संदर्भात जे वक्तव्य केले गेले आहे ते नाईलाजास्तव माननीय सभापतींना सांगितले पाहिजे.

(यानंतर श्री. किल्लेदार) c

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नितीन गडकरी : सन्माननीय मंत्री श्री.पुरके साहेबांना याबाबत बोलू द्यावे.

**उपसभापती** : आक्षेपार्ह विधान रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात येईल.

श्री.नितीन गडकरी : त्यांनी दिलगिरी व्यक्त करायला पाहिजे.

श्री.दिवाकर रावते : चुका झाल्या असतील. पण आक्षेपार्ह आहे, हे कोण ठरविणार ?

प्रा.वसंत पुरके : सभापती महोदय, अकरावीच्या प्रवेशाच्या संदर्भातील गंभीर प्रश्न आहे. आजच्या दिवसाची कार्यक्रम पत्रिका पाहिली तर 10 वीच्या पुस्तकामध्ये किती चुका आहेत याबाबतची स्वतंत्र लक्षवेधी सूचना चर्चेला आहे. ती ज्यावेळेस चर्चेला येईल, तेव्हा सन्माननीय सदस्यांनी त्याबाबत आपला राग व्यक्त करावा. प्रसंगावधान राखून सन्माननीय सदस्यांनी बोलले पाहिजे.

श्री.जी.एल ऐनापुरे : सभापती महोदय, मूळ विषय अकरावीच्या प्रवेशाचा आहे, त्यावर आम्हाला बोलायचे आहे. आज ग्रामीण भागामध्ये भरपूर मुले दहावीच्या परीक्षेमध्ये पास झालेली आहेत.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्यांनी कृपया खाली बसावे. अगोदर सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील बोलतील, त्यानंतर आपल्याला मी प्रश्न विचारण्याची संधी देतो.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, धन्यवाद. माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. अकरावीच्या प्रवेशाच्या संदर्भातील प्रश्न उपस्थित होत असताना काही ठिकाणी संस्था चालक जाणीवपूर्वक ज्युनियर कॉलेजेस बंद करत आहेत. चिनॉय व एलयुएमव्ही ही ज्युनियर कॉलेजेस व्यवस्थापनाने बंद केली आहेत. 1600 विद्यार्थ्यांचा प्रश्न आहे. माझा प्रश्न असा आहे की, ही कॉलेजेस शासन ताब्यात घेणार आहे काय ? कॉलेजेसमध्ये नवीन तुकड्या देणार आहात त्या अनुदानित देणार आहात काय ? त्याचबरोबर आज ज्युनियर कॉलेजेस नव्याने उघडणे आवश्यक आहे. नवीन कॉलेजेसना आपण परवानगी देणार आहात काय ?

प्रा.वसंत पुरके : सन्माननीय सदस्यांनी कॉलेजेस बंद केली जात असल्याचे सांगितले. शिक्षणाचा मूळ हेतू बाजूला ठेवून बिझनेस पॉईन्ट ऑफ व्ह्यूची भूमिका कॉलेजेस घेणार असतील तर त्या कॉलेजेसवर प्रशासक नेमण्यात येतील. कॉलेजेस बंद होणार नाहीत,याची काळजी घेण्यात येईल. दुसरे अनुदानित तत्वावर तुकड्या देण्याबाबातचा प्रस्ताव आठ दिवसात तयार करून मंत्री मंडळासमोर ठेवण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ SBT/

श्री.जी.एल.अैनापुरे : सभापती महोदय, आतापर्यन्त मुंबई शहरातील अकरावीच्या प्रवेशाच्या संदर्भाने चर्चा झाली. मुंबईबाहेर ग्रामीण भागातही मोठ्याप्रमाणात दहावीच्या परीक्षेमध्ये विद्यार्थी पास झालेले आहेत. त्या विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचाही प्रश्न महत्वाचा आहे. ग्रामीण भागामध्ये सगळीकडे ज्युनियर कॉलेजेस नाहीत. काही ठराविक भागामध्येच ज्युनियर कॉलेजेस आहेत. उदाहरणार्थ सातारा जिल्ह्यातील मायनी येथे एकच ज्युनियर कॉलेज आहे. त्या ठिकाणी सगळ्या विद्यार्थ्यांना प्रवेश मिळू शकत नाही, अशी परिस्थिती आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला ॲडमिशन दिले जाईल असे आपण सांगतो परंतु त्या ठिकाणच्या मुलांनी कोठे प्रवेश घ्यायचा, हा त्या ठिकाणच्या पालकांसमोर चिंतेंचा विषय झालेला आहे. आपण कॉलेजसना नवीन तुकड्या कायम विना अनुदानित तत्वावर देणार आहात, या विना अनुदानित तुकड्या असल्यामुळे कोणीही शैक्षणिक संस्था त्या काढणार नाहीत, मग प्रवेशाचा कसा प्रश्न सुटणार आहे ?

प्रा.वसंत पुरके : अनुदानित तुकड्या देण्याबाबतचा प्रस्ताव कॅबिनेटसमोर आठ दिवसामध्ये ठेवण्यात येईल, हे मी सांगितलेले आहे.

श्री.जी.एल. अैनापुरे : अशा परिस्थितीमध्ये एखाद्या संस्थेने ज्युनियर कॉलेज ग्रामीण भागामध्ये काढण्याचा प्रस्ताव दिला तर त्यास शासन परवानगी देणार आहे काय ?

श्री.जितेंद्र आव्हाड : अनुदानित तुकड्यांबाबतचा प्रस्ताव कॅबिनेटसमोर ठेवण्यात येणार आहे. यासाठी खूप कालावधी गेलेला असेल. मला निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, नवीन ज्युनियर कॉलेजेस सुरु करायची असतील तर त्या संस्थेने कॉलेज सुरु करण्यासाठी शासनाकडे परवानगी मागितली तर त्याबाबतचा फॉर्म भरून घेतला जातो. जिल्हापरिषदेचे शिक्षणाधिकारी या संबंधाने फी किती घेणार म्हणून विचारणा करतात, आणि फीला आक्षेप घेतात. खरे पहाता, विद्यार्थी तेवढी फी देण्यास तयार आहेत परंतु हे जिल्हापरिषदेचे अधिकारी त्या ठिकाणी अडचणी आणतात. तेच फी किती घ्यावी हे ठरवितात. आपण विना अनुदान तत्वावर कॉलेज काढण्यास परवानगी देतो. त्यांनी किती फी किती घ्यावयाची हे त्यांनाच ठरवू द्यावे. याबाबातचा कोणताही निर्णय घेतला नाही तर मुंबई पेटण्याच्या मार्गावर जाईल.

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड ....

लोक कालांतराने आपले काही ऐकणार नाहीत. 80 टक्के ते 90 टक्केमधील जवळपास 1 लाख विद्यार्थी प्रवेश न मिळाल्यामुळे भटकत आहेत. सीबीएसई., आयसीएसई, आयबी बोर्ड आहेत. राज्य शासनाचे जे बोर्ड आहे ते एकदा बंद करण्याचा निर्णय घेऊन टाका.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, काल विषय मांडत असताना मी जो मुद्दा मांडला होता त्या मुद्याबाबत माननीय मंत्रिमहोदय प्रा. पुरके यांनी काहीही सांगितलेले नाही. मी काल स्पेसिफिक मुद्दा मांडला होता की, मुंबईमध्ये लिंग्विस्टिक मायनॉरिटीचा आधार घेत ज्या प्रकारे प्रवेश झालेले आहेत त्यामध्ये 80 टक्के पेक्षा जास्त गुण मिळविलेल्या मराठी विद्यार्थी विद्यार्थीनींना चांगल्या कॉलेजमध्ये प्रवेश मिळत नाही. या विषयावर आपण त्या संबंधित संस्थांच्या लोकांना बोलवून त्यांना सांगितले पाहिजे. घटनेच्या आर्टिकल 30 प्रमाणे त्यांना अधिकार दिला म्हणून किंवा कोर्टाने त्यांच्या बाजूने निर्णय दिला म्हणून त्यांनी मनमानी करावयाची हे बरोबर नाही. परसेंटेजच्या बाबतीत त्यांनी स्वत:हून काही सिमांकन ठरविले पाहिजे. इतक्या कमी किंवा खालच्या परसेंटेजला प्रवेश देणार नाही हे त्यांनी ठरविले पाहिजे. दुसरीकडे 80 टक्केला ॲडमिशन क्लोज होते आम्ही 70 टक्केपर्यंत कंसीडर करु असे कोड ऑफ कंडक्ट किंवा नॉर्म ठरविण्याच्या बाबतीत सरकारने त्यांना विनंती केली पाहिजे. अन्यथा लोक कायदा हातात घेतील. मुंबईतील मराठी लोक जो टॅक्स भरतात त्यामधून त्यांना पाण्याच्या दरामध्ये सवलत मिळते. त्यातून त्यांना स्वस्तात वीज मिळते. त्यातून त्यांना प्लॉट मिळतो. लिंग्विस्टिक मायनॉरिटीच्या नावाखाली जी मनमानी चाललेली आहे त्याबाबत मुंबईत आगडोंब उसळला तर ते आवरणे कठीण जाईल. यामध्ये आपण पुढाकार घ्यावा. त्यांना घटनेचे आणि कोर्टाचे संरक्षण आहे म्हणून त्यांनी स्वत:हून नॉर्म्स ठरविले पाहिजेत. 10 टक्केपर्यंत परसेंटचे कंसेशन देऊ. ते देण्यास हरकत नाही. परंतु कोर्टाचा आधार घेऊन मनमानी करत बसणार असतील तर जनतेला आपल्या पध्दतीने सामोरे जावे लागेल. याबाबत शासन काही करणार आहे काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, मी आधीच सांगितले आहे की, अकरावीच्या प्रवेशाच्या बाबतीत नवीन प्रवेश प्रक्रिया निश्चित करण्यासाठी दोन तीन लोकांची समिती गठीत करु. आपण मार्गदर्शन करावे. अकरावीच्या प्रवेशापासून मुले वंचित राहू नयेत तसेच सीबीएसई, आयसीएसई

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT

प्रा. वसंत पुरके ....

यांच्या गुणांकन पध्दतीमुळे किंवा त्यांच्या टॅलेंटमुळे महाराष्ट्रातील एस.एस.सी. बोर्डाचे विद्यार्थी वंचित राहू नयेत म्हणून प्रवेश प्रक्रिया निश्चित करण्यासाठी दोन तीन लोकांची समिती गठीत करु. आपण मार्गदर्शन करावे. सगळ्या प्रकारच्या संस्थांच्या संदर्भात ही समिती गठीत केली जाईल.

( अनेक सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्याची परवागनी मागत असतात )

**तालिका सभापती ( श्री. रामनाथ मोते )** : यानंतर शेवटचा प्रश्न सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत विचारतील आणि त्यानंतर या विषयावरील चर्चा संपेल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, लिंग्विस्टिक मायनॉरिटीच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. विनोद तावडे यांनी जो प्रश्न उचलून धरला तो अतिशय बरोबर आहे. लिंग्विस्टिक मायनॉरिटी किती वर्षे द्यावयाची याबाबत एस.एस. कोडमध्ये उल्लेख आहे. जे नॉर्म्स सर्व लँग्विस्टीक मायनॉरिटी कॉलेजेसना दिलेले आहेत ते तपासून बघून त्यांची लिंग्विस्टिक मायनॉरिटी काही वर्षांपर्यंत मर्यादित ठेऊन नंतर ती काढून घेणार काय ? या विषयी राज्य शासन ठोस निर्णय घेणार काय ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, यासंदर्भात कोणीही वंचित राहू नये तसेच लिंग्विस्टिक मायनॉरिटीचा गैरफायदा कोणी घेत असेल तर त्यासंदर्भात एक समिती गठीत करु. आपण मार्गदर्शन करावे. ही बाब तपासून योग्य ती भूमिका घेऊ. यासंदर्भात अभ्यासगट तयार करुन योग्य ती भूमिका घेऊ.

डॉ. दीपक सावंत : त्यांची वर्षे संपली तरी ते लिंग्विस्टिक मायनॉरिटीचा फायदा घेत आहेत.

श्री. दिवाकर रावते : समिती नेमू, तपासून बघू असे उत्तर माननीय मंत्रिमहोदय देत आहेत ते बरोबर नाही.

प्रा. वसंत पुरके : कायदेशीर बाबी तपासून योग्य ती भूमिका घेतली जाईल.

डॉ. दीपक सावंत : एस.एस. कोडमध्ये किती वर्षासाठी लिंग्विस्टिक मायनॉरिटी आहे हे दिलेले आहे. आपण त्यांना नोटीस का देत नाही ?

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य आपापल्या जागी उभे राहून एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

प्रा. वसंत पुरके : ज्या कॉलेजांचा कालावधी संपलेला आहे त्यांना नोटीसा दिल्या जातील.

श्री. जितेंद्र आव्हाढ : हा प्रश्न गांभीर्याने घेण्याची गरज आहे. मी वारंवार असे सांगितलेले आहे की, यामध्ये मूळ मराठी माणूस भरडला जात आहे, हे कृपा करुन लक्षात घ्यावे. सीबीएसई, आयसीएसई, आयबी आणि स्टेस्ट बोर्ड यांच्या बाबतीत एक अभ्यास गट स्थापन करावा. सीबीएसई, आयसीएसईच्या विद्यार्थ्यांना आपण मराठी विषय ध्यावयास लावणार आहोत काय ? तामीळनाडू, केरळ, आंध्रप्रदेश ओरीसा या राज्यामध्ये त्यांची भाषा त्या बोर्डांना लागू केली जाते मग आपल्या राज्यामध्ये ती का लागू केली जात नाही ? आज सीबीएसई आणि आयसीएसई चे विद्यार्थी एसएससी बोर्डाच्या विद्यार्थ्यांच्या पुढे जात असून एसएससी बोर्डाची मुले मागे पडत चालली आहेत. अशी वेळ येईल की, आपल्या राज्यातील पालक आपल्या मुलांची गुणवत्ता वाढावी यासाठी त्याना सीबीएसई आणि आयसीएसई बोर्डामध्ये दाखल करतील. आज महाराष्ट्राची 40 वर्षाची चांगली शैक्षणिक परंपरा ही पराभूत होण्याच्या मार्गावर आहे. आपल्या शैक्षणिक धोरणाच्या पराभवाचा हा विषय आहे. अधिकारी कोण आहेत आणि ते काय करतात हा प्रश्न गौण आहे. आपल्या तज्ज्ञांनी तयार केलेली चांगली शिक्षण पध्दती ही आज पराभूत होण्याच्या मार्गावर आहे. याबाबतीत शासनाने तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे.

**तालिका सभापती** : प्रवेशाच्या संदर्भात मर्यादित स्वरुपाची चर्चा होती. तरी देखील या चर्चेला भरपूर वेळ दिलेला आहे. हा प्रश्न सन्मानीय सदस्यांना वेगळया पध्दतीने उपस्थित करता येईल. या प्रश्नावरील चर्चा आता संपलेली आहे.

--

....2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वये सूचना

**तालिका सभापती** : दिनांक 17 जुलै 2007 रोजी आलेल्या 93च्या सूचनांबाबत मी निर्णय देतो.

सन्माननीय सदस्य डॉ. दीपक सावंत यांनी "पावसाळा सुरु होऊनही मुंबईच्या पश्चिम उपनगरातील सांताक्रुझ ग्रीन स्ट्रीट, सांताक्रुझ एस.व्ही.रोड वरील एम.एम.आर.डी.ए.द्वारा करण्यात आलेले खड्डे न बुजविल्यामुळे तेथील नागरिकांना व दुकानदारांना होणारा त्रास" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठामध्ये पीएच.डी. अथवा एम.फील करण्यासाठी श्री. विवेकानंद चव्हाण या भटक्या व विमुक्त समाजाच्या मागासवर्गीय विद्यार्थ्याने नाव नोंदविले असून त्याला पीएच.डीची पदवी मिळू नये म्हणून तेथील प्राध्यापक वर्गाकडून त्यास होणा-या मानसिक छळाबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील व सन्माननीय सदस्य प्रा. शरद पाटील यांनी "खलापूर तालुक्यातील जि. रायगड येथील मौजे खिरकंडी येथे 2001 मध्ये आश्वासित रोजगार योजनेंतर्गत बांधण्यात आलेली प्राथमिक शाळागृहाची इमारत पार्ले बिस्किट कंपनीला देऊन सदर इमारत जिल्हा परिषद अधिका-यांच्या संगनमताने जमीनदोस्त करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, संजय केळकर, श्रीकांत जोशी व प्रतापराव सोनवणे यांनी "राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील अधिष्ठाते, अधिव्याख्याते व व्याख्याते यांच्या 1900 जागांपैकी सुमारे 800 जागा रिक्त असणे, त्यांचा वेतनवाढीचा प्रश्न प्रलंबित असणे तसेच सदर रिक्त जागा भरण्यासंबंधी महाराष्ट्र लोकसेवा आयोग असमर्थ ठरणे"या

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(तालिका सभापती...)

विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गो-हे व सन्माननीय सदस्य श्री. अरविंद सावंत यांनी "छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र असलेल्या वह्यांवर केरळ शासनाने बंदी घातली असल्याने मुंबईतील नागरिकांनी दिनांक 16.7.2007 रोजी निदर्शने करणे, या निदर्शकांवर पोलिसांकडून झ ाालेला अमानुष लाठीहल्ला" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

अन्य सूचना माननीय सभापतींनी दालनात नाकारल्या आहेत.

आता मी आज दिनांक 18.7.2007 रोजी आलेल्या 93च्या सूचनांसंबंधी निर्णय देतो.

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी "आशिया खंडात व मराठवाड्यात प्रथम असलेल्या स्वामी विवेकानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालय व महाविद्यालय अंबेजोगाई जिल्हा बीड येथे मराठवाड्यातून ग्रामीण नागरिक मोठ्या संख्येने उपचारासाठी येत असून सदर रुग्णालयामध्ये प्राथमिक स्वरुपाच्या आरोग्य सुविधा उपलब्ध नसल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी व जगदीश गुप्ता यांनी "युती शासनाने राज्यातील बेरोजगार तरुणांना त्यांच्या उपजिविकेसाठी झुणका-भाकर केंद्रे सुरु करणे, मात्र सदर केंद्रे बंद करुन शासनाने सदर जागा ताब्यात घेतल्यामुळे झुणका-भाकर केंद्र चालकांवर आलेली उपासमारीची पाळी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे असे निदेश मी देत आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, या विषयासंबंधी शासनाने आजच निवेदन केले पाहिजे.

...नंतर कु. खर्चे...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, या विषयावर खरेतर आम्ही आज चर्चाच मागणार होतो, कारण हा विषय अतिशय गंभीर आणि महत्वाचा आहे. महाराष्ट्रातील जवळपास 6,000 झुणका - भाकर केंद्रे बंद करण्याचा जो कठोर निर्णय शासन घेत आहे,त्यामुळे याविषयासंबंधातील निवेदन आजच झाले पाहिजे. मागच्या अधिवेशनातील या विषयासंदर्भातील प्रोसिडिंग माझ्या हातात आहे. या प्रोसिडिंगमध्ये माननीय सभापतींच्या आसनावरुनच "या झुणका - भाकर केंद्रांना संरक्षण दिले पाहिजे" असा निर्णय घेण्यात आला होता.

श्री.दिवाकर रावते : या विषयासंदर्भातील निवेदन हे इतर मंत्र्यांकडून न होता माननीय मुख्यमंत्र्यांकडूनच आले पाहिजे, कारण महाराष्ट्रातील झुणका - भाकर केंद्रे चालविणा-या लोकांना असे अचानक रस्त्यावर आणून उपाशी मारण्याचा प्रयत्न होत आहे, यासंदर्भात इतर मंत्री कोणत्याही प्रकारची कारणमीमांसा करु शकणार नाहीत.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा जो झुणका - भाकर केंद्राच्या बाबतीतील प्रश्न आहे त्या प्रश्नासंदर्भात या सभागृहामध्ये अनेक वेळा चर्चा झालेली आहे. माननीय सभापती आणि उपसभापती यांनी यासंदर्भात या आसनावरुनच निदेश दिलेले आहेत आणि त्यानंतर मंत्रिमंडळात झुणका भाकर केंद्रे सुरु करण्यात यावीत की बंद करण्यात यावीत असे निर्णय घेण्यात येतात त्यावेळी हा प्रश्न अंतिम निर्णयाकरिता दोन्ही सदनांमध्ये येणे आवश्यक आहे. झुणका - भाकर केंद्र सुरु करण्याचा निर्णय सुरुवातीला कोणत्याही सरकारच्या काळात होवो किंवा कोणत्याही मंत्रिमंडळात होवो परंतु झुणका - भाकर केंद्र बंद करण्याचा निर्णय जो आता घेण्यात येणार आहे तो निर्णय घेण्याकरिता प्रथम हा विषय या सभागृहामध्ये चर्चेकरिता येणे आवश्यक आहे. यासंदर्भात दोन्ही सभागृहांमध्ये साधक - बाधक चर्चा होणे आवश्यक आहे आणि या चर्चेच्या अनुषंगाने माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन द्यावे असे मला वाटते. यासंदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांना पत्रदेखील पाठविले आणि काल यासंदर्भात मी माननीय मुख्यमंत्र्यांशीही बोललो होतो. झुणका भाकर केंद्रे हा प्रश्न संपूर्ण महाराष्ट्रातील भुमिपूत्रांचा आहे. ज्या ज्या ठिकाणी ही झुणका भाकर केंद्रे आहेत, त्या त्या ठिकाणचे तहसिलदार जबरदस्तीने ती केंद्रे बंद करण्याचा व जप्त करण्याचा प्रयत्न करीत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : नुसते प्रयत्न नाही तर काही तहसिलदारांनी ती केंद्रे जबरदस्तीने सील केलेली आहेत.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, हा अतिशय ज्वलंत, तातडीचा आणि गंभीर प्रश्न आहे. या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टीकोन हा पॉझिटिव्हच असला पाहिजे तो निगेटिव्ह असून चालणार नाही या संदर्भात शासनाने तातडीने निवेदन करावे आणि या प्रश्नाला सकारात्मक पध्दतीने उत्तर दिले पाहिजे,अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.बाळासाहेब थोरात : या विषयावर चर्चा हवी असल्यास, आपण ही चर्चा इतर संसदीय आयुधांच्या मार्फत देखील या सभागृहामध्ये उपस्थित करु शकता.

श्री.दिवाकर रावते : थांबा, यासंदर्भात आपल्याला निदेश मिळतील.

श्री.बाळासाहेब थोरात : आपण ही चर्चा इतर संसदीय आयुधांच्या मार्फत उपस्थित करु शकता.

**( सभापतीस्थानी : माननीय उपसभापती )**

**उपसभापती** : झुणका - भाकर केंद्राच्या संदर्भात चर्चा करण्याची आवश्यकता नाही कारण या सदनामध्ये या विषयावर ज्या ज्या वेळी चर्चा झाली त्या त्या वेळी आपण सगळया सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आणि सर्वपक्षीय सदस्यांच्या भावना विचारात घेऊन ही झुणका - भाकर केंद्रे रद्द करु नयेत,असा निर्णय याच आसनावरुन देण्यात आलेला आहे आणि हे सभागृह जर आपण सार्वभौम समजत असाल तर या सदनामध्ये झालेल्या निर्णयाचे उल्लंघन करण्याचा किंवा अपमान करण्याचा कोणताही अधिकार या शासनाला नाही. या ठिकाणी प्रश्न लोकांच्या पोटाचा आहे. कोणत्या सरकारच्या काळामध्ये ही झुणका - भाकर केंद्रे सुरु झाली यापेक्षा ज्यांच्या पोटाला चटके बसत होते,त्याना ती त्या सरकारच्या काळात सुरु करण्यास परवानगी देण्यात आली होती हे महत्वाचे आहे. मला असे वाटते की, एकीकडे आपण राज्यशासन हे गरीबांकरिता काम करीत असते असे म्हणतो आणि त्याच वेळी ज्या ठिकाणी जर एखादे लोक फक्त व्यवसायच करत नसून किंवा फक्त रोजगारच कमावित नसून ते गरीब लोकांची सेवाही करीत असतात अशा लोकांची झुणका - भाकर केंद्रे आपण बंद करण्याचा निर्णय घेतो हे बरोबर नाही.

यानंतर श्री.कानडे....

अशुध्दित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**उपसभापती** .....

म्हणून मी आता पुन्हा निदेश देतो की, ही झुणका-भाकर केंद्रे ताब्यात घेण्याचा निर्णय आपण मागे घ्या आणि ज्यांना यापूर्वी झुणका-भाकर केंद्रे दिली होती त्यांना ती कायम स्वरुपी द्या हा माझा याप्रकारचा अंतिम निर्णय आहे.

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, आज या प्रश्नावर चर्चा करीत असताना माझ्या माहितीप्रमाणे हे प्रकरण सुप्रीम कोर्टापर्यंत गेले होते. सुप्रीम कोर्टामध्ये ज्या व्यथा सर्व लोकांच्या माध्यमातून व्यक्त केल्या होत्या त्यालक्षात घेऊन सुप्रीम कोर्टाने यासंबंधातील रिट पिटीशन डिसमिस केलेले आहे....

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने सांगितले की, राज्य शासनाच्या अखत्यारितील विषय आहे त्यांनीच निर्णय घ्यावयाचा आहे.

श्री. गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, सुप्रीम कोर्टाने रिट पिटीशन मान्य केलेले नाही ही वस्तुस्थिती आहे. म्हणून याविषयावर चर्चा घडवून आणली पाहिजे. हा मेरीट आणि डिमेरीटचा प्रश्न आहे.

**उपसभापती** : जर तुम्हांला याप्रकरणी चर्चेची आवश्यकता आहे असे वाटत असेल तर चर्चा करावयाला कोणतीही हरकत नाही. परंतु ही चर्चा केव्हा आणि कधी होईल तोपर्यंत माणसांनी उपाशी मरायचे काय ? नाही. ही चर्चा जेव्हा करावयाची असेल तेव्हा करा. परंतु ही झुणका-भाकर केंद्रे कुठल्याही परिस्थितीत शासनाने ज्यांची होती त्यांना त्यांचा व्यवसाय परत सुरु करण्यासाठी परवानगी तातडीने, आजच्या आज द्यावी हा माझा निदेश आहे.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण या सार्वभौम सभागृहाचे सभापती आहात. आपण आज जो निर्णय घोषित केला आहे तो विधिमंडळाच्या इतिहासात नोंदण्यासारखा आहे. परंतु आपण निर्णय दिल्यानंतर देखील आणि या सभागृहाचे नियम माहीत असताना देखील सभागृहाचे सन्माननीय सदस्य श्री. गुरुनाथ कुलकर्णी, ॲड.गुरुनाथ कुलकर्णी, लर्नेड फ्रेंड....

**उपसभापती** : माननीय सदस्यांच्या एका प्रश्नावर माझा आक्षेप आहे....

ॲड.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, अशा प्रकारे माननीय सदस्य श्री. नितीन गडकरी हे या जगातील सर्व ज्ञान आपल्यालाच आहे असे समजून जर सभागृहाला मार्गदर्शन करीत असतील तर त्याला माझा आक्षेप आहे. सभागृहाला सभ्य भाषेत संबोधित करावा आणि

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. गुरुनाथ कुलकर्णी ...

कुठल्याही सदस्याचा अपमान होणार नाही याची त्यांनी दक्षता घ्यावी. तुम्हांला कोणाच्या नांवे काहीही बोलण्याचा अधिकार दिलेला नाही. तुमच्यापुरते तुम्ही मर्यादित बोला आणि सभागृहाला ॲड्रेस करा.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, ही सभागृहाची प्रॉपर्टी आहे. मी नियमाने बोलतो आहे.

**उपसभापती** : आपण माननीय सदस्य श्री. कुलकर्णी यांना ॲड. बोलला, लर्नेड बोलता. पण He is learned but not earned. He is not earning anything.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, मी माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांची क्षमा मागतो. मी त्यांना ॲड.म्हटले आणि लर्नेड म्हटले. त्यांना जर हे शब्द असभ्य वाटत असतील तर मी वापरलेले हे शब्द उदार अंत:करणाने परत घेतो. ते जे शब्द सांगतील तेच शब्द मी त्यांच्या बाबतीत यापुढे वापरीन. मी दिलगिरी व्यक्त करतो. सभापती महोदय, या सभागृहात तुम्ही एक निर्णय दिल्यानंतर तुमच्या निर्णयावर यासभागृहात कोणी बोलून त्याच्यावर वेगळे मत मांडणे म्हणजे सभापतींचा अपमान आहे. हा संकेत पाळला गेला पाहिजे. तुमचा निर्णय सार्वभौम मानला पाहिजे. आपण सांगितले की, काही जरी झाले तरी त्या लोकांना आजच्या आज जागा परत करा त्यांच्यावर कारवाई करु नका. पोटपाणी चालले पाहिजे. त्यानंतर माननीय सदस्य श्री. कुलकर्णी हे उभे राहिले आणि त्यांनी सांगितले की, सुप्रीम कोर्टामध्ये केस गेली होती. सुप्रीम कोर्टाने त्यांची याचिका फेटाळली आहे. परंतु ही वस्तुस्थिती खरी नाही. आता मी त्यांना कुठलेही विशेषण वापरत नाही कारण त्यांना वकील म्हटले की राग येतो. परंतु त्यांना सुप्रीम कोर्टाचा निर्णय काय झाला हे पण माहीत नव्हते. सुप्रीम कोर्टानें असा निर्णय दिला की राज्य शासनाच्या अखत्यारितील हा विषय आहे तुम्हांला काय निर्णय घ्यायचा आहे तो घ्या अथवा नका घेऊ. मग ते असे म्हणाले की, सुप्रीम कोर्टाने घ्यावयाचा म्हटला त्यानुसार शासनाने निर्णय घेतला. शासन सुप्रीम आहे की सभापती सुप्रीम आहेत ? यासभागृहामध्ये शासनाने काही जरी निर्णय घेतला असेल तरी या सभागृहातील सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन आपण याठिकाणी निर्देश दिलेत त्या निदेशाच्या विरोधात शासन सुप्रीम आहे तुम्ही असे निदेश देऊ शकत नाही.........

नंतर श्री. भोगले...



अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ 14:45

श्री.नितीन गडकरी.......

ते तुमचे निर्देश बरोबर नाही हे ध्वनित करण्याचा यांना काय अधिकार आहे? त्यांनी आपला अवमान केला आहे म्हणून त्यांचे सगळे शब्द रेकॉर्डवरुन काढून टाकावेत आणि त्यांना दिलगीरी व्यक्त करण्याचे आदेश आपण द्यावेत अशी माझी विनंती आहे.

श्री.गुरुनाथ कुळकर्णी : माझ्या शब्दांमुळे माननीय सभापतींचा अवमान झाला असेल तर मी जरुर दिलगीरी व्यक्त करतो. या झुणका भाकर केंद्रांच्या संदर्भात आज जी परिस्थिती राज्यात निर्माण झाली आहे ती पाहता या सभागृहामध्ये एखाद्या सन्माननीय सदस्याने या गंभीर विषयावर निर्णय घेण्यापूर्वी सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार राज्य शासनाकडे अधिकार दिलेले असल्यामुळे आम्हाला आमची भूमिका मांडावयाची आहे, त्यासाठी या विषयावर चर्चा घडवून आणावी अशी मागणी केली तर तो काय गुन्हा झाला?

श्री.नितीन गडकरी : हा गुन्हा आहे. माननीय सभापतींच्या निर्णयापूर्वी बोलता येते, निर्णय दिल्यानंतर बोलू शकत नाही. सभापती महोदय, आपण निर्णय दिल्यानंतर या विषयावर सभागृहात चर्चा घडवून आणावी हे म्हणणे योग्य आहे का? या सार्वभौम सभागृहाचे सभापती म्हणून आपण निर्णय दिल्यानंतर That can not be a debatable subject, त्यावर डिबेट करण्याची आमची तयारी नाही. ही प्रथा आम्हाला मान्य नाही. तुम्ही अवमान करा. आम्ही अवमान करणार नाही. सभापती महोदय, तुम्ही निर्णय दिल्यानंतर चर्चा करावी, निर्णय स्थगित करावा हे म्हणणे योग्य आहे का?

श्री.गुरुनाथ कुळकर्णी :सभापतींनी त्यांचे मत व्यक्त केले आहे.

श्री.नितीन गडकरी : निर्णय दिला आहे. सभापतींचा अवमान आम्ही सहन करणार नाही. सभापती महोदय, शासनच नव्हे तर सन्माननीय सदस्य तुमच्या निर्णयाची कशी वाट लावतात पहा. चर्चा करावयाची आहे म्हणून तुमचा निर्णय स्थगित करा हा त्याचा अर्थ आहे.

श्री.दिवाकर रावते : या सदनामध्ये या संदर्भात सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपली भूमिका मांडल्यानंतर मी उठून उभा राहिलो आणि आम्हाला आजच्या आज शासनाकडून निर्णय पाहिजे म्हणून आग्रह धरला होता. सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते बोलण्यासाठी उभे होते. त्याचवेळी आपण स्थानापन्न झालात. आपण एकदा नव्हे तीन वेळा या सर्वोच्च स्थानावरुन

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ SBT/ 14:45

श्री.दिवाकर रावते........

शासनाला निर्देश दिले आहेत. या सदनाचे हे आदेश आहेत. या सदनाच्या भावनांचे आदेश आहेत. ती केंद्रे ताबडतोब चालवावयास द्यावी यापेक्षा वेगळा निर्णय असता कामा नये. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुळकर्णी म्हणतात, हे तुमचे व्यक्तिगत मत होते. आम्हाला पुन्हा एकदा आपल्याकडून हे आपले मत व्यक्तिगत होते की सार्वभौम सभागृहाचे सभापती या नात्याने सरकारला दिलेले आदेश होते हे रेकॉर्डवर येणे अपेक्षित आहे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुळकर्णी यांना सभागृहाची बिनशर्त माफी मागावी लागेल.

**उपसभापती** : श्री.गुरुनाथ कुळकर्णी असे म्हणाले नाही की, ते माझे व्यक्तिगत मत होते. आपण झुणका भाकर केंद्राच्या संदर्भात चर्चा केली. यापूर्वी चर्चा झालेली होती. यावर मी शासनाला निर्देशही दिले होते. परंतु तीन वेळा निर्देश दिल्यानंतर देखील अधिवेशन काळापुरती कारवाई स्थगित व्हायची आणि अधिवेशन संपल्यानंतर ताबडतोब कारवाई सुरु व्हायची. ज्यांची खरोखरच उपजिवीका त्या केंद्रांवर अवलंबून आहे आणि ते फक्त व्यवसाय करीत नसून लोकांची सेवा करीत आहेत त्या लोकांची रोजीरोटी काढून घेण्याचे पाप आपण आपल्या अंगावर का घेत आहात? ज्यांनी गरीबी पाहिली, ज्यांना गरीबीचे चटके सहन करावे लागले असे आपल्यापैकी बरेच जण आहेत. मी देखील एक आहे. ज्यांची रोजीरोटी हिरावून घेतली जाते त्यांच्या यातना काय असतात हे प्रत्येकाला माहित असतात. म्हणूनच मी यापूर्वी निर्देश दिले होते.

(नंतर श्री.जुन्नरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** .....

त्यानंतरही ही कृती सुरुच राहिली. याचा अर्थ या आसनावरुन सभापती म्हणून जे निर्देश दिलेले आहेत त्याचा तर अवमान झालाच झाला, परंतु या सार्वभौम सभागृहामध्ये या प्रश्नाच्या संदर्भात सर्व सन्माननीय सदस्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या होत्या त्या सर्व भावनांचा आदर करुन या ठिकाणी मी सभापती म्हणून निर्देश दिला होता. एकावेळी आपण सुध्दा होता आणि आपण सुध्दा सांगितले होते की, मी शासनाला हे स्वत: कळवतो आणि तसे आपण मान्यही केले होते. शासनाचा प्रतिनिधी म्हणून मी या ठिकाणी बसतो तेव्हा या ठिकाणावरून जेव्हा निर्णय दिला जातो आणि निर्णयाची अंमलबजावणी जेव्हा होत नाही त्यावेळी नेमके काय करावयाचे असा प्रश्न पडतो. त्यामुळे झाली एवढी अवहेलना पुरी झाली, झाला एवढा अवमान पुरे झाला. या ठिकाणी सर्वसामान्यांच्य हितासाठी, त्यांच्या कुटुंबाच्या चरितार्थासाठी ही झुणकाभाकर केंद्रे काढण्याची प्रक्रिया शासनाने सुरु केली होती किंवा केली आहे ती त्वरित थांबवावी. ज्यांना ज्यांना यापूर्वी झुणकाभाकर केंद्रे दिलेली आहेत, ज्यांना जी झुणकाभाकर केंद्रे दिलेली होती, झुणका भाकर केंद्राला जे सील लावण्यात आले होते ते काढून, जे झुणकाभाकर केंद्र ज्यांना देण्यात आले होते ते त्यांना परत देण्यात यावे. त्यांच्या उपजीविकेच्या साधनाची त्यांना पुन्हा उपलब्धता करुन देण्यात यावी. या आदेशाच्या अनुषंगाने आपण जी काही कार्यवाही केली, त्याच्या अंमलबजावणीचा जो काही अहवाल आहे तो 48 तासाच्या आत, म्हणजे शुक्रवारी संध्याकाळच्या आत शासनाने या सभागृहात सादर करावा अशा प्रकारचा स्पष्ट निर्णय, मी निर्देश हा शब्द वापरत नाही.

श्री. नितीन गडकरी : सभापती महोदय, आपण निर्देश शब्दच वापरावा अशी विनंती आहे.

**उपसभापती** : यासंदर्भामध्ये निर्देश देतो. कदाचित या निर्देशाच्या संदर्भात माझ्यावर टीकाही होईल. परंतु गोरगरिबांच्या भल्यासाठी वाटेल ती टीका सहन करण्याची ताकद ठेवणारा मी एक कार्यकर्ता आहे. मी दिलेल्या निर्देशाची अंमलबजावणी शासनाने करावी असे स्पष्ट निर्देश मी देतो. मी जे निर्देश दिलेले आहे ते सभापती म्हणून आसनावर बसलेलो असतांनाचेही माझे मत आहे आणि बाहेर सुध्दा माझे हेच व्यक्तिगत मत राहील.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आपल्या निदेशाची नोंद घेतली जाईल.

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : सन्माननीय मंत्रीमहोदयांनी नोंद घेतली असे शब्द न वापरता अंमलबजावणी करण्यात येईल असे शब्द वापरावे. आता तरी तुम्ही आमचा सन्मान राखलाच पाहिजे. हे माझे एकट्याचे मत नाही तर दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांचेही तसेच मत आहे.

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, आपल्या निर्देशाच्या अंमलबजावणी करण्याकरिता नोंद घेतलेली आहे.

**उपसभापती** : आपल्याला जेवढया पळवाटा काढावयाच्या असतील तेवढया काढाव्यात.

श्री. दिवाकर रावते : माननीय उपसभापती महोदयांनी सभापती स्थानावरुन गोरगरीब जनतेच्या हिताकरिता ज्या भावना व्यक्त केल्या त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. झुणकाभाकर हे सर्वसामान्य, गोरगरीब जनतेचे केवळ अन्नच नाही तर झुणकाभाकर केंद्र चालवणारे सुध्दा सामान्य लोक आहेत. माननीय सभापती महोदयांनी आसनाचा सन्मान ठेवून, शासनाने पुन्हा पुन्हा अवहेलना करुनही झुणकाभाकर केंद्र अगोदर ज्यांच्या ताब्यात होती त्यांना ती देण्यात यावीत असा आदेश दिलेला असल्यामुळे आपल्या भावनांचा नम्रपणे आदर करुन, कृतज्ञता व्यक्त करतो. आपण यासंदर्भात जो निर्णय दिलेला आहे त्याबद्दल पुन्हा एकदा धन्यवाद.

श्री. नितीन गडकरी : खरे म्हणजे अतिशय महत्वाच्या विषयावर या सार्वभौम सभागृहाचे सभापती म्हणून गरिबांच्या बाबतीत आपल्या मनात कनवाळूपणाची जी भावना आहे त्याच्या आधारावर आपण शासनाला ऐतिहासिक निर्देश दिलेला आहे त्यामुळे मी आपले मनापासून अभिनंदन करतो. आपण निर्णय घेतल्यानंतरही या सभागृहातील काही सदस्यांनी आपल्या निर्णयाला आव्हान देण्याकरिता या विषयाच्या संदर्भात चर्चा घडवून आणावी अशा प्रकारचा प्रयत्न करुन आपला अपमान करण्याचा प्रयत्न केला त्याबद्दल त्यांनी जरी दु:ख व्यक्त केले नसले तरी या सभागृहातील सदस्य म्हणून मी दु:ख व्यक्त करतो, दिलगिरी व्यक्त करतो. आपण मोठया मनाचे आहात त्यामुळे आपण अशाप्रकारचे अपमान सहन करुन मोठया मनाने माफ करता या आपल्या स्पोर्टमन स्पिरिटला मानाचा मुजरा करतो. आपण यासंदर्भात जो निर्णय घेतला त्याचे पुन्हा एकदा अभिनंदन करतो.

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, गेल्या तीन अधिवेशनापासून झुणकाभाकर केंद्राचा प्रश्न उपस्थित होत होता. झुणकाभाकर केंद्राचा प्रश्न अतिशय अडचणीत आलेला होता. तीनही अधिवेशनामध्ये आपण झुणकाभाकर केंद्र चालकांना संरक्षण देण्याची भूमिका घेतली,

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर...........

ते गोरगरिबांच्या उपजीविकेचे साधन आहे. युतीच्या काळात झुणका-भाकर केंद्राची चांगली योजना राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे जवळपास 6-7 हजार बेरोजगारांना रोजगार मिळाला होता आणि त्यांच्यावर किमान 40 हजार कुटुंबे पोसली जात होती. ही झुणका-भाकर केंद्रे बंद करण्याच्या निर्णयामुळे ही सर्व कुटुंबे रस्त्यावर आली आहेत. परंतु त्यांना वाचविण्याचे काम आपण केलेले आहे. मागील अधिवेशनात सुध्दा सन्माननीय सदस्य श्री.उल्हास पवार यांच्या नेतृत्तवाखाली एक शिष्टमंडळ माननीय मुख्यमंत्र्यांना भेटले होते. झुणका-भाकर केंद्र बंद करणार म्हणून झुणका-भाकर केंद्र चालविणाऱ्यांनी आंदोलन देखील केले होते. पण त्याचा कोणताही उपयोग झाला नाही. मागील 15-20 दिवसांपूर्वी कॅबिनेटमध्ये झुणका-भाकर केंद्र बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु आपण झुणका-भाकर केंद्र चालविणाऱ्यांच्या पाठिशी उभे राहून जो ऐतिहासिक निर्णय दिलेला आहे त्याबद्दल मी आपले मनापासून अभिनंदन करतो. आपला हा निर्णय पुढील कालखंडात अनेक विषयांमध्ये उपयोगी पडू शकतो. आपणास पुन्हा एकदा मनापासून धन्यवाद देतो.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, झुणका-भाकर केंद्राच्या संदर्भात या सभागृहात अनेकवेळा प्रश्न मांडले गेले. या संदर्भात यापूर्वी दोन वेळा निदेश दिले होते. एक वेळ अशी आली होती की, माननीय सभापतींसमोर हा विषय मांडला होता, त्यावेळी त्यांनी सुध्दा आपल्यासारखे निदेश दिले होते. या झुणका-भाकर केंद्रावर सर्वसामान्य गरिबांचे पोट अवलंबून आहे. त्यांना न्याय देण्याचे महत्वाचे काम आपण केलेले आहे. गोरगरिब जनतेला न्याय देण्यासाठी आपण येथे चर्चा करीत असतो. गरिबीचे चटके काय असतात याचा अनुभव आपणास आहे. ज्यांच्या पोटाला चटके बसतात त्यांनाच त्यांच्या वेदना समजू शकतात. आपणही हे चटके सहन केलेले आहेत. प्रत्येक वेळी आम्ही हा विषय अतिशय जबाबदारीने मांडत आलो आहोत. या प्रश्नाच्या संदर्भात आम्ही आक्रमक आहोत, परंतु आम्ही मर्यादा सोडून वागलो नाही. हा रोजीरोटीचा प्रश्न आहे. झुणका-भाकर हे मराठी संस्कृतीचे खाणे आहे. झुणका-भाकर केंद्र बंद करुन मराठी संस्कृतीवर घाला घालण्याचा प्रयत्न होत आहे. आपण या संदर्भात दिलेला निर्णय हा लँडमार्क आहे. तेव्हा या

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर सरपोतदार..........

निर्णयाची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. या केंद्रास मुंबई आणि बुलढाणा शहरात संरक्षण देण्याचे ठरविले आहे, परंतु शासन त्या विरोधात आहे. कॉर्पोरेशनचे अधिकारी म्हणजे शासनाचे अधिकारी असतात. आपण जो निर्णय दिला त्याबद्दल आपले आभार मानावे तेवढे थोडेच आहेत. या निर्णयाच्या बाबतीत माननीय सभापतींनी सुध्दा आपल्या पाठिशी उभे राहिले पाहिजे. शासनाने या निर्णयाची अंमलबजावणी केली पाहिजे अशी भावना मी या सदनामध्ये व्यक्त करतो. या वरिष्ठ सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन शासन लवकरात लवकर निर्णय घेईल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

श्री.रमेश निकासे : सभापती महोदय, झुणका-भाकर केंद्र बंद करण्याच्या निर्णयाबाबत ही केंद्र पुन्हा सुरु करण्याचे आपण जे निर्देश दिले त्याबद्दल मी आपणास धन्यवाद देतो. हा एक ऐतिहासिक निर्णय आहे. मी एक गरिबाचा मुलगा आहे. पायात चप्पल नसताना भर उन्हात डांबरी रस्त्यावरुन मी चाललो आहे. डोक्यावर संत्र्यांची टोपली घेऊन ती विकली आहेत. त्यामुळे गरिबी काय असते याची मला चांगली जाणीव आहे. मी देखील गरिबीचे चटके सोसले आहेत. एम्प्रेस मिलमध्ये संप झाला असताना पाच दिवस पोटात अन्नाचा कण गेला नव्हता. फक्त पाण्यावर दिवस काढलेले आहेत. ही परिस्थिती माझ्या एकट्याची नव्हती तर संपूर्ण एम्प्रेस कॉलनीतील लोकांची होती. मी गरिबीचे चटके जवळून अनुभवले आहेत. ज्या गोरगरिबांना झुणका-भाकर केंद्र दिली होती ती पूर्ववत चालू करावीत असा निर्णय आपण दिला.

यानंतर श्री.पुरी.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश निकोसे...

आपण आता नोकऱ्या देऊ शकत नसल्यामुळे छोटे-मोठे उद्योगधंदे सुरु झाले पाहिजेत. पोटाची आग विझली पाहिजे. आपण जो याठिकाणी निर्णय घेतला त्याबद्दल आपण धन्यवादास पात्र आहात, असे मी समजतो व आपणांस मन:पूर्वक धन्यवाद देतो.

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, मी आपले अभिनंदनही करतो आणि आभारही मानतो की, महाराष्ट्रामध्ये ही झुणका भाकर केंद्रे सुरु झाल्यानंतर अनेक गोरगरीब कुटुंबे आणि ज्यांना कुठलाही स्वयंरोजगार नाही अशी मंडळी यामध्ये काम करुन आपल्या कुटुंबाचे पालन पोषण करीत होते. दुर्दैवाने मधल्या काही गोष्टीबद्दल काही मंडळी कोर्टात गेली आणि सुप्रिम कोर्टाच्या निर्णयानंतर थोडासा गोंधळ निर्माण झाला. परंतु तरीसुध्दा सदनामध्ये या विषयावर 3-4 वेळा सविस्तर चर्चा झाली आणि त्यावेळी शासनाच्या सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी याठिकाणी सांगितले की, जर समजा पुन्हा झुणका भाकर केंद्रे सुरु करता आली नाहीत तर पर्यायी उपाययोजना करु, परंतु त्यांना उपजीविकेच्या साधनापासून किंवा व्यवसायापासून वंचित केले जाणार नाही, अशाप्रकारचे आश्वासन या सभागृहामध्ये त्यांनी दिलेले होते. माननीय उपसभापती महोदय, आपण जी भावना याठिकाणी व्यक्त केली, ती अत्यंत बरोबर आहे. याठिकाणी माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितल्याप्रमाणे, याबाबतीत मी दोन-तीनवेळा लोकांना घेऊन सन्माननीय मुख्यमंत्र्यांना, या खात्याच्या मंत्र्यांना भेटण्याचा प्रयत्न केला. परंतु दुर्दैवाने झुणका भाकर बंद करण्याचा निर्णय वर्तमानपत्रातून माझ्याही वाचण्यात आला, त्यामुळे मलाही यातना झाल्या. याठिकाणी माननीय मंत्रिमहोदय, श्री.बाळासाहेब थोरात यांनी आश्वासन दिले की, माननीय उपसभापतींच्या निर्देशाची नोंद अंमलबजावणीसाठी घेतलेली आहे. परंतु सुप्रिम कोर्टाचा निर्णय आणि आपण दिलेला न्याय याबाबत पुन्हा कोणी कोर्टाचा निर्णय मध्ये आणू नये, याची आपण काळजी घेऊन अंमलबजावणी करावी. त्यामुळे न्याय देताना याचाही आपण जरुर विचार करावा, अशी माझी नम्र सूचना आहे. त्यावेळी सभागृहामध्ये बोलत असताना मी म्हणालो होतो की, यामध्ये 2-4 लोक दोषी असतील. कोणी यामध्ये अवैध धंदा केला असेल, परंतु या 2-4 लोकांमुळे संपूर्ण राज्यातील यंत्रणेमध्ये जेवढी झुणका भाकर चालवणारी लोक आहेत, त्यांना एकाच मापात मोजणे, हे अन्यायकारक होईल. याठिकाणी आपण ही योजना चालू करावी अशाप्रकारचे जे निर्णय दिले, त्याबद्दल मी आपल्याला

..2....

श्री.उल्हास पवार.....

धन्यवाद देतो व आपले आभार मानतो. त्या सर्व मंडळींचा दुवा आपल्या सर्वांना मिळेल. असे करणे उचित आहे, कारण हे गरिबांचे राज्य आहे. महात्मा गांधीजींनी सांगित्याप्रमाणे, शेवटच्या माणसाला न्याय देण्यासाठी कल्याणकारी राज्य हवे आणि महाराष्ट्र राज्याकडे त्यादृष्टीनेच पाहिले जाते. त्या कल्याणकारी राज्यास खऱ्याअर्थाने अर्थ प्राप्त करुन देणारा हा आजचा आपला निर्णय आहे, त्याबद्दल मी आपले पुन्हा एकदा आभार मानतो.

-----

नंतर श्री.रोझेकर......

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उपसभापती** : यानंतर सर्वश्री नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, सागर मेघे, मधु चव्हाण, वि.प.स.यांनी "शासनाने नागपूर शहरालगत मिहान प्रकल्पाकरिता शेतजमिनी भूसंपादित केल्या असून सदर जमिनीचा मोबदला शेतक-यांना अत्यंत अल्प दरात दिला असल्याने शेतक-यांनी या प्रकल्पाकरिता शेतजमिनी देण्यास विरोध केल्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर श्री.श्रीकांत जोशी, वि.प.स.यांनी "विदर्भ मराठवाडयातील निम्न वैनगंगा प्रकल्पाच्या भिंतीचे बांधकाम करण्यासाठी दिनांक 8 जुलै 2007 रोजी मोजणीसाठी अधिकारी व कर्मचारी गेले असता, त्यांना आंदोलकांकडून मारहाण होणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

यानंतर सर्वश्री व्ही.यु.डायगव्हाणे, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्ही.डी. खोटरे, वि.प.स.यांनी "कै.टिकारामजी सेलोकर, सुभाष हायस्कूल, मुंडी कोठा, ता.तिरोडा, जि.गोंदिया यांची शिक्षण विभागाने सुमारे 6 लक्ष 20 हजार थकबाकीची रक्कम न दिल्याने सदर शाळेचे कार्यालयातील सर्व सामान, साहित्य जप्त करुन कार्यालयास टाळे लावले जाणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारली आहे.

आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.45 वाजता पुन: भरेल.

(दुपारी 3.05 ते दुपारी 3.45 मध्यंतर)

-----------------

यानंतर श्री.बोरले...........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( मध्यंतरानंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

**लक्षवेधी सूचना क्र.1 बाबत.**

डॉ.नीलम गो-हे : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेला उत्तर देणारे राज्यमंत्री श्री.रणजित कांबळे सभागृहामध्ये उपस्थित नाहीत.

**उपसभापती** : मी संबंधित मंत्री महोदयांना बोलावून घेतो. तोपर्यंत आपण पुढची लक्षवेधी सूचना घेऊ.

-------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

GRB/ KGS/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर .......... 15:45

**पृ.शी.** : राज्यात मुंबईसह ठाणे, पुणे, धुळे, नंदूरबार, जळगाव, अकोला, अमरावती, गडचिरोली, भंडारा, सिंधुदुर्ग, रायगड इत्यादी जिल्हयात माहे जून व जुलै महिन्यात अतिवृष्टी झाल्याने विविध रोगांची साथ पसरणे.

**मु.शी.** : राज्यात मुंबईसह ठाणे, पुणे, धुळे, नंदूरबार, जळगाव, अकोला, अमरावती, गडचिरोली, भंडारा, सिंधुदुर्ग, रायगड इत्यादी जिल्हयात माहे जून व जुलै महिन्यात अतिवृष्टी झाल्याने विविध रोगांची साथ पसरणे यासंबंधी सर्वश्री. संजय दत्त, गोविंदराव आदिक, राजन तेली, सुधाकर गणगणे, श्रीमती सुधा जोशी, सर्वश्री. धनाजी साठे, चंद्रकांत रघुवंशी, रमेश निकोसे, रणजितसिंह मोहिते-पाटील, श्रीमती फौजीया खान, सर्वश्री. जितेंद्र आव्हाड, वसंतराव चव्हाण, जगन्नाथ शेवाळे, लक्ष्मण जगताप, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री भास्कर जाधव, सदाशिवराव पोळ, शरद पाटील, जयंत पाटील, डॉ. वसंत पवार, सर्वश्री. नितीन गडकरी, पांडुरंग फुंडकर, विनोद तावडे, संजय केळकर, मधुकर चव्हाण, श्रीकांत जोशी, प्रतापराव सोनवणे, सागर मेघे, केशवराव मानकर, पाशा पटेल, रामनाथ मोते, गुरुनाथ कुलकर्णी, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.धनाजी साठे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सार्वजनिक आरोग्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात मुंबईसह ठाणे, पुणे, धुळे, नंदूरबार, जळगाव, अकोला, अमरावती, गडचिरोली, भंडारा, सिंधुदुर्ग, रायगड इत्यादी जिल्ह्यात माहे जून व जुलै महिन्यात अतिवृष्टी झाल्याने या जिल्ह्यात कॉलरा, डेंग्यु, लेप्टोस्पायरेसिस, मलेरिया, काविळ, गॅस्ट्रो, मेंदूज्वर इत्यादी रोगांची साथ पसरणे, यात असंख्य रुग्ण दवाखान्यात भरती होणे, त्यापैकी काही रुग्णांचा मृत्यु होणे, महापालिकेच्या व जिल्हापरिषदेच्या तसेच खाजगी दवाखान्यांमध्ये देखील काही रुग्ण उपचार घेत असणे, या साथीच्या रोगांना आळा बसावा यासाठी शासकीय यंत्रणा सतर्क नसल्याने व साथीचे रोग आटोक्यात येण्यासाठी योग्य त्या उपाययोजना करीत नसल्याने साथीच्या रोगांच्या रुग्णांच्या

..3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनाजी साठे .......

संख्येत वाढ होण्याची निर्माण झालेली भिती, परिणामी राज्यातील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, या गंभीर साथींचा प्रादूर्भाव रोखण्याच्यादृष्टीने युध्दपातळीवर उपाययोजना करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाने तातडीने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

डॉ.विमल मुंदडा (सार्वजनिक आरोग्य मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

--------

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनाजी साठे : सभापती महोदय, राज्यात मुंबईसह ठाणे, पुणे, धुळे, नंदूरबार, जळगाव, अमरावती, गडचिरोली, भंडारा, सिंधुदुर्ग, रायगड इत्यादी जिल्हयात मोठया प्रमाणावर पाऊस पडल्यामुळे हिवताप आणि इतर रोगांनी जवळ जवळ 1145 लोक आजारी आहेत, हे खरे आहे काय ? सभापती महोदय, अतिवृष्टीमुळे राज्यात निरनिराळया रोगांची साथ पसरलेली आहे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, राज्यात 900 वैद्यकीय अधिका-यांची पदे रिक्त असल्यामुळे लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे खरे आहे काय ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, आरोग्य विभागामार्फत पावसाळयापूर्वी रोग प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात. आरोग्य विभागाच्या माध्यमातून पावसाळयापूर्वी योग्य ती काळजी घेण्याचा प्रयत्न केला जातो. विधानसभेमध्ये यासंदर्भात लक्षवेधी सूचना आली होती. ही लक्षवेधी सूचना साथीच्या आजारासंबंधीची आहे. सन्माननीय सदस्य श्री.धनाजी साठे यांनी वैद्यकीय अधिका-यांच्या रिक्त पदांबाबत दुसरा प्रश्न उपस्थित केलेला आहे. वैद्यकीय अधिका-यांची 900 रिक्त पदे आम्ही तातडीने भरणार आहोत. वैद्यकीय अधिका-यांच्या रिक्त पदांवर बी.ए.एम.एस. डॉक्टरांची नियुक्ती करण्याचे आदेश दिलेले आहेत.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, आरोग्य विभागामार्फत पावसाळयापूर्वी ज्या प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जातात त्या दरवर्षी सारख्याच असतात. त्यामध्ये बदल होत नाही. प्रतिबंधात्मक उपाययोजना करुनही पावसाळा आल्यानंतर डेंग्यू, हिवताप, मलेरीया इत्यादी रोग पसरतात. रोग पसरु नयेत म्हणून फवारणी केली जाते. त्या फवारणीमध्ये जी औषधे वापरली जातात त्या औषधांमुळे मलेरीयाचे डास मरत नाहीत. मलेरीयाच्या डासांची उत्पत्ती सुरुच असते. आपण एखादी संस्था निश्चित करुन त्या अनुषंगाने संशोधन करावे व असे साथीचे रोग पसरु नयेत म्हणून परिणामकारक औषध शोधून काढण्याचा प्रयत्न करणार आहात काय ?

यानंतर श्री.गागरे .........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत.....

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, साथीच्या रोगाचे हिपोटायमॉलॉजीस्ट हे एक स्पेशलाईज फिल्ड आहे, महाराष्ट्रामध्ये या रोगाच्या डॉक्टरांची कमतरता आहे, हे खरे आहे का ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्यात जलजन्य व किटकजन्य रोग नियंत्रणासाठी राज्य शासनामार्फत विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. मागील तीन वर्षाची आकडेवारी पाहिली तर शासनाने या सर्व आजारावर चांगल्या पध्दतीचे नियंत्रण मिळविले आहे. मुंबईमध्ये मलेरिया रोगाच्या बाबतीत मागील वर्षीच्या 26 जुलैच्या अतिवृष्टीमुळे काही अनुभव शासनाला आलेले आहेत. सध्या मुंबईमध्ये लेप्टोस्पायरेसिसचे काही रुग्ण आढळले असले तरी परिस्थिती नियंत्रणामध्ये आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. मुंबई महानगरपालिकेच्या परीसराचा विचार केला तर मागच्या वर्षीपासून डासांच्या उत्पत्तीचे प्रमाण वाढल्यामुळे मलेरियाचे रुग्ण वाढलेले आहेत, ही सत्य परिस्थिती आहे. आपण विविध प्रकारे जलजन्य आजाराच्या बाबत प्रि-मान्सून तयारी करत असतो, तसेच किटकजन्य आजाराच्या बाबतीतही तयारी केली जाते. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सांगितले आहे, हिपोटायमॉलॉजीस्ट एक स्पेशलाईज्ड फिल्ड आहे. याबाबत मी सांगू इच्छिते की, आरोग्य खात्यामध्ये प्राथमिक स्तरावर डी.एच.ओ. असतो. जिल्हयाला दोन ए.डी.एच.ओ. असतात आणि ते एम.डी., पी.एस.एम. किंवा डी.पी.एच.एम. असतात. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत हे डॉक्टर आहेत आणि मी ही डॉक्टर आहे, त्यामुळे यातील तांत्रिक बाजू त्यांनी समजून घ्यावी.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, हिपोटायमॉलॉजीस्ट या साथीच्या आजारासाठी एक स्पेशलाईज्ड फिल्ड तयार झालेले आहे, विदेशामध्ये यावर संशोधन केले जात आहे. महाराष्ट्र व मुंबई प्रगत आहे, त्यामुळे आपल्याकडेही यावर संशोधन होणे गरजेचे आहे. परंतु महाराष्ट्रामध्ये या रोगावर फक्त एकच डॉक्टर आहे, हे सत्य आहे. त्यामुळे मी मंत्री महोदयांना विचारतो की, या रोगावर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी सोयीसवलती तुम्ही उपलब्ध करुन देणार का ?.

श्री.रणजित कांबळे : सजेशन फॉर ॲक्शन.

.....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PNG/ MAP/ KGS/

श्रीमती सुधा जोशी : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी साथीच्या रोगावर काही उपाययोजना सांगितल्या आहेत. त्यामध्ये उद्रेकग्रस्त गावामध्ये विविक्षीत कक्षाच्या स्थापनेबाबत उल्लेख केलेला आहे. माझा प्रश्न असा आहे की, जून-जुलै 2007 या कालावधीत किती गावे उद्रेकग्रस्त होती ? किती गावामध्ये विविक्षीत कक्षांची स्थापना झाली आहे. तसेच किती ठिकाणी शीघ्र प्रतिसाद पथकाची स्थापना करण्यात आली आहे ?

डॉ.विमल मुंदडा : सभापती महोदय, 2007-08 मधील जून 2007 पर्यतची प्रत्येक रोगाची उद्रेकग्रस्त गावाची यादी माझ्या कडे उपलब्ध असून ती फार मोठी आहे, याबाबत मी थोडक्यात माहिती देत आहे. महाराष्ट्रात जून व जुलै 2007 मध्ये काविळचे 3 उद्रेक, 53 लागण व 1 मृत्यू, गॅस्ट्रोचे 61 उद्रेक 2249 लागण व 23 मृत्यू तसेच लेप्टोस्पायरेसिसचे 45 रुग्ण व 2 मृत्यू झाल्याचे आढळून आलेले आहे. या कालावधीत राज्यात कॉलराचा एकही उद्रेक झालेला नाही. किटकजन्य आजारामध्ये डेग्युंचे 14 उद्रेक 187 लागण व 3 मृत्यू, मेंदूज्वराचे 2 उद्रेक व 2 रुग्ण तर मलेरियाचे 10 उद्रेक 458 लागण व 9 मृत्यू आढळून आले आहेत. मुंबई महानगरपालिका क्षेत्रात मलेरियाची 266 जणांना लागण झाली असून 6 मृत्यू झाले असून डेंग्यु तापाचे 14 लागण व 2 मृत्यू तर लेप्टोस्पायरोसिसचे 37 लागण व 2 मृत्यू आढळून आले आहेत.

जलजन्य व किटकजन्य आराजांवरील उपचारांसाठी सर्व शासकीय आरोग्य संस्थांना आवश्यक तो औषधीसाठा तसेच फवारणीसाठी किटकनाशके, अळीनाशके व साहित्य सामुग्री उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. राज्यामध्ये 76 शीघ्रपथके आहेत. तसेच राज्यस्तरावर 24 तास नियंत्रण कक्ष आरोग्य सेवा संचालनालयात सुरु करण्यात आला आहे. या रोगांच्या नियंत्रणासाठी राज्यात वरीलप्रमाणे नियमितपणे उपाययोजना राबविण्यात येत असून परिस्थिती नियंत्रणात आहे, त्याकडे शासनाचे दुर्लक्ष झालेले नाही.

जलजन्य आजाराचे सर्वेक्षण केलेले असून 8016 गावांची यादी तयार करण्यात आलेली आहे. विविध प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये 1891 शीघ्रपथके असून याद्वारे नियमितपणे पाण्याचे नमुने घेतले जातात व  ब्लिचिंग पावडरचा वापर केला जातो.

यानंतर श्री.सुंबरे.....

अशुद्धित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, साथीच्या रोगांवर नियंत्रण करण्यासाठी शासनाने एप्रिल 2007 ते जून 2007 पर्यंत किती रकमेच्या औषधांची खरेदी केली आहे आणि ती खरेदी राज्य पातळीवर एकत्रित झाली आहे की जिल्हा पातळीवर ती खरेदी करण्याचे आदेश देण्यात आलेले होते ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, मुंबई महापालिकेच्या बाबतीत महापालिका स्तरावर ही खरेदी केली जाते आणि आरोग्य सहसंचालकांच्या स्तरावर पुणे येथील त्यांच्या कार्यालयामार्फत राज्यासाठी खरेदी होत असते. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांच्या बाबतीत तेथे तीन महिने पुरतील इतका औषधांचा साठा त्यांना देण्यात आलेला आहे. मात्र ही खरेदी सहसंचालकांच्या पातळीवर केली जाते. सभापती महोदय, मी आपल्याला असेही सांगू इच्छिते की, 7 रोगांच्या बाबतीत ते नियंत्रणामध्ये ठेवण्यासाठी काही औषध खरेदी ही सहसंचालकांच्या पातळीवर केलेली आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये अनेक डॉक्टरांची पदे रिक्त असल्याबद्दलचा प्रश्न या सभागृहामध्ये चर्चेला आला असताना आपण आपल्या आसनावरून आदेश दिले होते की, ती सर्व डॉक्टरांची पदे 15 दिवसात शासनाने भरावीत. त्यावेळी मंत्री महोदयांकडून तसे करण्यात येईल असे सांगण्यात आले होते आणि त्याप्रमाणे डॉक्टर्सची भरती करण्याचे कबूल केले होते. परंतु संबंधित दोन्ही मंत्री महोदयांनी आपले ते आदेश अद्याप पाळलेले नाहीत. आज देखील सिंधुदुर्ग जिल्हा रूग्णालयामध्ये डॉक्टरांची 16 पैकी 13 पदे रिक्त आहेत, कणकवलीमध्ये देखील अनेक डॉक्टरांची पदे रिक्त आहेत. तेव्हा ही पदे केव्हा भरली जाणार आहेत ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील जी डॉक्टरांची पदे रिक्त आहेत ती भरण्याचा आपण जरूर प्रयत्न केलेला आहे. मात्र ज्यांना तेथे जॉईन होण्यास सांगितले होते ते जॉईन झाले नाहीत. अशांना तत्काळ निलंबित करण्यात येईल असे मी या ठिकाणी सांगू इच्छिते. तेथे आम्ही डॉक्टर्स पाठवितो परंतु ते दुसरीकडे बदली करवून घेतात आणि त्यामुळे या जागा रिक्त राहतात त्यामुळे अशा डॉक्टर्सवर निश्चितपणे कारवाई करण्यात येईल. तसेच पीएचसी स्तरावर हंगामी तत्त्वावर देखील भरती करण्यात येईल.

श्री. केशवराव मानकर : सभापती महोदय, महाराष्ट्रात सध्या मेंदूज्वर कोणकोणत्या जिल्ह्यात आहे ? आणि गोंदिया जिल्ह्यामध्ये या मेंदूज्वराचे किती रोगी आहेत व त्यातील किती

...... ओओ 2 ...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दगावले आहेत ? तसेच तेथे या रोगावर नियंत्रण आणण्यासाठी आपण काय उपाय योजना केली आहे ?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, मेंदूज्वर हा व्हायरल इन्फेक्शनमुळे होणारा रोग आहे. या रोगाचा एकच रूग्ण आपल्याला दिसून आला आहे. मात्र चंद्रपूर, भंडारा, गडचिरोली, नागपूर अशा चार जिल्ह्यांमध्ये 27 पैकी 16 जणांचा या रोगामुळे मृत्यू झालेला आहे. सध्या तेथील परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आलेली आहे. तेथील मेंदूज्वर ग्रस्त भागामध्ये आपण स्प्रिंग केलेले आहे. तेथे झालेल्या चंडिपुरा वायरस मुळे 27 पैकी 16 रूग्ण मृत्यू पावले आहेत. फ्लड आल्यामुळे हा आजार उद्भवला होता. परंतु त्याचा उद्रेक कोठेही झालेला नाही. मुंबईमध्ये देखील या संबंधात गंभीर अशी परिस्थिती नाही.

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, मी आपल्या माध्यमातून माननीय आरोग्य मंत्र्यांना विचारू इच्छितो की, डेंग्यू रोगाचे किती रूग्ण आपल्याला मुंबईमध्ये आढळले आहेत ? तसेच डेंग्यूच्या आजाराने एकाच कुटुंबातील 2 जण जसलोक हॉस्पिटलमध्ये मृत्यू पावले आहेत हे खरे आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, आतापर्यंत 3 मृत्यू यामुळे झालेले आहेत आणि मुंबईमध्ये जवळपास 102 केसेस आजपर्यंत याच्या रजिस्टर झालेल्या आहेत. मात्र सन्माननीय सदस्यांनी जी स्पेसिफिक माहिती विचारली आहे ती आता माझ्याकडे उपलब्ध नाही.

( यानंतर श्री. सरफरे ..... पीपी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, या संदर्भात माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार जे. जे. हॉस्पिटलमध्ये फिव्हरच्या 3 केसेस दाखल झाल्या असून त्या मलेरियाच्या आहेत. परंतु डेंग्यूची एकही केस दाखल झालेली नाही.

**उपसभापती** : मंत्रिमहोदय माननीय सदस्यांकडून चिठ्ठीव्दारे माझ्याकडे विचारणा करण्यात आलेली आहे की, मेंदूज्वर कोणकोणत्या पक्षामध्ये झालेला आहे?

डॉ. विमल मुंदडा : सभापती महोदय, त्याबाबतची माहिती माझ्याजवळ नाही.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: अंबाजोगाई (जि.बीड) येथील धायगुडा पिंपळा ग्रामपंचायतीच्या महिला सरपंचास ग्रामसेवकाने जीवे मारण्याची दिलेली धमकी

**मु.शी.**: अंबाजोगाई (जि.बीड) येथील धायगुडा पिंपळा ग्रामपंचायतीच्या महिला सरपंचास ग्रामसेवकाने जीवे मारण्याची दिलेली धमकी यासंबंधी स□मा□□ीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे वि.प.स.यां□ी दिलेली ल□वेधी सूच□ा.

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अ□ुमती□े □ियम 101 अ□्वये पुढील तातडीच्या व सार्वज□ि□ महत्वाच्या बाबी□डे स□मा□□ीय ग्रामविकास मंत्र्यांचे ल□ वेधू इच्छिते आ□ि त्याबाबत त्यां□ी □िवेद□ □रावे, अशी वि□ंती □रते

"बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई तालुक्यातील धायगुडा पिंपळा येथील श्री.शेषराव चौरे या ग्रामसेवकाने ग्रामपंचायत अंतर्गत केलेल्या रस्त्यांच्या कामाची दीड लाख रक्कम रस्त्याचे काम न करताच परस्पर उचलून केलेल्या भ्रष्टाचाराचा जाब दिनांक ५ जुलै २००७ रोजी महिला सरपंचानी सदर ग्रामसेवकास विचारला असता त्यांना उध्दटपणाची दिलेली वागणूक व घरी जावून त्यांना जीवे मारण्याची दिलेली धमकी, परिणामी धायगुडा पिंपळा गावातील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, तसेच याप्रकरणी पंचायत समिती, गट विकास अधिकाऱ्यांनी व जिल्हा परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांनी दखल न घेता हे प्रकरण दडपून टाकण्यासाठी आणलेला दबाव, याबाबत शासनाने तातडीने करावयाची चौकशी व कार्यवाही."

श्री. रणजित कांबळे ( ग्राम विकास राज्यमंत्री ) : सभापती महोदय, ल□वेधी सूच□ेसंबंधीच्या □िवेद□ाच्या प्रती मा□□ीय सदस्यां□ा आधीच वितरीत □ल्या असल्यामुळे मी ते □िवेद□ आपल्या अ□ुमती□े सभा□ृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : □िवेद□ सभा□ृहाच्या पटलावर ठेव□्यात आले आहे.

□िवेद□

( प्रेस : येथे सोबतचे □िवेद□ छापावे. )

.... ....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, याठिकाणी विचारण्यात आलेल्या लक्षवेधी सूचनेसंबंधी शासनाने जे निवेदन केले आहे त्या संदर्भात माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. त्या गावामध्ये ग्रामसेवकाने महिला सरपंचाला धमक्या देऊन त्रास दिला म्हणून त्या ग्रामसेवकाविरुध्द कारवाई करण्यात येत आहे असे निवेदनामध्ये म्हटले आहे. मी काल रात्री त्या संबंधित महिला सरपंचाकडून माहिती घेतली आहे. त्याव्दारे त्या ग्रामसेवकाला अजून निलंबित केलेले नाही. हा फक्त एका गावचा प्रश्न आहे. त्या गावामध्ये 11 नोव्हेंबर 2005 ला महिला सरपंचाची निवड करण्यात आली. दिनांक 4 जानेवारी 2006 रोजी ग्रामसेवक आणि महिला सरपंच यांच्यामध्ये मतभेद सुरु झाले. या संदर्भात पोलीस स्टेशनला दि. 28.5.2007 ला तक्रार करण्यात आली. तसेच, महिला सरपंचानी बी.डी.ओ., पोलीस अधिक्षक, बीड आणि पोलीस इन्सपेक्टर अंबाजोगाई यांना दिलेल्या पत्राची प्रत माझ्याकडे आहे. त्यामध्ये त्यांनी संबंधित ग्रामसेवक मला त्रास देत असल्याचे म्हटले आहे. याठिकाणी संबंधित ग्रामसेवकाला तेथील श्री. मोटा नावाच्या बी.डी.ओं. चे संरक्षण आहे. त्या ग्रामसेवकाने महिला सरपंचाच्या घरी जाऊन धमक्या दिल्या आहेत. तसे त्यांनी बी.डी.ओ. यांना दिलेल्या अर्जामध्ये म्हटले आहे. तेव्हा या संबंधित ग्रामसेवकास निलंबित करुन त्या महिला सरपंचास संरक्षण देणार काय? तसेच, ग्रामसेवकाला संरक्षण देणारे श्री. मोटा या अधिकाऱ्यांवर आपण काय कारवाई करणार आहात?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, दि. 26.3.2007 रोजी बी.डी.ओ. यांच्याकडे तक्रार करण्यात आली. या संदर्भात आपल्याबरोबर चर्चा केल्यानंतर मी या प्रकरणाची सविस्तर माहिती घेतली. तसेच, संबंधित बी.डी.ओ. आणि डेप्युटी सी.ई.ओ. यांना देखील बोलाविले होते. या प्रकरणामध्ये संबंधित महिला सरपंच आणि ग्रामसेवक हे पोलीस स्टेशनला गेले होते आणि त्या ठिकाणी त्यांच्यामध्ये कॉम्प्रमाईज झाल्यामुळे त्यांनी तक्रार दिलेली नाही. त्यांना तीन दिवसापूर्वी निलंबित करण्यात आले. जो घटनाक्रम आहे तो आपणास सांगतो. त्याठिकाणी ग्रामसेवकांचा संप सुरु होता. ग्रामसेवकाला दि. 5.4.2007 आणि दि. 5.5.2007 ला तीन वेळा नोटीसा देण्यात आल्या. त्यांच्याकडून रेकॉर्ड प्राप्त न झाल्यामुळे बी.डी.ओ. यांनी सेक्शनल इंजिनिअरमार्फत त्या कामाचे दि. 17.5.2007 रोजी व्हॅल्युएशन केले. त्या कामासंदर्भात बी.डी.ओ. यांनी दि. 4.6.2007 रोजी सी.ई.ओ. यांना अहवाल पाठविला. त्या अहवालानुसार एस्टिमेटप्रमाणे काम झाले नसल्याचे

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

DGS/

श्री. रणजित कांबळे...

स्पष्ट झाले. अशाप्रकारे ते काम निकृष्ट दर्जाचे झाले असल्यामुळे त्यामध्ये रिकव्हरी करण्याची कारवाई होऊ शकते अशाप्रकारचा अहवाल सी.ई.ओ. यांना दिला. त्याबाबत दि. 20.6.2007 ला ग्रामसेवकाला नोटीस देण्यात आली. त्या नोटीशीला उत्तर म्हणून दि. 25.6.2007 रोजी ग्रामसेवकाने स्पष्टीकरण दिले. त्यानंतर दि.16.7.2007 रोजी ग्रामसेवकाला निलंबित करण्यात आले.

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे : अधिवशनामध्ये लक्षवेधी सूचना उपस्थित झाल्यानंतर ही कार्यवाही झाली असे समजायचे काय ?

श्री.रणजित कांबळे : ग्रामसेवकाचा खुलासा 25-06-2007 रोजी आलेला आहे. या संबंधातील कार्यवाही चालू होती. ग्रामसेवकाला निलंबित केलेले आहे. त्यानंतरची पुढील कार्यवाही चालू आहे. सन्माननीय सदस्यांनी सरपंचांना धमकी दिल्याबाबत प्रश्न उपस्थित केला. परंतु तशी लेखी तक्रार आलेली नाही, त्यामुळे त्यांच्यावर ॲक्शन घेणे शक्य नाही.

श्री.दिवाकर रावते : ग्रामसेवकाला कशासाठी निलंबित केलेले आहे ?

श्री.रणजित कांबळे : दोन कामे निकृष्ट दर्जाची आढळून आली, त्या आधारावर त्यांना निलंबित केलले आहे.

श्री.दिवाकर रावते : ग्रामसेवकाचे निलंबन कशासाठी केले, हा प्रश्न मी मुद्दाम विचारला. निवेदनामध्ये असे म्हटलेले आहे की," मंजूर करण्यात आलेल्या रक्कमेपैकी अनुक्रमे रुपये 1,22,318 व रुपये 1,83,424 इतकी रक्कम उचल केली होती." यामध्ये अपहार झाला हे सिध्द झाले, म्हणून त्या ग्रामसेवकाला निलंबित केले. पुढे म्हटलेले आहे की, "ग्रामसेवकांनी केलेल्या कामाचे शाखा अभियंता यांनी मूल्यांकन रुपये 74,873 व 1,25,776 इतके केलेले आहे." म्हणजे बाकीची रक्कम त्यांनी हडप केली, असा त्याचा अर्थ होतो. या संदर्भातील ग्रामसेवकांनी शासकीय निधीचा अपहार केला, म्हणून त्याच्यावर गुन्हा दाखल करणार आहात काय ? हा गुन्हा केव्हा दाखल करणार आहात ? निलंबित केल्यानंतर सहा महिन्यांनी रिइन्स्टेट केले जाते. स्थानिक पातळीवर जिल्हापरिषद त्या रक्कमेचे हप्ते बांधून त्यांच्या पगारातून ती रक्कम वसूल करते. ही कार्यवाही चालू रहाते. शासकीय पैशाचा अपहार झाला त्यासंबंधात गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशाप्रकारचा जी.आर. दोन-चार महिन्यापूर्वी निघालेला आहे. त्याप्रमाणे त्या ग्रामसेवकावर फौजदारी गुन्हा दाखल करणार आहात काय ? मूळ लक्षवेधी सूचनेमध्ये त्या महिला सरपंचांना हे ग्रामसेवक सतावत असल्याचा उल्लेख आहे. त्या संदर्भाने त्यांच्यावर आपण कोणती कारवाई करणार आहात ? या संबंधिचा उल्लेख सभागृहाच्या रेकॉर्डवर आलेले आहे, त्याबाबतीत नक्की कोणती कारवाई करणार आहात ?

श्री.रणजित कांबळे : अपहार केल्याचा प्रश्न नाही. त्या ठिकाणी निकृष्ट दर्जाचे काम झालेले आहे. कामाच्या व्हॅल्युएशनमध्ये फरक आलेला आहे त्याबाबत त्यांच्याकडून रिकव्हरी करावी लागणार आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्रीमहोदयांचे उत्तर रेकॉर्डवर नीट आले पाहिजे. याचा अर्थ कितीही निकृष्ट दर्जाची कामे केली तरी पैशाचा अपहार करता येतो, असा होतो. हा अपहार झालेला नाही काय ?

श्री.रणजित कांबळे : एक काम बाराव्या वित्त आयोगाचे होते आणि दुसरे काम संपूर्ण ग्रामीण योजनेचे होते. 12 व्या वित्त आयोगाच्या कामाची संपूर्ण जबाबदारी ही ग्रामसेवकावर येते. संपूर्ण ग्रामीण योजनेच्या कामाची जबाबदारी ही 50 टक्के ग्रामसेवकावर आणि 50 टक्के सरपंचांवर येते. कारण या कामासाठी जॉईन्ट अकाऊंट असल्यामुळे चेकवर दोघांच्याही सह्या असतात. या संबंधात दर महिन्याला सरपंच आणि ग्रामसेवक यांच्या बैठका होतात. जो काही खर्च होतो त्याची चर्चा होते. त्या खर्चास मान्यता ग्रामपंचायत देते. मी सांगू इच्छितो की, 12 व्या वित्त आयोगाच्या कामाचे वर्षभरामध्ये वेगवेगळे 18 चेक्स निघालेले आहेत आणि संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेचे 11 चेक्स निघालेले आहेत. त्यामध्ये कोणताही डिस्पूट नव्हता. त्यानंतर सरपंचांनी तक्रार केली. प्रश्न असा आहे की, ज्यावेळेस याबाबतची चौकशी होते, ती संपूर्ण केली जाते. या प्रकरणामध्ये काही प्रमाणात सरपंचही जबाबदार आहेत. त्यांचा जाईन्ट अकौंट असल्यामुळे त्यांच्या चेक्सवर सह्या आहेत. त्याचबरोबर ग्रामसेवकही जबाबदार आहेत, त्यांच्या संबंधाने ॲक्शन घेणार आहोत. त्यांना केवळ निलंबित करणार नाही तर त्यांच्यावर कारवाई करणार आहोत, त्याचबरोबर सरपंचांवरही जबाबदारी आहेत.

श्री.जयंत प्र.पाटील : सरपंचांनी उचल घेतली त्या प्रमाणात उप अभियंत्यांनी किती रक्कमेचे मूल्यंकन केलेले आहे ? सन्माननीय सदस्य श्री.रावते साहेबांनी उचल रक्कमेमध्ये अपहार झाल्याचे सांगितले. उचल घेतलेल्या रक्कमेपेक्षा मूल्यांकन कमी झाले असेल तर तो अपहार होतो.

यानंतर श्री.बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जयंत प्र. पाटील .....

त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करणार काय ? दोन्ही कामांचे मूल्यांकन केल्यावर चेक काढावयाचे आहेत. यामध्ये सरपंच तेवढ्या जबाबदार नाहीत. त्या ठिकाणी खऱ्या अर्थाने महिला सरपंचाला संरक्षण दिले पाहिजे. त्यांना प्रशिक्षण दिले पाहिजे. त्यादृष्टीने आपण याकडे पाहणार की नाही ? कामाचे मूल्यांकन करण्याची जबाबदारी सरपंचाची नाही. या दोन्ही कामांचे मूल्यांकन किती होते आणि त्यांनी मूल्यांकनापेक्षा जास्त पैसे काढले की कमी पैसे काढलेले आहेत ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, एवढी सविस्तर माहिती आता माझ्याकडे नाही. ही माहिती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री. मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेचा जो आत्मा आहे तो नीट तपासून उत्तर दिलेले नाही. या लक्षवेधी सूचनेमध्ये महत्वाचे दोन प्रश्न आहेत. एक प्रश्न पैशाच्या अपहारासंबंधीचा आहे आणि दुसरा प्रश्न ज्या महिला सरपंचाला त्यांनी धमकी दिली त्यांना संरक्षण देण्यासंबंधीचा आहे. त्यांना द्यावयाच्या संरक्षणाच्या बाबतीत या निवेदनामध्ये काहीही उल्लेख केलेला नाही. त्यांना कोणी संरक्षण द्यावयाचे याचे उत्तर माननीय मंत्रिमहोदयांनी द्यावयास पाहिजे होते. अशा पध्दतीने ज्या ज्या गावांमध्ये महिला सरपंच होतील त्यांना अशा गुंडांपासून कोण संरक्षण देणार ? त्या भागामध्ये जे गट विकास अधिकारी होते त्यांचे ग्रामसेवकाला खास संरक्षण आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहे. त्या ग्रामसेवकावर अमल गाजविण्याची गट विकास अधिकाऱ्याची काही जबाबदारी नाही काय ? तुम्ही असे करु नका असे सांगण्याची त्यांची जबाबदारी नाही काय ? त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल व्हावयास पाहिजे होता. महिलांना संरक्षण देणे हे शासनाचे कर्तव्य नाही काय ? त्या ग्रामसेवकावर कोणती कारवाई करणार ? ती महिला सुरक्षित राहील, तिला त्रास होणार नाही तसेच अपहार झालेले पैसे वसूल केले जातील याबाबतीत माननीय मंत्रिमहोदय सदनामध्ये कधी माहिती देणार ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, पहिल्या प्रश्नाचे उत्तर असे आहे की, जोपर्यंत सरपंच तक्रार करीत नाही..

डॉ. नीलम गोऱ्हे : मी आपल्याला तारीख सांगितलेली आहे.



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : ग्रामसेवकाने सरपंचाच्या घरी जाऊन शिविगाळ केली. परंतु मी स्वत: चौकशी केली तेव्हा अशी माहिती मिळाली की, सरपंच पोलीस स्टेशनपर्यंत गेल्या होत्या परंतु त्या ठिकाणी त्यांचे कॉम्प्रमाईज झाले. याबाबत लेखी तक्रार आली नाही.

डॉ. नीलम गोऱ्हे : ती महिला निरक्षर आहे.

श्री. रणजित कांबळे : सन्माननीय सदस्यांना पाहिजे असलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे मी देणार आहे. मला माझे उत्तर पूर्ण करु द्यावे. लेखी तक्रार असती तर आम्ही ॲक्शन घेतली असती. या ठिकाणी स्वत: सन्माननीय सदस्य सांगत आहेत की, असे घडले आहे त्यामुळे याबाबत पुन्हा सविस्तर चौकशी करु. सरपंचांनी आज जरी अशी तक्रार दिली की, अशी घटना घडली आहे तर ते लक्षात घेऊन त्यांच्यावर ॲक्शन घेऊ.

श्री. अरविंद सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर देताना सांगितले की, त्या महिला सरपंच पोलीस स्टेशनपर्यंत गेल्या होत्या परंतु त्या ठिकाणी कॉम्प्रमाईज झाले. कॉम्प्रमाईज झाले असेल तर त्या दोघांचे लेखी आपल्याकडे आहे काय ? मी माझी तक्रार मागे घेते असे त्यांनी लेखी दिलेले आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : त्या ठिकाणी लेखी तक्रार नाही.

श्री. अरविंद सावंत : त्या ठिकाणी कॉम्प्रमाईज झाले असे आपण सांगितले.

श्री. रणजित कांबळे : मी अगोदरच सांगितले आहे की, लेखी तक्रार नाही. मी चौकशी केल्यानंतर मला अशी माहिती मिळाली की, त्या तक्रार देण्यासाठी पोलीस स्टेशनपर्यंत गेल्या होत्या. त्या ठिकाणी ग्रामसेवक सुध्दा गेले होते. शेवटी आपण वस्तुस्थिती विचारात घेतो. त्यांची काही लेखी तक्रार नाही म्हणून ॲक्शन घेऊ शकत नाही.

**उपसभापती** : आता हे प्रकरण कोणत्या स्टेजला आहे ?

श्री. रणजित कांबळे : त्यांची चौकशी चालू आहे. त्याला सस्पेंड केलेले आहे आणि त्याची रिकव्हरी होणार आहे. जी तक्रार आहे त्याबाबत पूर्ण चौकशी होईल.

**उपसभापती** : अपहार केलेली रक्कम मिळणार आहे काय ?

श्री. रणजित कांबळे : आम्ही त्यांच्यावर कारवाई करु.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ SBT/ MAP

**उपसभापती** : त्यांच्यावर काय कारवाई केली ?

श्री. रणजित कांबळे : जो अपहार झाला त्याबाबत त्यांच्यावर जी ॲक्शन घ्यावयास पाहिजे ती घेणारच आहोत. त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करु.

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते : त्या महिला सरपंच निरक्षर आहेत. त्या राखीव मतदारसंघातून निवडून आलेल्या आहेत. त्या तक्रार करण्यासाठी पोलीस स्टेशनला गेल्या होत्या असे मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरामध्ये सांगितले आहे. याचा अर्थ त्या महिलेला पोलीस स्टेशनला तक्रार नोंदवायची होती हे निश्चित झालेले आहे. परंतु त्यांच्यावर तक्रार न करण्याबाबत दबाव आलेला आहे. या ठिकाणी अत्यंत चाणाक्षपणे वाक्यप्रयोग करण्यात आलेला आहे. त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, रु. 1,83,424 इतक्या रकमेच्या वाटपाला सरपंच जबाबदार नसून ग्रामसेवक जबाबदार आहेत. महिला सरपंच ह्या निरक्षर आहेत. ग्रामसेवक आणि सरपंच यांचे जॉइण्ट अकौण्ट असते. महिला सरपंचानी पोलीस स्टेशनला तक्रार करु नये म्हणून त्यांना जिवे मारण्याची धमकी देण्यात आली. याचा अर्थ चेकवर त्यांच्या जबरदस्तीने सह्या घेतलेल्या आहेत. तेव्हा या संपूर्ण निधीच्या अपहारामध्ये ग्रामसेवक जबाबदार आहे. स्थानिक नेत्यांच्या राजकारणामध्ये महिला सरपंचांना हकनाक त्रास होता कामा नये. या बाबतीत शासनाची काय भूमिका राहाणार आहे ?

श्री. रणजित कांबळे : या विषयी मी सन्माननीय सदस्यांबरोबर चर्चा देखील केलेली आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, महिला सरपंचांना प्रशिक्षण आणि प्रोटेक्शन देण्याची आवश्यकता आहे. महिला सरपंचाना वेगळे प्रशिक्षण देण्याचे आम्ही ठरविलेले आहे. या संदर्भात पंचायत समितीमध्ये नियम करणार आहोत की, महिला संरपंचांचे जे काही प्रश्न असतील ते सोडविण्यासाठी बी.डी.ओ. आणि सभापती यांनी एक दिवस आणि वेळ ठरवून द्यावी.

**उपसभापती** : या प्रकरणी ग्रामसेवकाला निलंबित करण्यात आलेले आहे. हे प्रकरण दडपण्याकरिता ज्या अधिका-यांनी प्रयत्न केला त्या अधिका-यांची चौकशी करुन जे कोणी दोषी असतील त्यांच्यावरही कारवाई करावी.

श्री. रणजित कांबळे : ग्रामसेवकावर शिस्तभंगाची कारवाई केलेली आहे.

**उपसभापती** : निवेदनामध्ये गट विकास अधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा उल्लेख केलेला आहे. मी एवढेच सांगितलेले आहे की, हे प्रकरण ज्या अधिका-यांनी दडपण्याचा प्रयत्न केला असेल त्या अधिका-यांनाही शिक्षा करावी.

श्री. रणजित कांबळे : होय.

श्री. दिवाकर रावते : संबंधित पोलिस त्या महिला संरपंचांच्या घरी जाऊन तक्रार नोंदवून घेतील काय ?

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रणजित कांबळे : महिला सरपंच पोलीस स्टेशनला गेल्या होत्या. मी उप मुख्य कार्यकारी अधिका-यांना असे आदेश देणार आहे की, त्यांनी स्वत: पोलीस स्टेशनला जाऊन महिला सरपंचांची तक्रार नोंदवून घ्यावी.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे सदोष पुस्तके छापण्याचा घडलेला प्रकार

**मु. शी.** : राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे सदोष पुस्तके छापण्याचा घडलेला प्रकार यासंबंधी सर्वश्री संजय दत्त, गोविंदराव आदिक, सुरेशदादा देशमुख, राजन तेली, रमेश निकोसे, सुधाकर गणगणे, शरद रणपिसे, डॉ. एम.ए.अझिज, सर्वश्री. चंद्रकात रघुवंशी, रणजितसिंह मोहिते-पाटील, जितेंद्र आव्हाड, गुरुनाथ कुलकर्णी श्रीमती फौजीया खान, श्री. सदाशिवराव पोळ, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. राजेंद्र जैन, श्रीमती सुधा जोशी, सर्वश्री प्रतापसिंह मोहिते-पाटील, जैनुद्दीन जव्हेरी, धोंडीराम राठोड, पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, विनोद तावडे, मधुकर चव्हाण, रामनाथ मोते, सागर मेघे, श्रीकांत जोशी, विक्रम काळे, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री वसंत पवार, लक्ष्मण जगताप, वसंत चव्हाण, जगन्नाथ शेवाळे, व्ही.यू. डायगव्हाणे, प्रा. बी.टी.देशमुख, सर्वश्री वसंतराव खोटरे, जी.एल.ऐनापुरे, डॉ. नीलम गो-हे, डॉ दीपक सावंत, सर्वश्री मधुकर सरपोतदार, दिवाकर रावते, अरविंद सावंत, गोपीकिसन बाजोरिया, परशुराम उपरकर, ॲड. अनिल परब व श्री. सुरेश जेथलिया ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. संजय दत्त (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नवीन अभ्यासक्रमास अनुसरुन राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे इयत्ता 10 वीच्या मराठी माध्यमाच्या कुमारभारती या पुस्तकाच्या सुमारे 13 लक्ष प्रती छापण्यात येणे, सदर

..4..

(श्री. संजय दत्त...

पुस्तकात असंख्य चुका आढळून आल्याने ते रद्द करुन पुन्हा नव्याने पुस्तक छापण्यात येणे व ते केवळ सन 2007-08 या शैक्षणिक वर्षापुरतेच अभ्यासक्रमात ठेवण्याची पाठ्यपुस्तक पुनर्संपादन समितीने शिफारस करणे, सुमारे 13 लाख सदोष पुस्तके आधीच छापून घेण्याचा घडलेला प्रकार, परिणामी एका वर्षात या पुस्तकांची रद्दी होण्याची निर्माण झालेली शक्यता, यामुळे सुमारे साडेतीन कोटी रुपयांचा शिक्षण मंडळास पडलेला भूर्दंड, शैक्षणिक वर्ष सुरु होऊनही सदर पुस्तके विद्यार्थ्यांना न मिळाल्याने पाल्य व पालक यांच्यामध्ये निर्माण झालेला असंतोष, पुस्तक छपाईत वारंवार चुका होत असल्याने शिक्षण मंडळाचा खालावलेला दर्जा, शिक्षण मंडळाच्या व शासनाच्या गलथान कारभारामुळे विद्यार्थ्यांचे होत असलेले शैक्षणिक नुकसान, याबाबत शासनाने तातडीने करावयाची उपाययोजना, कार्यवाही व शासनाची भूमिका."

प्रा. वसंत पुरके (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय दत्त : या प्रकरणी शासनाचे एकूण किती रकमेचे नुकसान झालेले आहे ? या प्रकरणी नेमलेल्या समितीचे कामकाज सुरु झालेले आहे काय ? समितीला अहवाल सादर करण्यासाठी किती कालमर्यादा दिलेली आहे ? 10वीच्या मराठी पुस्तकातील चुकांप्रमाणे भूगोलाच्या पुस्तकामध्येही अनेक प्रकारच्या चुका आढळून आलेल्या आहेत हे खरे आहे काय, असल्यास त्या चुका कोणत्या स्वरुपाच्या आहेत ?

प्रा. वसंत पुरके : कुमार भारती हे पुस्तक पुनमुद्रित करण्याचा खर्च रु. 1,51,43,805.85 इतका आहे. या संदर्भात जी समिती गठित करण्यात आलेली आहे त्या समितीची बैठक आजच झालेली आहे.

नंतर कुमारी खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ SBT/ MAP/ प्रथम श्री. शिगम एम. ........ 16:20

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय........

( गोंधळ )

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी बोलत आहे, आपण सर्वांनी जरा शांत बसावे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, ही पुस्तके लिहिण्यासाठी जे संबंधित अधिकारी येतात किंवा शालेय पाठयपुस्तके लिहिण्यासाठी जी समिती गठित करण्यात आली होती त्या समितीची या पुस्तक छपाईतील चुकांमध्ये कोणत्याच प्रकारची जबाबदारी नाही किंवा त्यांची यामध्ये कोणतीही चूक नाही अशाच प्रकारचे निवेदन सरकारच्या वतीने देण्यात आलेले आहे. सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय मंत्रिमहोदयांनी सांगितले की, या सर्व प्रकरणामध्ये 1,51,43,805.85 एवढया रकमेचे शासनाचे नुकसान झालेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, शालेय पाठयपुस्तक लिहिणारे हे असे कोणते मंडळ आहे ? या समितीच्या या मंडळाच्या सदस्यांची सभागृहामध्ये नावे सांगावी आणि शाळेत जाणा-या मुलांच्या जीवनाशी खेळण्याचा हा जीवघेणा प्रयोग जो चालू आहे, त्याची जबाबदारी फिक्स सरकार करणार आहे का ? उपरोल्लेखित रकमेचे शासनाचे झालेले नुकसान आपण मंडळाकडून सरकार वसूल करणार आहे का ? या सर्व गोष्टींवर या ठिकाणी लवकरात लवकर कारवाई होणार आहे का ?

प्रा.वसंत पुरके : सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांपैकी पहिल्या प्रश्नाचे उत्तर हे पुढील प्रमाणे आहे. शालेय पुस्तक लिहिणा-या समितीचे तीन भाग आहेत. 1) अभ्यास मंडळ 2) संपादक मंडळ 3) समीक्षक 4) समन्वय मंडळ अशी चार मंडळे असतात. या समितीमध्ये काम करणारी सर्व मंडळी तज्ज्ञ आहेत आणि म्हणून सूचित केल्याप्रमाणे अभ्यास मंडळ हे नियंत्रक मंडळ म्हणून काम करते. या मंडळामध्ये काम करणा-या लोकांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. अभ्यास मंडळ : डॉ.दादा गोरे ( नियंत्रक ) श्री.एम.बी.हिंगोले,श्री.संजीव लाभे,डॉ.उषा खंदारे,सौ.सविता अलूर,डॉ.अशोक देशपांडे,डॉ.किसन पाटील,श्री.डी.बी.आळंदकर, संपादक मंडळ :श्री.गोविंद काजरेकर, श्रीमती इंदुमती जोंधळे, श्रीमती अलका पाटील,डॉ.पांडुरंग भानुशाली,श्री.रघुनाथ शेटकर, समन्वय मंडळ : श्री.श्री.वा.कुलकर्णी समीक्षक श्रीमती ज्योत्सना सरदेशपांडे,श्री.सी.पी.खांडगोरे,श्रीमती. कांचन परळीकर,श्रीमती डी.ए.जोशी अशा प्रकारे ही सगळी त्यांची नावे आहेत हे झाले पहिल्या प्रश्नाचे उत्तर. दुसरा प्रश्न होता तो त्यांच्या जबाबदारींबाबतचा

TT - 2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.वसंत पुरके.......

तर त्याचे उत्तर असे आहे की, या मंडळामध्ये काम करणा-या सर्व तज्ज्ञांची जबाबदारी निश्चित केलेली आहे. सन्माननीय सभापती महोदय, अशा प्रकारे शालेय पाठयपुस्तकांध्ये चुका होत असतील आणि दुरुस्तीनंतरही त्यामध्ये आणखी चुका राहत असतील तर हा शाळेत जाणा-या मुलांच्या आयुष्याशी खेळलेला खेळ आहे यासंदर्भात पुनर्संपादन समिती नियुक्त करुन पुढील कार्यवाही सुरु करण्यात आली. छपाईचे आदेश दिल्यापासून छपाईस स्थगितीचे आदेश देईपर्यंतच्या कालावधीत बालभारतीकडून प्राप्त माहितीनुसार या पुस्तकाच्या 13,01,425 प्रती पूर्ण स्वरुपात छापून तयार झाल्या होत्या आणि या सर्व प्रती रद्दीमध्ये गेल्या. इयत्ता 10 वीच्या कुमारभारती या पुस्तकातील निदर्शनास आलेल्या चुका व त्यावर केलेली कार्यवाही याची चौकशी करण्यासाठी शासनाने श्रीमती प्रतिमा उमरजी,माजी प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली असून,या समितीमध्ये शिक्षण क्षेत्रातील व साहित्य क्षेत्रातील अनुभवी व्यक्तींचा समावेश करण्यात आलेला आहे. या समितीने खालील बाबींवर चौकशी करुन स्वयंस्पष्ट व सविस्तर अहवाल शासनास सादर करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत व अहवालामध्ये ज्यांच्या चुका आहेत अगर शालेय पाठयपुस्तकांमधील चुकांकरिता जो कोणी जबाबदार असेल त्यांच्यावर शासनातर्फे कारवाई केली जाईल.

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सभापती महोदय,......

( गोंधळ )

श्रीमती सुधा जोशी : शासनाचे 1,51,43,805.85 एवढया रकमेचे झालेले नुकसान मंडळ भरुन देणार आहे का.... ? ( गोंधळ )

श्री.विनोद तावडे : सन्माननीय सदस्या श्रीमती सुधाताई जोशी जरा एक मिनिट मला बोलू द्या.यासंदर्भात सविस्तर चौकशी करुन चौकशी अहवाल शासनास सादर करावयाचा आहे तरीपण कुमारभारती इयत्ता 10 वीची लाखो पुस्तके रद्दीमध्ये गेली यास जबाबदार कोण ?

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.विनोद तावडे प्रश्न विचारा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय माझा पहिला प्रश्न असा आहे की, सिलॅबस बदलल्यानंतर 10 वीची पुस्तके नवीन छापावी लागणारच चौकशी अहवालाची वाट पाहण्याची काय गरज ? चौकशी करावयाची काय गरज ? सहावी,आठवी आणि दहावीचे सिलॅबस बदलल्यानंतर

TT - 3



JPK/ SBT/ MAP/ प्रथम श्री. शिगम एम. ........ 16:20

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

नवीन पुस्तके छापावी लागणारच तरीदेखील ही पुस्तके उशिरा छापावयाला का घेतली ? पुस्तके छापण्याचे पण काही तुमचे टाईमटेबल वगैरे ठरलेले होते का ? आणि ठरले असेल तर ते काय ठरले होते ? हे या सभागृहाला कळले पाहिजे. दुसरा प्रश्न असा आहे की, ही शालेय पुस्तके छापण्याकरिता जी बॉडी अपाईंट केलेली आहे त्या बॉडीच्या मेंबर्सना बैठकीमध्ये फक्त येण्याजाण्याचे मानधन दिले जाते, पाठयपुस्तके लिहिण्यासाठी त्यांना पैसे दिले जात नाहीत त्यामुळे या बॉडीचे मेंबर्स बैठकांना जात नाहीत व चार चार महिने या बॉडीच्या मिटींगच होत नाहीत. या बॉडीच्या मेंबर्सच्या मानधनामध्ये काही बदल करणार आहात का ? कारण त्यांचे टी.ए.,डी.ए.मिळावयाला सहा - सहा महिने लागतात, याचा विचार तुम्ही केला आहे का ? तिसरा प्रश्न असा आहे की, अभ्यासक्रमच जर मूळात बदलत असेल तर वेळेत पुस्तके छापावीत असे आदेश द्यावयाला पाहिजे होते आणि हे सगळे व्यवस्थित मॉनिटर केले पाहिजे हे मॉनिटर करणारे कोण आहे ? आणि त्यांच्यावर काय कारवाई करणार आहात ? शालेय पाठयपुस्तकांच्या छपाईमध्ये या ज्या चुका झ ालेल्या आहेत त्या चुकांसाठी जबाबदार असलेल्या व्यक्तींवर शासन कोणत्या प्रकारची कारवाई करणार आहे ? आणि अशा चूका पुन्हा होऊ नये म्हणून आपण पुढे काय करणार आहात ? ते या सदनाला सांगण्यात यावे.

यानंतर श्री.कानडे.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र. 3 पुढे सुरु ...

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, जेव्हा जेव्हा नवीन अभ्यासक्रम येतो त्यावेळी त्यासंबंधीचे वेळापत्रक ठरलेले असते. यामध्ये कोठेही विलंब झालेला नाही. मुलांना वेळीच म्हणजे पहिल्याच दिवशी पुस्तके मिळाली. विलंब होऊ नये याची दखल घेतली गेली होती. अभ्यासगट निश्चित करणे अभ्यासक्रम निश्चित करणे याचे नियोजन केलेले आहे. सगळी पुस्तके छापून झाली आणि मार्केटमध्ये जाणार अशी स्थिती असताना या सर्व चुका निदर्शनास आल्या. अभ्यास गटाने आणि प्रकाशकाने चुका दुरुस्त करण्याकडे लक्ष न दिल्यामुळे समिती गठीत केलेली आहे. उशिरा आदेश दिलेले नाहीत. आदेश वेळीच काढलेले आहेत. मायक्रोस्टडी करणे आणि मायक्रो इन्व्हेस्टीगेशन करणे अभ्यासमंडळाचे काम होते. अनेक त्रुटी राहिलेल्या आहेत. 800 चुका होणे ही लाजीरवाणी बाब आहे. यासंदर्भात जे कोणी दोषी असतील त्यांच्यावर कारवाई केली जाईल आणि रक्कम वसूल केली जाईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, डॉ.वसंत काळपांडे यांना हटविण्याची मागणी आम्ही केली होती त्याकडे वेळीच लक्ष दिले असते तर आज ही वेळ आली नसती....

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, जे कोणी दोषी असतील त्यांची चौकशी होऊन कारवाई केली जाईल.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, गंभीर बाब अशी आहे की, एसएससी बोर्ड 9 वी,10 वी,11 वी आणि 12 वी च्या परीक्षा घेऊन अभ्यासक्रम निश्चित करते. आपल्याकडे प्राथमिक शिक्षणासाठी एनसीआरटी कौन्सिल आहे त्याच पध्दतीचे कौन्सिल 9 वी 10 वी 11 वी साठी असणे आवश्यकआहे. अशा प्रकारचे कोणतेही मंडळ अस्तित्वात नाही. त्यामुळे फक्त परीक्षा घेणे आणि परीक्षा मंडळाकडून अभ्यासक्रम तयार करायला लावणे यामुळे त्यामध्ये चुका होतात. मूल्यमापन,संशोधन आणि प्रशिक्षण या तीनही बाबतीत शासन कौन्सिल स्थापन करणार आहे काय

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, एनसीआरटीचे कार्यक्षेत्र वेगळे आहे त्याचा याविषयाशी संबंध नाही. त्रुटी असतील तर त्या निश्चितपणाने दुरुस्त करता येतील.

श्री. कपिल पाटील : शासन स्वतंत्र मंडळ स्थापन करणार आहे काय ? कारण कितीही दुरुस्त्या केल्या तरी चुका होत राहणार ?

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, यासंदर्भात कोणत्या प्रकारची उपाययोजना करावी यासंबंधी विचार करुन आणि अशा प्रकारच्या चुका होणार नाही याची दक्षता घेतली जाईल.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. व्ही.यु. डायगव्हाणे : सभापती महोदय, 10 वी च्या पुस्तकामध्ये 800 चुका काढणे ही शिक्षण विभागाच्या दृष्टीने अतिशय लाजीरवाणी बाब आहे. चौकशीसाठी जी समिती नेमलेली आहे त्याला कालमर्यादा घालून दिलेली आहे. दोन विषयांच्या बाबतीत चौकशी होईल. परंतु प्रिंटींग प्रेसचा यामध्ये दोष आहे किंवा नाही हे पाहिले पाहिजे......

नंतर श्री. भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

याशिवाय गाईड तयार करणारी एजन्सी आहे, पुस्तके येण्याअगोदर गाईड बाजारात विक्रीसाठी येतात. या एजन्सीची सुध्दा चौकशी होणे आवश्यक आहे. भाषा विषयाच्या 9 लोकांची डॉक्टर म्हणून नेमणूक केली आहे. हे पीएचडी केलेले लोक अभ्यासक्रम ठरवितात ही चुकीची बाब आहे. गाईड तयार करणारी एजन्सी आणि प्रिंटिंग प्रेस यांच्याबाबत चौकशी होऊन एका महिन्यात अहवाल सादर केला जाईल काय?

प्रा.वसंत पुरके : अभ्यासक्रम ठरविणारे हे तज्ज्ञ असले पाहिजेत, निष्णात असले पाहिजेत, परफेक्ट असले पाहिजेत. हे आपलेच बंधू आहेत. सभापती महोदय, यांच्याकडून बिलकूल चुका अपेक्षित नव्हत्या. डॉक्टर असताना सुध्दा त्यांच्याकडून चुका झालेल्या आहेत. जे कोणी दोषी असतील त्या दोषी व्यक्तींना कोणी सोडणार नाही.

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : प्रिंटिंग प्रेसची चौकशी होईल काय?

प्रा.वसंत पुरके : यामध्ये जे जे कोणी दोषी असतील त्या संदर्भात विधी व न्याय विभागाच्या माजी सचिव, संचालक आणि इतर 5 लोकांची समिती नेमली आहे, ते सूचना करतील त्याप्रमाणे अंमलबजावणी केली जाईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माजी शिक्षणमंत्री श्री.अमरीश पटेल यांनी या अभ्यासक्रमाबाबत क्रांतीकारक निर्णय घेतला होता. या सभागृहात मी चर्चा घडवून आणली होती. श्री.अमरीश पटेल यांच्यासमवेत सभागृहाचा सदस्य म्हणून मी ठामपणे त्यांच्यामागे उभा राहिलो होतो. पाठ्यपुस्तक मंडळाचा प्रिंटर म्हणून मी काम केले आहे. कागद घेण्यापासून किती भ्रष्टाचार होतो यावर मी सभागृहात प्रकाश टाकला होता. कागदांची डिलिव्हरी घेण्यापर्यंत मी सूचना केली होती. प्रिंटर म्हणून काम करीत असताना वर्षाला 40 ते 50 लाख पुस्तके मी छपाई करीत होतो. कमीत कमी 15 टक्के निधी पाठ्यपुस्तक मंडळातील अधिकारी स्वाहा करतात हे मी सभागृहात सांगितले होते. याठिकाणी चुकीची चर्चा चाललेली आहे. यामध्ये प्रिंटरचा दोष नाही. कार्यक्रम ठरलेला आहे. ऑक्टोबरमध्ये निगेटिव्ह तयार होते. नोव्हेंबरमध्ये पॉझिटिव्ह तयार होऊन डिसेंबरमध्ये करेक्शन होऊन प्रिंटिंगसाठी काम दिले जाते. 235 पृष्ठांवर एवढ्या चुका असतील तर एका तरी पृष्ठावर करेक्शन केले की नाही हा प्रश्न आहे. पहिल्यांदा पाठ्यपुस्तक मंडळाच्या संचालक व इतर लोकांना सस्पेंड केले पाहिजे ही माझी मागणी आहे. प्रिंटरची चौकशी





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील........ लक्षवेधी सूचना क्र.3.....

कशासाठी करता? ज्यांचा प्रिंटरवर डायरेक्ट कंट्रोल आहे त्यांना सस्पेंड करावे. उच्च पातळीवर चौकशी होत नाही त्यापूर्वी यांची चौकशी करावी. मी पुराव्यानिशी सर्व प्रश्न सभागृहात मांडले होते. पाठ्यपुस्तक मंडळाच्या अधिकाऱ्यांना नागपूरहून रेल्वेने येत असताना पैसे घेताना पकडल्यामुळे तत्कालीन शिक्षणमंत्री श्री.अमरीश पटेल यांनी सस्पेंड केले होते. मंत्रीमहोदयांनी याठिकाणी थातुरमातूर उत्तरे देणे योग्य नाही. याठिकाणी चुकीची चर्चा होत आहे. पाठ्यपुस्तक मंडळामध्ये काय काळेबेरे चालते हे मी सभागृहात सांगितले आहे. सभागृहाचा सदस्य म्हणून माझी प्रामुख्याने मागणी आहे की, मंडळाच्या संचालकांना सस्पेंड करावे. ही मागणी मान्य करणार आहात का?

प्रा.वसंत पुरके : मी मान्य केल्याप्रमाणे उच्चस्तरीय समिती गठित केली आहे. एका महिन्याच्या आत कारवाई केली जाईल.

(नंतर श्री.जुन्नरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य जागेवर उभे राहून घोषणा देत असतात.)

**उपसभापती** : सन्माननीय शिक्षणमंत्री माहिती देत आहेत त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी कृपया आपापल्या जागेवर जावे.

प्रा. वसंत पुरके : सभापती महोदय, जे दोषी आहेत त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई केली जाईल. यासंदर्भात समितीही गठीत करण्यात आलेली असून दोषी व्यक्तींवर निश्चितपणे कारवाई केली जाईल.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य घोषणा देत असतात. )

प्रा. वसंत पुरके : सर्व सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेऊन मी आपणास सांगू इच्छितो की, यांसदर्भात एक उच्च स्तरीय समिती गठीत करण्यात आली असून यांसदर्भातील निर्णय एक महिन्यात घेण्यात येईल. सभापती महोदय, मराठी ही आपली मातृभाषा असल्यामुळे पुस्तकातील चुका आपल्या लवकर लक्षात आल्या परंतु अन्य भाषेच्या पुस्तकांच्या चुकांच्या संदर्भात देखील निश्चितपणे कारवाई करण्यात येईल.

( दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य आपापल्या जागा सोडून घोषणा देत असतात. )

**उपसभापती** : अशा परिस्थितीत मला सभागृहाचे कामकाज चालवणे शक्य नसल्यामुळे मी सभागृहाची बैठक 15 मिनिटांसाठी स्थगित करीत आहे.

( सभागृहाची बैठक 4 वाजून 38 मिनिटांनी 15 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आली. )

-----

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उपसभापती )**

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, शिक्षण खात्याला काळिमा फासणारा प्रकार महाराष्ट्रात घडलेला आहे. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी हा प्रश्न येथे चर्चेला आलेला आहे. या प्रश्नाच्या बाबतीत संपूर्ण सभागृहात असंतोष आहे. हे पाठ्यपुस्तक मंडळ बरखास्त करावे अशा तीव्र स्वरुपाच्या भावना सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेल्या आहेत. शिक्षणाच्या दृष्टीने हा निर्णय अतिशय महत्वाचा ठरणार आहे. या निर्णयामुळे एक चांगला मेसेज जाणार आहे. एक कोटी-दीड कोटी रुपयांचे नुकसान झाले यास मी फारसे महत्व देत नाही. परंतु शिक्षण मंडळात प्रचंड गोंधळ चालू आहे तो आपण थांबविला पाहिजे. पाठ्यपुस्तक मंडळ आहे किती कार्यक्षम आहे, किती कार्यतत्पर आहे यांचे ज्वलंत उदाहरण या मंडळाने घालून दिलेले आहे.

यानंतर श्री.पुरी.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SSP/ KGS/ SBT/ MAP/ MAP/ पूर्वी श्री.अजित.... 16:55

श्री.पांडुरंग फुंडकर....

म्हणून मी याठिकाणी शालेय शिक्षण मंत्र्यांना विनंती करतो की, संपूर्ण सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना लक्षात घेता, सभागृहातील प्रत्येक पक्षातील एक याप्रमाणे 4-5 सन्माननीय सदस्यांची एक समिती गठित करुन त्या समितीशी उद्यापर्यंत चर्चा करावी व शनिवारपर्यंत याबाबतीत ठोस अशाप्रकारचा निर्णय घेऊन तो सभागृहामध्ये जाहीर करावा, अशी माझी मागणी आहे.

श्री.मधुकर सरपोतदार : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी याठिकाणी लक्षवेधी सूचनेसंदर्भात एक प्रस्ताव सदनासमोर ठेवलेला आहे. ही लक्षवेधी सूचना शिक्षणासारख्या पवित्र कामामध्ये झालेल्या घोटाळयाची व गोंधळाची आहे. त्यामुळे संपूर्ण शिक्षण क्षेत्रामध्ये पाठयपुस्तकातील चुकामुळे गोंधळ निर्माण झालेला आहे. शिक्षण मंडळामार्फत पुस्तके पब्लीश होतात. परंतु त्यामध्ये शूर छत्रपती शिवाजी महाराजांच्या व संभाजी महाराजांच्या धडयास स्थानच दिलेले नाही. आपल्या राज्यात हे काय चालले आहे ? माननीय प्रा.पुरके साहेब, आपण महाराष्ट्र राज्याचे शिक्षण मंत्री आहात, आपण स्वत: प्राध्यापक आहात. खरे म्हणजे, आपणच याबाबतीत पुढाकार घेऊन शिक्षण मंडळ बरखास्त करावयास पाहिजे होते. परंतु तसे झालेले नाही. याठिकाणी माननीय श्री.पांडुरंग फुंडकर साहेबांनी जी सूचना केली, त्यासंदर्भात 4-5 सन्माननीय सदस्यांनी एकत्रित बसून शिक्षण मंत्र्यासोबत चर्चा करावी व याविषयी निर्णय लवकरात लवकर घ्यावा. माझी या विषयी विनंती आहे की, शिक्षणाचे पवित्र काम असल्यामुळे यामध्ये कुठल्याही प्रकारचे राजकारण न करता किंवा यामध्ये कोणतेही ढोंग निर्माण न करता आपण उचित निर्णय लवकरात लवकर जाहीर करावा.

श्री.जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, अतिशय गंभीर विषयावर याठिकाणी चर्चा होत आहे. एका पाठयपुस्तकात 800 चुका झालेल्या आहेत. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदाच आपण "ग" गवताचा, "ग" गणेशाचा असताना तो "ग" गध्याचा, "म" मम्मीचा, "उ" उल्लूचा करीत आहात. त्यानंतर पुढे महाराष्ट्रात काय होईल हे मला आता सांगता येणार नाही. आज अशाप्रकारे माय मराठीचा गळा दाबला जात आहे. मराठीचा एवढा अपमान होत असताना या सभागृहातील सन्माननीय सदस्यांच्या भावना तीव्र असणे हे स्वाभाविकच आहे, यात नाविन्यपूर्व असे

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड...

काहीही नाही. हा विषय आपण किती गांभीर्याने घेता हा महत्वाचा भाग आहे. आपण म्हणता की, मंडळावर डॉक्टरेट झालेल्या व्यक्ती आहेत. परंतु त्यांच्या हातून व्याकरणाच्या असंख्य चूका झालेल्या आहेत. असे जर होत असेल तर ही चूक पुस्तकापर्यंतच मर्यादित राहणार नसून पुढच्या पिढीसही आपण अशा पध्दतीने बिघडवित आहात. भाषेच्यादृष्टीने हा महत्वाचा विषय आहे, म्हणून झालेल्या चुकीच्याबाबतीत जबाबदारी फिक्स करणे अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये चूक कोणाची आणि त्याची शिक्षा भोगायची कोणी ? माननीय श्री.गडकरी साहेबांनी मघाशी सांगितले की, प्रा.पुरके साहेबांसारखा एक आदिवासी क्षेत्रात काम करणारा प्रोफेसर या ठिकाणी मंत्री म्हणून पोहचला, त्यांच्याबद्दल निश्चितपणे आमच्या मनात आदराची व प्रेमाची भावना आहे. परंतु याठिकाणी मला समजत नाही की, माननीय पुरके साहेब, आपण हे सगळे आपल्या अंगावर का घेत आहात ? याबाबतीत चूक करणाऱ्यास धडा शिकवावयास पाहिजे. आपल्या पाठयपुस्तकाच्या धडयामध्ये "मै फेंके हुए पैसे नही उठाता" अशाप्रकारचे दिवार पिक्चरमधील अमिताभचे संवाद टाकत आहात. उद्या पाठयपुस्तकात "शोले", "अर्धसत्य", "शूट आऊट ऑफ लोखंडवाला" पिक्चरमधील संवाद टाकाल.

नंतर श्री.रोझेकर....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.जितेंद्र आव्हाड...........

विद्यार्थ्यांपुढे असा इतिहास जावा ? आणि अशा प्रकारे जर इतिहासाचा विध्वंस करणार असाल तर शिक्षण क्षेत्र कुठे चालले आहे, याचे कुठे तरी आपण भान ठेवू या. मराठी भाषा वाचावी, आय.ए.एस.परीक्षेसाठी मराठीचा समावेश व्हावा, यासाठी आपण एकीकडे भांडत आहोत, जे आवश्यकही आहे. परंतु, ते सोडून आपल्याला आता आपणच तयार केलेल्या मराठीतील पाठयपुस्तकांसाठी भाडावे लागत आहे, ही अतिशय लाजीरवाणी गोष्ट आहे. मला मंत्रीमहोदयांना एवढेच सांगावयाचे आहे की, हे सर्व पाप आपण आपल्या खांद्यावर घेऊ नका, आपला खांदा मजबूत आहे आणि तो महाराष्ट्राला हवा आहे. यासंदर्भात समिती नेमण्याबाबत विरोधी पक्षनेत्यांनी जी सूचना केली आहे, ती योग्य आहे. ही आज मराठीची गरजही आहे आणि त्यादृष्टीने कार्यवाही करावी, अशी माझी विनंती आहे.

श्री.गुरुनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, या लक्षवेधीच्या निमित्ताने विरोधी पक्षनेते, श्री.पांडुरंग फुंडकर यांनी जो प्रस्ताव सभागृहासमोर मांडला आहे, त्याचे मी समर्थन करतो. या लक्षवेधीच्या निमित्ताने अतिशय गंभीर अशी चर्चा झाली. कुणी विरोधी पक्षनेत्यांकडून या चर्चेसाठी पुढाकार घेतला, सत्तारुढ पक्षाकडून काही विरोधी झाला असे मला या चर्चेतून दिसून आले नाही. या निमित्ताने जे प्रश्न उपस्थित झाले ते पहाता संपूर्ण सभागृहाच्या भावना अतिशय तीव्र आहेत. आमच्या सर्वांचाच हा आग्रह होता. सन्माननीय सदस्य, श्री.जयंत पाटील यांनी त्यांच्या भाषणात सांगितले, त्यांचा स्वत:चा अनुभव असल्याने ते तळमळीने बोलले की, जर कारवाईच करावयाची असेल तर आत्ता लगेच कारवाई केली पाहिजे. ही लक्षवेधी संपण्याच्या अगोदर व पुढची लक्षवेधी सूचना पुकारण्याच्या अगोदर कारवाई झाली पाहिजे, अशाही भावना अन्य काही सहका-यांनी व्यक्त केल्या. आताच आपल्या दालनामध्ये सर्व गटनेत्यांची व अन्य काही सहकारी सदस्यांची बैठक झ ाली व आपण चर्चा केली. महाराष्ट्राला दिशा देण्याचा प्रयत्न या निमित्ताने होणार आहे, त्यात कुठल्याही प्रकारची घाई होता कामा नये म्हणून सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जो प्रस्ताव या ठिकाणी मांडला आहे, त्याचे मी समर्थन करतो. दोन दिवसांमध्ये सभागृहातील प्रमुख सन्माननीय सदस्य, गटनेते, अन्य काही सहकारी एकत्र बसून आपण निर्णय घेऊ या. या सभागृहाच्या

..2.........



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.गुरुनाथ कुलकर्णी...........

माध्यमातून तशा प्रकारचा निर्णय शिक्षण मंत्री, प्रा.वसंत पुरके हे घेतील आणि तसे निवेदन करतील, अशी मला आशा आहे. जो प्रस्ताव सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी मांडला आहे त्याचे मी समर्थन करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, वरच्या सभागृहामधून जे अपेक्षित आहे तसेच घडत आहे त्यामुळे या सभागृहातील माझ्या सहका-यांबद्दल मला मनापासून अभिमान आहे आणि मी त्यांना धन्यवादही देतो. हे करीत असतांना नक्की आपण कशावर बोलतो आहोत, मोठया आवाजात बोलत होतो, छोटया आवाजात बोलत होतो, प्रत्येक सदस्य वेगवेगळया पद्धतीने या समस्येकडे पहात आहे. शिक्षक आमदार आहेत ते अशा पद्धतीने पहात असतील की, पाठयपुस्तकात ज्या चुका झाल्या आहेत त्या जर विद्यार्थ्यांना शिकविल्या आणि तर शिक्षकांवर कारवाई होईल, या दृष्टीकोनातून ते पहात असतील. हे नाकारताही येणार नाही. माझे मित्र, तरुण तुर्क सन्माननीय सदस्य, श्री.जितेंद्र आव्हाड यांनी असे सांगितले की, कोण डॉक्टर आहेत, काय आहेत, हे मला माहित नाही. ते साहित्यामध्ये एवढा रस घेत असल्यामुळे शंका निर्माण झाली. परंतु, यामध्ये नक्की कोण दोषी आहेत ? कारण, जवळ जवळ 36 अभ्यास मंडळे आहेत. आता प्रचारात आलेले भूमिती, गणीत, नागरिक शास्त्र, भूगोल ही पाठयपुस्तके शंभर टक्के चुकांनी भरलेली आहेत. ती वेगळी मंडळे आहेत. तुम्हाला जसे वाटते आहे ते तसे नाही. अशा दृष्टीने हा गंभीर प्रश्न आहे. चोर सोडून सन्यासाला फाशी द्यावयाचे आहे काय, याचाही विचार केला पाहिजे. कारण नेमके कोण दोषी आहेत, हे आपण कसे ठरविणार ? तुम्ही सांगता याला शिक्षा करा, त्याला शिक्षा करा, पण हे आपण कसे ठरविणार ? यासाठी योग्य चौकशी समिती असावी, हा महत्वाचा मुद्दा आहे. श्रीमती उमरजी यांच्याबद्दल प्रश्न नाही. मी या ठिकाणी लक्षवेधीच्या इतर तपशिलात जाणार नाही, मला ज्या काही सूचना करावयाच्या आहेत त्या मी समितीसमोर मांडणार आहे. एक गोष्ट मात्र नक्की आहे. श्रीमती उमरजी यांच्या हाताखाली जी मंडळी नेमली आहेत ती बायस आहेत.

यानंतर श्री.बोरले...........

अग्रेषित प्रत / मुद्रणासाठी नाही

GRB/ SBT/ MAP/ प्रथम श्री.रोझेकर ....... 17:05

श्री.दिवाकर रावते .........

त्यांच्या संदर्भात मी पुराव्यानिशी रिमार्क्स देऊ शकतो, अशी परिस्थिती आहे. ज्यांची चौकशी करावयाची आहे त्यांची चौकशी न करता भलत्यांची चौकशी करावयास निघालो आहोत, अशी परिस्थिती आहे. श्रीमती उमरजी या प्रशासनातील एक चांगल्या सचिव होत्या. त्यांनी सचिव म्हणून राज्य प्रशासनामध्ये चांगले काम केलेले आहे. या चौकशी समितीचे कामही त्या व्यवस्थित करतील याबद्दल आमचे दुमत नाही. सभापती महोदय, यामध्ये अनेक गोष्टी दडलेल्या आहेत. परंतु आताच्या ज्या सन्माननीय अध्यक्षा आहेत त्यांनी इयत्ता दहावीच्या कुमारभारती पुस्तकामध्ये एक रिमार्क्स लिहून ठेवलेला आहे. आता निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे त्यांना त्या पदावर राहता येईल की नाही, असा प्रश्न निर्माण होतो. निर्दोष पाठयपुस्तक देणे हे त्यांचे कामच आहे. त्यांनी पुस्तकात असा रिमार्क्स छापलेला आहे की, पाठयपुस्तक अधिकाधिक निर्दोष करण्यासाठी नियुक्त समितीने घेतलेले परिश्रम. याचा अर्थ असा होतो की, आपण जी एकच समिती समजतो आहोत तसे नसून पाठयपुस्तक परिक्षणासाठी एखादी विशिष्ट समिती असली पाहिजे. अभ्यास मंडळ वेगळे आणि पाठयपुस्तकांची छपाई व निर्दोषपणा तपासणारी समिती वेगळी असली पाहिजे. म्हणून मी यापूर्वी असे म्हणालो होतो की, चोर सोडून सन्याशाला फाशी देता कामा नये. छपाई कशी असली पाहिजे यासंदर्भात चित्रलेखा साप्ताहिकामध्ये एक सुंदर लेख आला होता. श्री.काळपांडे यांनी यासंदर्भात काय केले आहे, या सर्व बाबी समितीसमोर येतीलच. तो माझा विषय नाही. सभागृहातील शिक्षक प्रतिनिधी या विषयावर अधिकारवाणीने बोलतील. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या ज्या अध्यक्षा आहेत त्यांना ताबडतोब तेथून हटविल्याशिवाय योग्य प्रकारे चौकशी होईल, असे मला वाटत नाही. "सदोष पुस्तके स्वीकारा", असे जर मंडळाचे अध्यक्ष सांगत असतील तर ते चुकीचे आहे. आता पर्यंत आठ पुस्तके सदोष निघालेली आहेत. माननीय मंत्री प्रा.वसंत पुरके साहेब, मला भिती वाटायला लागली आहे. मी तुमच्यावर आरोप करणार नाही. पाठयपुस्तकामध्ये चुका झाल्यानंतर महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांचे पुढे काय होणार, हा विषय मांडणे चुकीचे नव्हते. गणिताच्या पाठयपुस्तकामध्ये तीन प्रश्न चुकीचे असल्यानंतर विद्यार्थ्यांचे भवितव्य काय असणार आहे ? त्या विद्यार्थ्यांच्या हितासाठी, भविष्यासाठी आपण 30 गुण देण्याचा निर्णय घेतला आणि तो सर्वांनी स्वीकारला. विद्यार्थ्यांना 30 गुण वाढवून देण्याच्या निर्णयाचे परिणाम आता

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते .........

आपण भोगत आहोत. पाठयपुस्तकामध्ये चुका असतील तर विद्यार्थी असे म्हणतील की, मी लिहिलेले उत्तर बरोबर आहे. कारण एकाच प्रश्नाची चार वेगवेगळी उत्तरे वेगवेगळया पाठयपुस्तकात आलेली आहेत. पाठयपुस्तकांची छपाई ज्या ठिकाणी डी.टी.पी.च्या माध्यमातून होत आहे आणि ती ज्यांच्यामार्फत होत आहे ते दक्षिण भारतीय आहेत. त्या माणसाला मराठीचे काहीही ज्ञान नाही. या सर्व चुकांचे मूळ या ठिकाणी आहे, असे मला वाटायला लागले आहे. माझ्याकडे जी माहिती आहे ती मी ऑथेंटिकरीत्या कशी सांगू ? सन्माननीय सदस्य, श्री.जयंत पाटील या विषयावर जे बोलले, ते बरोबर आहे. पूर्वी असे व्हायचे की, पाठयपुस्तकाचे प्रारुप तयार झाल्यानंतर मुद्रणापूर्वी ते तपासण्यासाठी यायचे, ते तपासून त्यामध्ये दुरुस्त्या व्हायच्या व ते प्रारुप छपाईसाठी पाठविले जायचे. परंतु, आता तसे होत नाही. डायरेक्ट कॉम्प्युटरवर डी.टी.पी.करुन छपाई केली जाते. ज्यांना छपाईचे कंत्राट दिलेले आहे त्यांनी दक्षिण भारतीय कॉम्प्युटर ऑपरेटर नेमलेला आहे. असा हा सर्व घोळ आहे.

सभापती महोदय, महाराजांचा धडा पाठयपुस्तकातून वगळणे हा भावनिक विषय आहेच. कोणाला काय वाटते यापेक्षाही महाराजांचा विषय महत्त्वाचा आहे. हा धडा तातडीने का बदलला ? महाराजांचा धडा काढणे हा महाराष्ट्राचा अवमान आहे. सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांनी सांगितल्याप्रमाणे अध्यक्षांची त्या ठिकाणावरुन त्वरित बदली केली पाहिजे. कारण असे बायस लोक त्या पदावर असल्यानंतर काही चांगले घडेल, असे वाटत नाही. माननीय मंत्री महोदयांनी ते करावे, अशी मी विनंती करतो आणि सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो प्रस्ताव या निमित्ताने मांडलेला आहे त्याला पाठींबा देतो.

श्री.जी.एल.अैनापुरे : सभापती महोदय, मी फक्त मुद्याचे बोलणार आहे. या विषयावर सभागृहाचे कामकाज स्थगित होण्यापूर्वी सभागृहाने ज्या भावना व्यक्त केल्या त्या लक्षात घेता त्या वेळी यासंबंधी करावयाच्या कारवाईसाठी सभागृह पाच मिनीटही वेळ देण्यास तयार नव्हते. संबंधितांना ताबडतोब निलंबित करा, अशी मागणी एकमुखाने होत होती. सभागृह स्थगित इ ाल्यानंतर नेमके काय घडले, हे मला माहीत नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.अैनापुरे : सभापती महोदय, या विषयावर चर्चा झाली त्यावेळी मी सभागृहात उपस्थित होतो. जे सभागृहात घडले तेच मी येथे सांगतो आहे. कृपया मला माझे म्हणणे मांडू द्यावे. आता सभागृह या निर्णयाप्रत आले आहे की, यासंबंधी चौकशी करावी. म्हणजे आठवडयाभरानंतर यासंदर्भात कार्यवाही होणार आहे. संबंधितांना आताच निलंबित न करता आठवडयाभराची मुदत द्या, समिती नेमा, असे सर्व विचित्र आले म्हणून मी माझे मत व्यक्त केले.  दोन दिवस असो की तासभर असो, पण जेथे सभागृह पाच मिनीटे देण्यास तयार नव्हते, त्या ठिकाणी आता वेगळाच निर्णय होत आहे.

यानंतर श्री.गागरे .......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.अैनापुरे .....

एस.एस.सी. बोर्डाचा सरकारला पुळका का येतो ? हे मला माहिती नाही. मागच्या वेळी श्री.अमरीशभाई पटेल हे शिक्षण मंत्री असताना या विषयाबाबत सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी स्पष्टपणे सांगितले होते. आता मी सन्माननीय सदस्य श्री.मधुकर सरपोतदार यांना विनंती करतो की, तुमचे टेक्नीकल मुद्दे बाजूला ठेवा. तुमच्या टेक्नीकल मुद्याशी आम्ही फेस करु शकत नाही, आम्ही पराभूत होऊ व गप्पही बसू परंतु याचा अर्थ हा प्रश्न सुटला आहे असा होत नाही.

श्री.मधुकर सरपोतदार : सभापती महोदय, थोडया वेळापूर्वी या विषयाबाबत सभागृहात चर्चा सुरु असताना सन्माननीय सदस्य श्री.जी.एल.अैनापुरे सभागृहात नव्हते.

श्री.जी.एल.अैनापुरे : सभापती महोदय, मी कोणताही आरोप केलेला नाही, तुमचे काय ठरले आहे ? हे मला माहिती नाही. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी मांडलेल्या प्रस्तावापुरते मी बोलत आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, अभ्यास मंडळाच्या सर्व सदस्यांना ताबडतोब सस्पेंड करावे, अशी मागणी मी केलेली नव्हती. तसेच सभागृहातील सर्व सदस्यांनीही अशी मागणी केलेली नव्हती. थोडया वेळापूर्वी सभागृहात चर्चा झाली, तेव्हा सन्माननीय सदस्य श्री.जी.एल.अैनापुरे हे सभागृहात उपस्थित नव्हते.

माझा प्रस्ताव मांडण्याचा हेतू असा आहे की, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी सांगितले आहे की, एकूण 36 समित्या आहेत. अनेक चांगले तज्ज्ञ या समित्यावर आहेत. कारवाई करताना कोणावरही अन्याय होऊ नये म्हणून मी तशा प्रकारचा प्रस्ताव सुचविला आहे. जे खरोखर चुका करणारे व दोषी असतील त्यांना निश्चितपणे खडयासारखे बाजूला काढून त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे, हा आमचा उद्देश आहे. थोडया वेळापूर्वी सभागृहात चर्चा झाल्यानंतर पाच मिनिटात काय झाले ? असे सन्माननीय सदस्य श्री.जी.एल.अैनापुरे यांनी वाक्य वापरले आहे. याबाबत मी सांगू इच्छितो की, आम्ही काही सेटलमेंट करण्याकरिता गेलो नव्हतो. माननीय सभापतींनी सर्वपक्षीय सदस्यांना बोलावले होते. सभागृहाचे कामकाज सुरळीत चालावे, या सभागृहाकडून चांगल्या माणसांवर अन्याय होऊ नये ही प्रामाणिकपणाची भावना होती म्हणून हा प्रस्ताव सुचविण्यात आला आहे. या प्रकरणाबाबत मी सांगू इच्छितो की, शिक्षण मंत्र्यांना 8 दिवस नव्हे तर केवळ 2 दिवसांचा अवधी देण्यात आला आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जी.एल.ऐनापुरे : सभापती महोदय, माझे दोन्ही स्टेटमेंट मी मागे घेत आहे.

**उपसभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, सेटलमेंट करताना मी कोणालाही बरोबर नेत नसतो.

श्री.जी.एल.ऐनापुरे : सभापती महोदय, महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक मंडळ व एस.एस.सी. बोर्डामध्ये अनेक वेळा घोटाळे झालेले आहेत. परंतु कधीही या लोकांवर कडक कारवाई झालेली नाही. प्रत्येक वेळी चर्चा होते व ते सुटले जातात. मी या व्यवस्थेमध्ये 35 वर्षे होतो, बोर्डाने कधीही सरळ कारभार केलेला नाही. प्रत्येक वेळी काही ना काही चुका घडत आहेत. त्याची चर्चा होते, पेपरमध्ये येते. पूर्वी सभागृहात काय झाले हे मला माहिती नाही. मी सदस्य म्हणून आल्यानंतर पाहिले की, दरवर्षी या विषयावर मोठया प्रमाणावर चर्चा होते. परंतु प्रत्यक्ष कोणावरही कारवाई होत नाही. परंतु सध्या पाठयपुस्तक मंडळ व बोर्डाचे जे लोक आहेत. त्यांना 8 दिवस मुदत दिली तर 800 लोकांना मॅनेज करण्याची ताकद त्यांच्यामध्ये आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर येत आहे. त्यामुळे मी आपणास विनंती करतो की, सन्माननीय सदस्य श्री.जी.एल.ऐनापुरे यांना सभागृहाच्या बाहेर काढावे, त्यांना सस्पेंड करावे.

(सभागृहातील दोन्ही बाजूचे सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात)

श्री.जी.एल.ऐनापुरे : सभापती महोदय, या सदनाच्या सदस्यांबद्दल असे बोलणे योग्य नाही.

श्री.दिवाकर रावते : मॅनेज होणारी माणसे सभागृहात नको आहेत.

श्री.जी.एल.ऐनापुरे : मी सभागृहातील सदस्यांबद्दल बोललेलो नाही. परंतु कोणाच्या भावना दुखावल्या असतील तर मी केलेले स्टेटमेंट मागे घेत आहे. सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, ज्यांनी असंख्य चुका केलेल्या आहेत.

यानंतर श्री.सुंबरे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, ज्याप्रमाणे राज्य पाठ्यपुस्तक मंडळाकडून पाठ्य पुस्तकांमध्ये चुका होतात आणि त्या दुरूस्त केल्या जाऊन, पुन्हा पुन्हा चुका होतात तसाच प्रकार सन्माननीय सदस्य श्री.ऐनापुरे यांचेकडून होत आहे. ते स्वत: बोलताना चूक करीत आहेत आणि ती दुरूस्त करून पुढे बोलताना पुन्हा चूक करीत आहेत व याप्रमाणे ते आपले भाषण करीत आहेत.

श्री. जी.एल.अैनापुरे : सभापती महोदय, मला दुसरा इलाजच नाही. त्यामुळे मला तसे वागावे लागते आहे. असो. मी माझा मुद्दा येथे मांडू इच्छितो, तो मांडत असताना मी कोणतेही वादग्रस्त स्टेटमेंट करणार नाही. सभापती महोदय, एवढ्या चुका करणारे हे मंडळ आहे, त्यात अनेकदा चुका करणारी मंडळी आहेत आणि तीच ती माणसे, त्याच त्या चुका होत आहेत. आता पुन्हा त्याबाबत चौकशी केल्यानंतर त्या चौकशीचे रिझल्टस् येणार. त्यात किती लोकांना शिक्षा होईल, ती काय होईल हा नंतरचा प्रश्न आहे. परंतु आता आपण या संबंधात अशा प्रकारची कारवाई केली पाहिजे की, त्यातून महाराष्ट्रभर संदेश गेला पाहिजे की, एवढ्या चुका केल्यानंतर लगेचच, तातडीने त्याबाबत शिक्षा संबंधितांना होते. आपल्याला हा संदेश राज्यभर पाठवावयाचा आहे की नाही ? म्हणून माझी या निमित्ताने माननीय शालेय शिक्षण मंत्र्यांना विनंती आहे की, यामध्ये जी प्रमुख मंडळी आहेत, त्यात खिळे जोडणारे किंवा अभ्यासक्रम निवडणारे आहेत की नाही हे पाहण्याचे आपले काम नाही. परंतु शिक्षण मंत्र्यांनी ज्यांना तज्ज्ञ म्हणून नमेलेले आहे. जे त्यांच्या विषयातील तज्ज्ञ आहेत, अध्यक्ष आहेत, अशी जी जी मंडळी आहेत, ती दोषी असतील तर त्या साऱ्यांना आजच्या आज निलंबित केले तरच ही चौकशी व्यवस्थित होऊ शकेल. म्हणूनच या संबंधात कोणतीही मुदत न देता, आजच्या आज त्या संबंधितांना निलंबित करून चौकशी करावी अशी मी मागणी करीत आहे.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, आमदारों की एक समिति बनाई जा रही है, लेकिन यह प्रश्न इतना मर्यादित नहीं है. 10 वीं कक्षा की किताब के अन्दर तो गलतियां निकली हैं. लेकिन शक्यता है कि दूसरी क्लास की किताबों के अन्दर भी गलतियां हों और दूसरे माध्यम जैसे उर्दू, हिन्दी, अंग्रेजी की किताबों के अन्दर भी गलतियां हो सकती हैं. इसलिए इस समिति के अधिकार क्षेत्र में सभी भाषाओं की सभी किताबों की स्क्रूटिनी करने की बात होनी चाहिए, इतना ही सुझाव मैं देना चाहती हूँ.

...... 3सी 2 ..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, मी प्रथमत: आपले आणि माननीय विरोधी पक्षनेता श्री.फुंडकर यांचे आभार मानतो. कारण भावनेच्या मुद्यावर एखादा निर्णय घेण्यापेक्षा त्यावर गंभीरपणे नीट विचार झाला पाहिजे. सभापती महोदय, 20 लाख मुले 10 वीच्या परीक्षेला आणि 15 लाख मुले 12 वी च्या परीक्षेला बसतात. इतक्या मुलांच्या बाबतीत निर्णय घेणारे एक मंडळ आहे आणि त्या मंडळाची 8 विभागीय मंडळे आहेत. यात सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा असा आहे की, लक्षवेधी सुचनेवरील चर्चेमध्ये प्रश्नोत्तरासाठी जो अवधी असतो त्यामध्ये या विषयाला गंभीरतेने स्पर्शदेखील करता येत नाही. आता या चुका वारंवार होतात. मघाशी सन्माननीय सदस्य श्री.आव्हाड यांनी देखील जो विषय येथे उपस्थित केला होता आणि काल आम्ही नियम 289 खाली जो प्रस्ताव दिला होता त्यामध्ये अन्य केंद्रीय बोर्ड जी आहेत, मग ती आयसीएसइ आणि सीबीएसइ असेल त्यांच्या तुलनेत आपल्या एसएससी बोर्डाची अधोगती आणि अवनती सुरू आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील जी सर्वसामान्य मुले आहेत त्यांचे भवितव्य अंध:कारमय करण्याचेच काम केले जाते आहे. त्यामुळे पाठ्यपुस्तकांमध्ये झालेल्या या अक्षम्य चुकांसंबंधात दोषी धरताना कोणी डीटीपी केले, कोणी प्रिंटींग केले या सारख्या छोट्या मुद्द्यांकडे अधिक लक्ष न देता जी मंडळी यासाठी यासाठी आपण नेमली आहेत, जी तज्ज्ञ म्हणून आपण नेमलेली आहेत. त्यात यासाठी आराखडा तयार करणारी यंत्रणाच नाही. या मंडळाची पुणे येथे 6 कोटीची इमारत तयार आहे पण महापालिकेने एनओसी दिली नाही त्यामुळे ती अद्याप प्रत्यक्षात वापरात नाही. ....

( यानंतर श्री. सरफरे .... 3डी 1 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील.

एकंदरीत बोर्डाच्या कामकाजाकडे आपला पहाण्याचा जो दृष्टीकोन आहे त्याबाबत मी याठिकाणी उल्लेख करीत आहे. बोर्डाची यंत्रणा राबविण्यासाठी इमारत उभी केली आहे परंतु आज ती बंद आहे. आपण या बोर्डाकडे अभ्यासक्रम आखण्याची जी जबाबदारी टाकली आहे ती कशाप्रकारे पार पाडीत आहेत? श्री. कपिल पाटील यांनी पत्र दिले तर श्री. अैनापूरे यांची कविता धडयामध्ये घातली जाते. कारण त्यांचे वजन असल्यामुळे कविता धडयामध्ये येते. श्री. अरविंद सावंत यांनी दिलेला धडा पुस्तकामध्ये येतो. अशापध्दतीने जर आपण अभ्यासक्रम आखणार असाल तर महाराष्ट्रातील मुलांचे वाटोळे झाल्याशिवाय रहाणार नाही. याठिकाणी 800 चुका झाल्यामुळे ही बाब आपल्यासमोर आली. यामध्ये आर्थिक भ्रष्टाचार आहे. त्याबाबत माननीय सदस्य श्री. अैनापूरे वेगळया पध्दतीने सांगणार होते. त्यांना माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या प्रस्तावाला पाठिंबा द्यावयाचा होता. गोष्टींची पुस्तके वाटण्यामध्ये 300 कोटींची गडबड झालेली आहे, सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमामध्ये गोंधळ झालेला आहे. हे सर्व प्रकार पाहिले तर आपले डोळे पांढरे होतील. याठिकाणी प्रश्न पैश्याचा नाही तर आपण त्यांच्या हातामध्ये अभ्यासक्रम आखण्याचे आणि आराखडा तयार करण्याचे काम दिले आहे, ती यंत्रणा आज अस्तित्वात नाही. त्याबाबत शासनाने योग्य भूमिका घेणे आवश्यक आहे. मघाशी म्हटल्याप्रमाणे या देशामध्ये प्राथमिक शिक्षण हे सक्तीचे व मोफत देण्याची घटनेने आपल्यावर जबाबदारी सोपविली आहे. यामध्ये एन.सी.ई.आर.टी. राज्यामध्ये काम करते. या दोन्ही परिषदा आराखडा तयार करण्याचे व अभ्यासक्रम तयार करण्याचे काम करतात. त्या आराखडयावर आधारीत त्या त्या मंडळांनी त्यांची पाठ्यपुस्तके तयार करावयाची असतात, त्याप्रमाणे त्यांनी अभ्यासक्रम आखण्याचे काम करावयाचे असते. आज पहिली ते आठवीपर्यंत प्राथमिक शिक्षण दिले जाते, नववी ते दहावीपर्यंत माध्यमिक शिक्षण दिले जाते आणि अकरावी ते बारावीपर्यंत उच्च माध्यमिक शिक्षण दिले जाते. पुढील चार वर्षे ही विद्यार्थ्यांचे भविष्य घडविणारी वर्षे आहेत. यामध्ये सी.बी.एस.ई.मंडळाकडून अभ्यासक्रम ठरविण्यामध्ये विशेष लक्ष घातले जाते. तशाप्रकारची यंत्रणा आपल्याकडे नाही. तशापध्दतीचे संशोधन मंडळ आपल्याकडे नाही, शिक्षकांना योग्य पध्दतीने प्रशिक्षण दिले जात नाही. जे प्रशिक्षण दिले जाते ते बोगस पध्दतीने दिले जाते. या दोन्ही गोष्टी आपल्याकडे नसल्यामुळे शिक्षणाचे पुढे काय होणार आहे? या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. कपिल पाटील....

दृष्टीने या गंभीर विषयावर चर्चा झाली पाहिजे. ती चर्चा जर आपण करणार नसू तर संपूर्ण महाराष्ट्र खड्डयामध्ये गेल्याशिवाय रहाणार नाही. म्हणून माझी अशी मागणी आहे की, माननीय सदस्यांनी मांडलेले मुद्दे हे केवळ मराठी भाषेपुरते मर्यादित नाही तर सर्व भाषांकरिता असून त्यासंबंधी आपण निर्णय घेतला पाहिजे. आणि त्यासंबंधी ठोस निर्णय घेण्यासाठी माननीय विरोधी पक्षनेत्यांचा प्रस्ताव अधिक संयुक्तिक असून त्यावर आपण चर्चा करणार आहोत की नाही?

श्री. श्रीकांत जोशी : सभापती महोदय, याठिकाणी प्रस्तावाला अनुमोदन देतांना मी सूचना करु इच्छितो. मराठवाडयामधील पाठयपुस्तकांच्या छपाईचे काम श्री. सुहास कुलकर्णी आणि श्री. प्रमोद शिंदे हे सातत्याने करीत होते. परंतु गेल्या चार वर्षापासून त्यांनी छपाईचे काम थांबविले आहे. याबाबत माझी माननीय शिक्षण मंत्र्यांना विनंती आहे की, या दोघांना आपण चर्चेला बोलाविले पाहिजे. पाठयपुस्तक निर्मिती मंडळामध्ये पुस्तकांच्या छपाईपासून ते गोडावून किपरपर्यंत सुरु असलेल्या गोंधळामुळे त्यांनी नाईलाजास्तव छपाईचे काम थांबविले आहे. या पाठ्यपुस्तक मंडळामध्ये पूर्वी त्यांचे वडील काम करीत होते म्हणून त्यांनीही काम करण्याची इच्छा व्यक्त केली. परंतु मंडळाच्या भ्रष्ट कामकाजामुळे ते मंडळामध्ये जाऊ शकत नाहीत. पदवीधर आमदार म्हणून त्यांनी मला बोलावून सांगितले की, पुढील पिढीचे वाटोळे आपल्याला होऊ द्यावयाचे नसेल तर आपण हा विषय सभागृहामध्ये मांडा...

**उपसभापती** : या विषयासंबंधी अनेक माननीय सदस्यांनी आपले मुद्दे मांडले आहेत. त्यानंतर आपण आता ज्या दोन व्यक्तींच्या नावाचा उल्लेख करीत आहात त्या दोन ठेकेदारांची ठेकेदारी करीत आहात काय?

(यानंतर श्री. किल्लेदार)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.श्रीकांत जोशी : मी त्यांची ठेकेदारी करत नाही ते त्यातील एक्स्पर्ट म्हणून त्यांच्याशी चर्चा करून निर्णय घ्यावा, असे माझे म्हणणे आहे. मेरीट, डि-मेरीट याविषयी चर्चा करण्यास वेळ नाही. या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

**उपसभापती** : ते अगोदरही काम करत होते.

श्री.श्रीकांत जोशी : मेरिट,डि-मेरिट याबाबत चर्चा करण्यास वेळ नाही. धड्यामध्ये चुका आहेत. या विषयाच्या संबंधात मेरिट, डि-मेरीटच्या संबंधाने चर्चा करण्यास वेळ नाही. म्हणून मी या प्रस्तावाला पाठिंबा देत आहे. परंतु त्यातील जे एक्स्पर्ट आहेत त्यांच्याशी सुध्दा मंत्री महोदयांनी स्वत: चर्चा करून कोठे काय चुकलेले आहे हे समजून घ्यावे.

प्रा.वसंत पुरके : सन्माननीय सभापती महोदय मराठीच्या पुस्तकामध्ये झालेल्या असंख्य चुकाबाबत सभागृहाच्या भावना अतिशय महत्वाच्या आहेत, त्या दखलपात्र आहेत. मी सभागृहाला नम्र विनंती करेन की, पुस्तकामध्ये ज्या शेकडो चुका झालेल्या आहेत, ती अतिशय निंदनीय बाब आहे. कोणालाही समर्थन करता येणार नाही अशा प्रकारच्या या बाबी आहेत. केवळ मराठीसारखा विषय तुम्हा आम्हाला परिचयाचा आहे म्हणून या चुका लक्षात आल्या. परंतु सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी उल्लेख केल्याप्रमाणे जे विषय आम्हाला समजत नाहीत, मग त्यामध्ये फिजिक्स, केमेस्ट्री, बायोलॉजी हे विषय पाहिले तर त्यामधील कोणत्याही विषयामध्ये चुका असता कामा नयेत. नवीन पिढीशी खेळ करू नये, अशी आमची भूमिका आहे. यामध्ये कोणालाही पाठिशी घालण्याचा प्रयत्न नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जी सूचना केली त्या संबंधात समिती गठीत करावी. यामध्ये सदस्य किती घ्यावेत, हे सांगावे. या विषयाच्या संबंधात दोन-दोन, तीन-तीन तास चर्चा करण्यापेक्षा या समितीने योग्य ती भूमिका घ्यावी.

श्री.पांडुरंग फुंडकर : एकाच बैठकीमध्ये निर्णय घ्यावा.

प्रा.वसंत पुरके : त्याबाबत आपण ठरवावे. माझी विनंती आहे की, नेते आणि गट नेते एकत्र बसून समिती गठीत करावी. त्यामध्ये सदस्यांची नावे द्यावीत. समिती जो काही निर्णय घेईल तो आम्हाला शिरसावंद्य राहील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.व्ही.यू.डायगव्हाणे : पूर्वीची समिती आहे, ती काय करील ? आता पुन्हा आपण नवीन समिती गठीत करत आहोत. या समित्या वेगवेगळ्या कराव्या लागतील.

प्रा.वसंत पुरके : विधी व न्याय विभागाच्या माजी सचिव श्रीमती प्रतिमा उमरजी यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमलेली आहे. त्यामध्ये इतर चारपाच सदस्य आहेत. माजी सचिवांच्या संदर्भात कोणाची हरकत नाही. आता प्रश्न आहे की, चार सदस्य नेमावयाचे आहेत, सभागृहाने सन्माननीय सदस्यांची नावे द्यावीत, ती स्वीकारली जातील.

श्री.दिवाकर रावते : शिवाजी महाराजांचा धडा का गाळला हाही मुद्दा आहे.

प्रा.वसंत पुरके : पुनर्मुद्रण का करावे लागले, कोण जबाबदार आहे, धडा का वगळावा लागला, या संदर्भात समितीने मार्गदर्शन करावे.

श्री.गुरूनाथ कुलकर्णी : सभापती महोदय, मी सन्माननीय शिक्षण मंत्री महोदयांकडे एक टिपण पाठविलेले आहे ते त्यांच्याकडे पोहोचले असेल. त्या संबंधात मंत्री महोदयांनी योग्य तो निर्णय घ्यावा.

सभापती महोदय, माझी विनंती आहे की, आता आपल्यासमोर दोन लक्षवेधी सूचना चर्चेला आहेत. आमच्या पक्षातील सर्व सन्माननीय सदस्यांना संध्याकाळी 6-00 वाजता एका महत्वाच्या बैठकीला उपस्थित रहावयाचे आहे, त्या बैठकीला आपल्यालाही उपस्थित रहावयाचे आहे. आता पुढच्या लक्षवेधी सूचना घेणे शक्य असेल तर पाच-पाच मिनिटांमध्ये त्या चर्चेला घ्याव्यात. नाही तर पुढील कामकाज उद्या सकाळी घ्यावे.

श्री.दिवाकर रावते : आजच्या उर्वरित लक्षवेधी सूचना तसेच विधानमंडळ सदस्यांच्या निवृत्ती वेतनासंबंधीचे विधेयक एवढे कामकाज आज 6-00 वाजेपर्यन्त करावे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SKK/ MAP/ KGS/

**पृ. शी.** : राज्यात विशेषत: जळगाव,पश्चिम महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतापासून वीज निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी शासनाकडे आलेले प्रस्ताव.

**मु. शी.** : राज्यात विशेषत: जळगाव,पश्चिम महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतापासून वीज निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी शासनाकडे आलेले प्रस्ताव, यासंबंधी सर्वश्री जितेंद्र आव्हाड, लक्ष्मण जगताप, राजेंद्र जैन, सदाशिराव पोळ, वसंत चव्हाण, जगन्नाथ शेवाळे, भास्कर जाधव, वसंत पवार, श्रीमती फौजिया खान, श्रीमती मंदा म्हात्रे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.जितेंद्र आव्हाड (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय अपारंपारिक ऊर्जा मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात विशेषत: जळगाव, पश्चिम महाराष्ट्रातील विविध भागांमध्ये अपारंपारिक ऊर्जा स्त्रोतांपासून वीज निर्मिती प्रकल्प उभारण्यासाठी शासनाकडे आलेले प्रस्ताव, पवनचक्की, बायोमास, ब-गॅस, शहरी व औद्योगिक कचरा यांपासून सुमारे ७००० मेगावॅट वीजेची निर्मितीची असलेली क्षमता, अपारंपारिक ऊर्जा क्षेत्रातील विजेचा सुमारे ०.७ टक्के असलेला वाटा दहा टक्के असण्याची आवश्यकता, याप्रकरणी गांभीर्याने दखल घेतल्यास राज्यात जाणवत असलेली वीजटंचाई दूर होणार असतांनाही कार्यवाही करण्यास होत असलेली दिरंगाई, टाळाटाळ, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी राज्यात वीजेची समस्या उग्र स्वरुप धारण करीत असणे, त्यामुळे राज्यभर होत असलेली तीव्र आंदोलने, यावर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी अपारंपारिक ऊर्जा स्तोत्रांपासून जास्तीत जास्त वीज निर्मिती करुन राज्यातील वीजेची टंचाई दूर केली जावी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही, उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.विनय कोरे (अपारंपारिक ऊर्जा मंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

यानंतर श्री.बरवड.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. जितेंद्र आव्हाड : सभापती महोदय, आताच आपण शिक्षण क्षेत्रातील चुकांबद्दल या ठिकाणी गांभीर्याने चर्चा केली. आता अवधी कमी आहे. ऊर्जा विभागाचा हा विषय आहे. ऊर्जा क्षेत्रामध्ये नव्याने काही प्रयोग करावयाचे असे जर आपण ठरविले तर जसे शिक्षण मंडळाचे झाले तसेच मेडाचे होईल. मेडामध्ये काही अधिकारी 20-20 वर्षे ठिय्या मांडून बसलेले आहेत. त्या ठिकाणी विचारणारे कोणी नाही. काम करणारे कोणी नाही. मंत्र्यांना घाबरायचे नाही, असे प्रयोग मेडामध्ये वर्षानुवर्षे चालू आहेत आणि आजही तोच प्रकार चालू आहे. मागच्या 20 वर्षापासून सचिव वगळता तेथील एकही अधिकारी हललेला नाही. ते तिथेच बसून आहेत. श्री. अण्णा हजारेंचा जो कायदा सर्वांना लागू केला तो कायदा मेडाला लागू नाही काय ? मेडासाठी वेगळी नियमावली करणार काय ? अपारंपारिक ऊर्जेच्या बाबतीत जळगाव आणि पश्चिम किनारपट्टीवर संशोधकांनी आपापले प्रोजेक्ट सादर केलेले आहेत. या ठिकाणी माननीय मंत्रिमहोदयांनी महत्वपूर्ण घोषणा केली होती की, या जगाचा नकाशा बदलणारे, जगाला आकर्षित करणारे भूगर्भातील उष्णतेपासून वीज निर्मिती करण्याचे 2 प्रकल्प महाराष्ट्रात होणार असतील एक महिन्याच्या आत परवानगी देऊ. तो शब्द ते पाळू शकले नाहीत. मला कल्पना आहे की, मेडाच्या आडमुठ्या धोरणामुळे हे करु शकले नाहीत. मेडामध्ये जे अधिकारी 20-20 वर्षे आहेत त्यांची बदली होणार काय ? या सार्वभौम सभागृहात जळगाव आणि पश्चिम किनारपट्टीत अपारंपारिक ऊर्जेच्या संदर्भात जमिनीखालील उष्णतेपासून ऊर्जा निर्मिती करण्याच्या बाबतीत एक महिन्यात परवानगी देण्याचा जो शब्द आपण दिलेला होता तो पाळणार काय ? जर पाळणार असाल तर त्यांना किती दिवसात परवानगी देणार ?

श्री. विनय कोरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जितेंद्र आव्हाड यांनी महत्वाचे दोन प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेले आहेत. श्री. अण्णा हजारेंचा कायदा आणि मेडामध्ये असणाऱ्या अधिकाऱ्यांच्या बदल्या या अनुषंगाने त्यांनी या ठिकाणी काही भावना व्यक्त केलेल्या आहेत. मी या सभागृहामध्ये एवढेच सांगू इच्छितो की, अपारंपारिक ऊर्जा हे नवीन क्षेत्र संपूर्ण जगासमोर आज महत्वाची भूमिका घेऊन काम करीत आहे आणि प्रत्येक विभागाला अनुसरुन संशोधन करणे आणि त्या संशोधनाचे प्रत्यक्ष उत्पादनात रुपांतर करण्यासाठी काही नियोजन करणे

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KGS/ MAP

श्री. विनय कोरे .....

यासाठी रुपरेषा ठरविणे, तशा प्रकारचे कायदे निर्माण करणे, हे सगळेच नवीन काम या नव्या क्षेत्रासमोर आहे. आतापर्यंत महाऊर्जा जे काम करीत होती ते एका ठराविक मर्यादेत करीत होती. फार मोठे स्टाफिंग पॅटर्न आणि फार मोठ्या कामाची जबाबदारी महाऊर्जेकडे सरकारच्यावतीने सोपविली गेली नव्हती. त्यामुळे बदली करता येण्याइतपत स्टाफ त्या ठिकाणी नव्हता. त्यामुळे 20-20 वर्षे बदल्या झालेल्या नाहीत ही वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांनी श्री. अण्णा हजारे यांच्या कायद्याचा उल्लेख केला. परंतु तितक्या जागा त्या ठिकाणी नसल्यामुळे तो कायदा त्या ठिकाणी लागू करण्यात आलेला नाही. महाराष्ट्रात हे नवीन खाते निर्माण झाल्यानंतर आता त्या खात्याची व्याप्ती वाढवित असताना, नव्याने जागा वाढवित असताना उद्याच्या काळात निश्चितपणे अशा प्रकारचा कायदा आपल्याला त्या ठिकाणी लागू करता येईल. सन्माननीय सदस्यांनी एक गोष्ट मनापासून या ठिकाणी विचारली. जळगाव जिल्हा आणि कोकण किनारपट्टीत भूगर्भातील उष्णतेपासून वीज निर्मिती करण्याच्या प्रकल्पाबाबत एक महिन्यात निर्णय घेऊ अशा प्रकारची भूमिका या सभागृहामध्ये घेतली होती. परंतु त्या भूमिकेला अनुसरुन खऱ्या अर्थाने या कामाची सुरुवात करणे आजपर्यंत शक्य झालेले नाही ही वस्तुस्थिती आहे. परंतु याबाबत मुदतवाढ मिळावी यासाठी आमच्या विभागाकडून एक पत्र माननीय सभापतींना दिलेले आहे. याचे एक प्रमुख कारण असे आहे की, भूगर्भाखालील जे जे पदार्थ आहेत मग पेट्रोल असेल, कोळसा असेल, विविध प्रकारची खनिजे असतील त्यांच्या वापरावर केंद्र शासनाचा अधिकार आहे की, राज्य शासनाचा अधिकार आहे याबाबतीत निश्चित असे धोरण कोठेही ठरलेले नाही. परंतु अशा प्रकारचा प्रकल्प करीत असताना तो प्रकल्प डेव्हलप करावयाचा असेल तर महाराष्ट्र सरकार परवानगी देऊ शकते काय अशी विचारणा महाराष्ट्र सरकारच्या वतीने केंद्र सरकारकडे करण्यात आलेली आहे. त्यांचे उत्तर येणे अपेक्षित आहे आणि म्हणून हे आश्वासन पूर्ण करता आलेले नाही. परंतु असे प्रकल्प द्यावयाचे झाले तर ते कशा पध्दतीने देता येतील,

यानंतर श्री. शिगम...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ KGS/ MAP/ पूर्वी श्री. बरवड 17:35

(श्री. विनय कोरे .....)

चिली, पेरु, इटली, ऑस्ट्रेलिया या विकसित देशामध्ये असे प्रकल्प कशा पध्दतीने दिले गेले आहेत याचा सविस्तर अभ्यास या विभागामार्फत करण्यात आलेला आहे. सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन आणि लक्षवेधीसाठी कमी वेळ असल्यामुळे मी एवढेच सांगू इच्छितो की, या सर्व नियोजनाचा आराखडा कसा राहील, याबाबतीत राज्य सरकारला अधिकार आहेत की केन्द्राला अधिकार आहेत, या प्रकल्पाचे स्वरुप कसे असावे या संबंधातील माहिती घेण्यासाठी थोडा अवधी लागेल. त्यामुळे महाराष्ट्रातील हे पोटॅन्शियल आणखी किती काळ अंधारात पडून राहाणार आहे हा देखील प्रश्न आहे. परंतु हे पोटॅन्शियल अधांरात पडून राहू नये म्हणून उद्या नियम होऊन हा विषय केन्द्राकडे गेला तर त्या अटीवर हे अधिवेशन संपण्याच्या आत अशा प्रकारच्या सर्व्हे करण्याच्या कामांना मंजुरी देण्याची भूमिका हा विभाग घेईल.

मेजर सुधीर सावंत : अपारंपरिक ऊर्जामध्ये फक्त विद्युत प्रकल्प येतात की ऊसा पासून इथेनॉल बनविण्याचे प्रकल्पही येतात ? 11व्या पंचवार्षिक योजनेमध्ये आपण अपारंपरिक ऊर्जेद्वारे जवळ जवळ साडेचार हजार मेगावॉट इतकी वीज निर्माण करण्याचे उद्दिष्ट ठेवले होते. या बाबतीत खाजगी गुंतवणूक करण्याची योजना आहे काय ? कम्युनिटीजमध्ये, शेतक-यांकडून लोकॅलिटीमध्ये ही अपारंपरिक ऊर्जा निर्माण होण्याची आवश्यकता आहे. या प्रकारच्या ऊर्जा निर्मिती पासून कार्बन क्रेडिट किती प्रमाणात मिळते? त्याबाबतीत सबसिडी देण्याचे नियोजन सरकारने केले आहे काय ?

श्री. विनय कोरे : सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी इथेनॉलचा प्रश्न उपस्थित केला. इथेनॉल निर्माण करणे हा विषय अपारंपरिक ऊर्जा विभागाकडे आलेला नाही. स्टेट एक्साईज विभागामार्फत यासाठी लायसन्स दिले जाते आणि त्या विभागाकडून इथेनॉल निर्मितीवर नियंत्रण ठेवले जाते. परंतु बायो-डिझेल निर्माण करणे हा विषय अपारंपरिक ऊर्जा विभागाकडे असल्यामुळे भविष्यात इथेलॉन निर्मितीचा विषय देखील या विभागाकडे घ्यावा किंवा कसे याबाबत राज्य सरकार गांभीर्याने विचार करीत आहे. अपारंपरिक ऊर्जा निर्मितीच्या क्षेत्रामध्ये प्रगती व्हावी म्हणून ऊर्जांकुर नावाची संकल्पना निर्माण केलेली आहे. सन्माननीय सदस्यांनी कार्बन क्रेडिटचा उल्लेख केला. पर्यावरणाच्या दृष्टीने प्रगत देशांनी किटो नावाचा करार केला. त्याप्रमाणे 2012 सालापर्यन्त



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(श्री.विनय कोरे...)

त्यांनी काही कार्बनडाय ऑक्साईडचे रिडक्शन करण्याची खात्री जगाला दिलेली आहे. म्हणून कार्बनडाय ऑक्साईडचे रिडक्शन करणा-या अशा प्रकारच्या अपारंपारिक ऊर्जा प्रकल्पांना आंतरराष्ट्रीय बाजारातून अशा प्रकारचा फायनान्स उपलब्ध होतोय ही वस्तुस्थिती खरी आहे. महाराष्ट्र राज्यात अशा प्रकारच्या प्रकल्पांना मदत करणारे, त्यांना मार्गदर्शन करणारे केन्द्र म्हणून महाऊर्जाने काम करावे असा महाराष्ट्राच्या कॅबिनेटने निर्णय केलेला आहे.साधारण 1 टन कार्बनडाय ऑक्साईड एखाद्या प्रकल्पातून जर आपण कमी करु शकलो तर आजच्या बाजार भावाप्रमाणे 8 ते 9 युरो इतका दर त्याला दरवर्षी एक टन कार्बनडाय ऑक्साईडसाठी म्हणून त्या ठिकाणी उपलब्ध होतोय.

श्री. परशुराम उपरकर : कोकणामध्ये पवनचक्कीद्वारे ऊर्जा निर्मिती करण्याचा प्रकल्प उभारण्यात आलेला होता. तेथील पवनचक्की बंद पडलेली आहे. याबाबतीत काय उपाययोजना करता येईल हे तपासून पाहिले जाईल असे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले होते. अद्यापपर्यन्त काहीच कारवाई झालेली नाही.तेव्हा या बाबतीत निश्चितपणे केव्हा कारवाई होणार आहे ?

...नंतर कु. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

JPK/ MAP/ KGS/ प्रथम श्री.शिगम एम. ........

17:40

श्री.विनय कोरे : सभागृहात झालेल्या चर्चेप्रमाणे ही पवनचक्की योजना डेन्मार्क सरकारच्या सहकार्याने आपल्याला मिळाली होती. एम.एस.ई.बी.आणि महाऊर्जा यांच्या समन्वयातून खरे तर त्या ठिकाणी त्या क्षमतेची पवनचक्की आणलेली होती पण ती चालविणे किफायतशीर आढळून न आल्याने ती बंद पडण्याच्या मार्गावर असतांना देखील अशा ठिकाणी निर्माण होणारी ती पहिली पवनचक्की असल्यामळे व इतर पवनचक्क्या आणखी निर्माण होण्याच्या दृष्टीकोनातून प्रोत्साहन मिळण्यासाठी एम.एस.ई.बी. आणि महाऊर्जाकडे तिचे कामकाज हस्तांतरित करण्याकरिता हा विभाग प्रयत्नशील आहे.

**उपसभापती** : सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव आणि सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे आपणा दोघांपैकी कोणी आधी बोलावयाचे ते आपण आपआपसातच ठरवून बोलण्याकरिता सुरुवात करावी.

श्री.विक्रम काळे : महाराष्ट्र राज्यामध्ये मोठया प्रमाणात विजेची निर्मिती करण्यासाठी आपल्या खात्याने सहकारी साखर कारखान्यांच्या माध्यमातून विजेची निर्मिती करण्याचे ठरविले व त्यानुसार ते विजेची निर्मिती करतात परंतु बाकीच्या कारखान्यांसाठी देखील वीज निर्मितीसाठी विशेष अशी काही योजना आली आहे का ?

श्री.विनय कोरे : अध्यक्ष महोदय, साखर कारखान्याच्या बगॅसपासून ऊर्जानिर्मिती करणे आणि महाराष्ट्रातील कमर्शियली व्हायबल असलेल्या प्रकल्पांना इक्विटी निर्माण करुन देण्यासाठी महाराष्ट्र सरकारने पहिल्यांदा ऊर्जांकुर नावाची संस्था अस्तित्वात आणलेली आहे. त्यासाठी 418 कोटी रुपयांचा निधी देखील उपलब्ध करु दिलेला आहे. याकरिता उपलब्ध 418 कोटी रुपयांच्या निधीव्यतिरिक्त जवळ जवळ 2800 कोटी रुपयांचा अधिक निधी खर्च करुन आपण 1,000 मेगावॅटचा प्रकल्प एका वर्षात निर्माण करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी विचारल्याप्रमाणे अशा प्रकारचे वीज निर्मिती करणारे प्रकल्प उभारण्याकरिता महाराष्ट्रातील सगळया साखर कारखान्यांना आवाहन केलेले आहे. त्यानुसार जवळजवळ 20 कारखान्यांपैकी 10 कारखान्यांनी ऊर्जांकुर या संस्थेसोबत केलेला करार अंतिम टप्प्यात आलेला आहे. ऑगस्ट- सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवडयामध्ये या 10 कारखान्याच्या 250 ते 275 मेगावॅट वीज प्रकल्पाच्या कामास सुरुवात होणार आहे.

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

17:40

श्री.विक्रम काळे: यामध्ये वारणा प्रकल्प आहे का ?

श्री.विनय कोरे : होय, यामध्ये वारणा प्रकल्पाचा देखील समावेश आहे.

श्री.भास्कर जाधव : या ठिकाणी वेरावळ ते त्रिवेंद्रम आणि कोकणात पश्चिम किनारपट्टीमध्ये समुद्राच्या लाटांपासून वीज निर्मिती केली जाते. अशा प्रकारचे एकूण 150 स्पॉट्स शासनाने सर्व्हे करुन शोधून काढलेले आहेत. या 150 स्पॉटमधील एकूण 15 स्पॉट्स कोकणामधील आहेत. गुहागर तालुक्यामध्ये भूदल गोरा या गावांमध्ये असलेल्या लाटांपासून ऊर्जा निर्माण करण्याच्या प्रकल्पाचे उद्‌घाटन करण्याचे या ठिकाणी घोषित केले होते. माझ्या माहितीप्रमाणे पवनचक्कीपासून पवनऊर्जा निर्माण करण्यासाठी कोकणामध्ये डोंगरी भागासारखी अनुकूल भौगोलिक परिस्थिती आहे आणि कोकणामध्ये समुद्राच्या लाटांपासून देखील वीजनिर्मिती करण्याचे प्रकल्प सुरु करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. कोकणामध्ये काही ठिकाणी एवढी हवा चालू असते आणि ती इतक्या मोठया प्रमाणात असते की त्यापासून कोकणामध्ये देखील पवनचक्कीच्या माध्यमातून पवनऊर्जा निर्माण करण्याचे प्रकल्प उभारले जाऊ शकतात, यादृष्टीने शासन काही प्रयत्न करणार आहे का ?

श्री.विनय कोरे : बुधल या गावी लाटांपासून वीज निर्मिती करण्यासाठी एक प्रकल्प महाऊर्जेच्या वतीने हाती घेण्यात आला आहे. खरे तर 1 मे म्हणजेच महाराष्ट्र दिनी या प्रकल्पाचे उद्‌घाटन करावयाचे होते आणि त्या दृष्टीकोनातून त्या प्रकल्पाच्या कामाची सुरुवातही झाली होती. सन्माननीय सदस्य श्री.भास्कर जाधव यांना माहित आहे की, त्या ठिकाणी सदर प्रकल्प सुरु करण्याकरिता स्थानिक शेतक-यांनी अडथळे निर्माण केले आणि त्या प्रकल्पाचे काम वेळेत पूर्ण करता आले नाही. या ठिकाणी सदर प्रकल्पाचे काम सुरु असतांना फार मोठे वादळ आणि पाऊस आल्याने प्रकल्प सुरु करण्याकरिता जे थोडे फार काम करण्यात आले होते त्या कामाचे देखील नुकसान झाले, अशा प्रकारे त्या प्रकल्पाच्या उद्‌घाटनाचे काम पूर्णत्वास येत असतांनाही काही अडथळयांमुळे येऊ शकले नाही. येत्या 15 सप्टेंबरच्या दरम्यान या प्रकल्पाचे मोठया प्रमाणात उद्‌घाटन करावे, असे या विभागाच्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. पवन ऊर्जेच्या क्षेत्रात कोकणात आतापर्यंत काही ठिकाणी सर्व्हे झालेले आहेत. शासनाच्या सर्व्हेअंतर्गत या ठिकाणी 22 PLF च्या वर म्हणजे प्लँट लोड फॅक्टरच्यावर जागा स्पॉट झालेल्या नाहीत. कोकणामध्ये कोणाच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

माहितीमध्ये अजून जर कोणते वा-याचे स्पॉट किंवा विशेष वारा क्षेत्र असतील तर त्याची यादी सरकारकडे पाठवावी, म्हणजे त्या ठिकाणी आपल्याला विंड मास्ट बसविता येतील.

यानंतर श्री.कानडे.....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.** : नागपूर शहरातील मेयो व जीएमसी महाविद्यालयातील 22 अभ्यासक्रमांना वैद्यक परिषदेची मान्यता मिळण्याबाबत.

**मु. शी** . : नागपूर शहरातील मेयो व जीएमसी महाविद्यालयातील 22 अभ्यासक्रमांना वैद्यक परिषदेची मान्यता मिळण्यासंबंधी सर्वश्री सुरेश जेथलिया, डॉ.दीपक सावंत,डॉ. नीलम गो-हे, श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुरेश जेथलिया (विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

. नागपूर शहरातील इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय(मेयो किंवा आयजीएमसी) व शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील (जीएमसी) तब्बल 22 अभ्यासक्रमांना महाराष्ट्र वैद्यक परिषदेची (एमएमसी) अधिकृत मान्यता नसल्याचे नुकतेच माहे जुलै,2007 मध्ये निदर्शनास येणे, त्यामुळे या महाविद्यालयातून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना उच्च अभ्यासक्रमांसाठी अपात्र ठरविण्यात येत असणे, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले दुर्लक्ष, परिणामी विद्यार्थ्यांचे भविष्य अंधकारमय होणे, त्यांच्यात पसरलेले उदासिनतेचे वातावरण, नुकतीच शहरातील काही डॉक्टरांनी एम.डी.अभ्यासक्रम पूर्ण करण्याची अनुमती एमसीआयकडे मागितली असता त्यांना ती अनधिकृत अभ्यासक्रम असल्याने नाकारण्यात येणे, याकडे शासनाने तात्काळ लक्ष घालण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका.

श्री. सुरेश शेट्टी (वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री): सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**<u>निवेदन</u>**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे. )

-----

......2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**निवेदनानंतर**

श्री. सुरेश जेथलिया : सभापती महोदय, इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालयात 23 पैकी 20 अभ्यासक्रम आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात 25 पैकी 2 अभ्यासक्रम मान्यताप्राप्त नाहीत. पायाभूत सुविधांच्या कमतरतेमुळे या अभ्यासक्रमांना मान्यता मिळाली नाही असे नमूद करण्यात आले आहे. माझा प्रश्न असा आहे की, कोणत्या पायाभूत सुविधांची कमतरता आहे ? या सुविधांच्या पूर्ततेसाठी शासन स्तरावर कोणते प्रयत्न सुरु आहेत ? अमान्य अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना पुढील पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करणार आहे ?

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जे प्रश्न विचारलेले आहेत त्याचे उत्तर असे आहे की, आयजीएमसी मधे 23 कोर्सेस अॅव्हेलेबल आहेत त्यापैकी 3 कोर्सेस मान्यताप्राप्त आहेत. 14 कोर्सेसना मान्यता नाही. तसेच सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात पोस्ट ग्रॅज्युएशनचे एकूण 17 कोर्सेस आहेत त्यापैकी 15 मान्यताप्राप्त आहेत आणि 2 अमान्यता प्राप्त आहेत. सरकारी वैद्यकीय महाविद्यालयात ऑर्थोपेडिकची डिग्री आणि बायोकेमिस्ट्रीचे कोर्सेस आहेत त्यांना मान्यता नाही. ऑर्थोपेडिकसाठी 5 मे रोजी इन्स्पेक्शन झालेले होते. बायोकेमिस्ट्रीसाठी मान्यता मिळण्याबाबत लवकरच इनस्पेक्शन होणार आहे. दोन्ही कोर्सना मला वाटते की लवकरच मान्यता मिळेल. 14 डिग्री कोर्स आणि 6 डिप्लोमा कोर्स आहेत त्यांना आज नाही तर संस्था स्थापन झाल्यापासून मान्यता मिळालेली नाही. पायाभूत सुविधांची कमतरता असल्यामुळे आणि स्टाफची कमतरता असल्यामुळे मान्यता मिळाली नाही. स्टाफची नियुक्ती शासन लवकरच करणार आहे. पायाभूत सुविधांच्या बाबतीत आयजीएमसी हॉस्पीटल आहे त्याला व्हर्टीकल एक्सपान्शन आणि जेथे इंदिरा गांधी मेडिकल कॉलेजचे रिकंस्ट्रक्शन आणि अपग्रेडेशन पूर्णपणे करीत आहेत. प्रोसेस सुरु झालेली आहे उद्याच निविदा उघडणार आहोत. दोन महिन्याच्या आत प्रोसेस पूर्ण होईल आणि तीन वर्षाच्या आत संपूर्ण रुग्णालय नवीन बांधून घेणार आहोत. ते झाल्यानंतर जेवढे कोर्सेस आहेत त्यांना मान्यता प्राप्त होईल.

श्री. सागर मेघे : सभापती महोदय, पीजी कोर्सेसमध्ये सुप्रीम कोर्टाच्या निर्णयाप्रमाणे 50 टक्के कोटा ऑल इंडिया पातळीवर आहे. अमान्यताप्राप्त कोर्सेस आहेत त्यांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलची मान्यता मिळाल्यानंतर ते महाराष्ट्रात प्रॅक्टीस करु शकतात. ऑल इंडिया कोटयातून

......2





श्री. सागर मेघे ....

आलेला मुलगा महाराष्ट्राच्या बाहेरचा आहे तो महाराष्ट्रात कसा प्रॅक्टीस करु शकेल ? त्याला बाहेर जावे लागेल. दुसरीकडे आयजीएमसीसाठी निविदा बोलाविल्या आहेत. मागील तीन वर्षापासून हेच उत्तर आहे. आयजीएमसीच्या पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी अद्याप परवानगी मिळालेली नाही. 100 सीट होत्या त्या आता 60 वर आल्या आहेत. त्यामुळे शासनाने आता विदर्भावर आणि आयजीएमसीवर जास्त लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे. जीएमसीकडून जे पैसे आले ते मुंबईत आले. मुंबईच्या जे.जे.हॉस्पीटलला पैसे दिले त्याला आमचा विरोध नाही. पण मध्यंतरी शासनाने सांगितले होते की सरकारी वैद्यकीय महाविद्यालयासाठी इंडियन ऑईलकडून उपकरणासाठी पैसे आले त्याचा उपयोग झाला नाही. इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालयात पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी मान्यता नाही. यावर ताबडतोब उपाययोजना झाली पाहिजे. आराखडा तयार आहे असे आपण सांगितले. स्टाफ किती कमी आहे हे पाहिले पाहिजे. साधनसामुग्रीसाठी किती बजेट लागणार आहे आणि त्याची तरतूद आपण केली आहे काय ? अन्यथा स्टाफ येणार नाही आणि तेथील लोकांवर अन्याय होत राहील. तो शासन दूर करणार आहे काय ?

नंतर श्री.भोगले

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KGS/ MAP/ 17:50

लक्षवेधी सूचना क्र.5.........

श्री.सुरेश शेट्टी : सन्माननीय सदस्य श्री.सागर मेघे यांनी दोन-तीन महत्वाचे प्रश्न उपस्थित केले आहेत. सभापती महोदय, संपूर्ण देशातून आयजीएमसीमध्ये विद्यार्थी पी.जी.करण्यासाठी येतात. आपण पी.जी.डिग्रीसाठी जेव्हा प्रॉस्पेक्ट्स काढतो, त्या प्रॉस्पेक्ट्समध्ये नमूद करतो की, डिग्री नॉन रेकग्नाईज आहे. हे एम.सी.आय.ला कळवितो. सभापती महोदय, औरंगाबाद, आयजीएमसी यांचे स्टेटस आपण नमूद करतो. रेकग्नाईज आणि नॉन रेकग्नाईज लक्षात घेऊनच विद्यार्थी प्रवेश घेतात. नॉन रेकग्नाईज कोर्सला एम.सी.आय.ने मान्यता दिलेली नाही हे त्यांना माहित असतानाही ते प्रवेश घेतात. महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलच्या संदर्भात सांगत असताना महाराष्ट्र शासनाला सेक्शन 28 नुसार पूर्ण अधिकार आहे. लवकरच महाराष्ट्रातील या संस्थांमधून पी.जी.उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना शेड्युलमध्ये एनरोल करणार आहोत. जितके विद्यार्थी पी.जी.चे नॉन रेकग्नाईज कोर्स उत्तीर्ण होतात त्यांना महाराष्ट्रामध्ये एनरोल करण्यास मान्यता मिळेल.

श्रीमती फौजिया खान : सभापति महोदय, मैं एक महत्वपूर्ण प्रश्न पूछना चाहती हूँ. सार्वजनिक आरोग्य विभाग में ग्रामीण क्षेत्र में 40 प्रतिशत पोस्ट खाली हैं. वहां पर कोई डॉक्टर जाने के लिए तैयार नहीं होता है. इससे ग्रामीण क्षेत्र के गरीब लोगों को असुविधा हो रही है. एम.बी.बी.एस. करने के बाद जो पोस्ट ग्रेजुएशन करना चाहते हैं तो क्या आप उनकी पोस्टिंग ग्रामीण क्षेत्र में 2 साल के लिए कम्पलसरी करेंगे ? कुछ समय पहले ग्रामीण क्षेत्र के लिए 3 साल का कोर्स डिजाइन करने की संकल्पना हमारे सामने आई थी. उनकी नौकरी ग्रामीण क्षेत्र में ही रहेगी. ग्रामीण क्षेत्र में डॉक्टर उपलब्ध हो सकें, इसके लिए यह कोर्स डिजाइन करने के बारे में शासन क्या कर रहा है ?

श्री.सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती फौजिया खान यांनी जो प्रश्न विचारला आहे त्या प्रश्नाचा या लक्षवेधी सूचनेशी काही संबंध नाही. प्रि-पी.जी.मध्ये सर्व मेडिकल विद्यार्थ्यांना एक वर्षापूर्वीच रुरल पोस्टिंग सक्तीचे केले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी सांगितले की, 1994 पासून मेयो, आयजीएमसीमधील कोणतेही कोर्स रेकग्नाईज नाही. ही गोष्ट महाराष्ट्रासाठी भूषणावह आहे का? गेल्या 13 वर्षापासून आयजीएमसीमध्ये एकही कोर्स रेकग्नाईज नाही. ही वैद्यकीय शिक्षणाची शोकांतिका आहे. आजही स्टाफ नाही, इक्वीपमेंट नाहीत, बेसिक इन्फ्रास्ट्रक्चर देऊ शकत नाही,

..2..

18-07-2007 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) 3J.1

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.5......... डॉ.दीपक सावंत.........

ज्यावर आय.एम.सी.ची मान्यता अवलंबून असते. महाराष्ट्र शासनाने काही कोर्सेस रेकग्नाईज केलेले नाहीत ही गोष्ट खरी आहे. प्रॉस्पेक्ट्सचा हवाला देऊन त्यामध्ये कोर्स रेकग्नाईज आहे की नाही हे नमूद केल्याचे मंत्रीमहोदय सांगत आहेत. हे महाराष्ट्राला भूषणावह आहे का? मंत्रीमहोदय याचे समर्थन करीत आहेत. हे कोर्स बंद का केले जात नाहीत? लोकांची दिशाभूल का केली जात आहे? आपल्याकडे स्टाफ नाही. इक्वीपमेंट्स नाहीत. गेल्या वर्षी हाच प्रश्न उपस्थित केला होता. त्यावेळी सांगण्यात आले होते की, सर्व कोर्सेस रेकग्नाईज होतील. परंतु 1994 पासून आजपर्यंत रेकग्नाईज झालेले नाहीत.

(नंतर श्री.जुन्नरे....

अस्ुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

सभापती महोदय, वैद्यकीय शिक्षणाने लोकांच्या आरोग्याशी खेळावे असे दिवस नाहीत. जो मुलगा एमबीबीएस किंवा डीजीओची डिग्री घेऊन बाहेर जाणार आणि त्याला तुम्ही सांगणार की, तू रेकगनाईज नाही म्हणून. ज्यावेळी आपला मुलगा डॉक्टर होऊन बाहेर आला आणि तो रेकगनाईज नाही असे समजल्यावर त्याच्या आई-वडिलांची काय परिस्थिती होईल याचा कधी आपण विचार केलेला आहे काय? ही जी परिस्थिती आहे ती महाराष्ट्र शासनाला भुषणावह आहे काय?

श्री. सुरेश शेट्टी : या ठिकाणी सन्माननीय डॉ. दीपक सावंत यांनी जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे. या सदनात उभे राहून सांगतो की, हे कोर्सेस रेकगनाईज नाहीत अशा प्रकारे सांगणे मला शोभादायक नाही. गेल्या अधिवेशनामध्ये सुध्दा अशाच प्रकारची लक्षवेधी सूचना सभागृहापुढे चर्चेला आली होती तेव्हा सुध्दा मी सांगितले होते की, ही बाब ठीक नाही. आता आपण परिस्थिती बदलण्याचा प्रयत्न करीत आहोत. कित्येक वर्षापासून हीच परिस्थिती सुरु आहे. आता आपण नवीन बिल्डिंग बांधण्याचा कार्यक्रम आयजीएमसीमध्ये हाती घेतलेला आहे. ही बिल्डिंग लवकरात लवकर म्हणजे 3 वर्षात बांधून पूर्ण होईल. इन्फ्रास्ट्रक्चरची जी डिफिशिअन्सी आहे त्यामध्ये टोटल नवीन हॉस्पिटल तयार करण्याचा प्रयत्न करीत आहोत. नॉन रेकगनाईजचा जो प्रश्न आहे तो महाराष्ट्रातच आहे असे नसून कर्नाटक, आंध्र, तामिळनाडू येथे सुध्दा हेच प्रश्न आहेत. कारण 1992 च्या अगोदर रेकग्नाईजचे जी प्रोसेस होती त्यामध्ये प्रत्येक कॉलेज युनिर्व्हसिटीमध्ये ॲप्लीकेशन करावयाचे आणि कोर्सेस स्टार्ट करण्यासाठी युनिर्व्हसिटी परवानगी देत असे व नंतर एमसीआयचे लोक येत असत आणि .....

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सागर मेघे यांचे कॉलेज हे डीम्ड युनिर्व्हसिटीचे आहे. जर ते अशा प्रकारचे कोर्सेस सुरु करु शकतात तर महाराष्ट्र शासनासारखे सबळ शासन असे का करु शकत नाहीत? महाराष्ट्र शासनाला काय पैशांची अडचण आहे काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

....2

श्री. सुरेश शेट्टी : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सागर मेघे साहेबांना विधानसभेत किंवा विधानपरिषदेत उत्तरे द्यावे लागत नाही. ते आपले कन्सल्टंट नेमतात. जे कन्सल्टंट एकदम कॉम्पीटेंट आहेत त्यांना दिल्लीमध्ये नेमले जाते व त्यांच्याकडून काम करुन घेतले जाते. ते जे काम करतात ते काम आम्ही येथे करु शकत नाहीत. आम्हाला प्रोसिजर फॉलो करुनच काम करावे लागते.

---------------

...3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : कापूस उत्पादक शेतक-यांना सातबाराच्या उता-यावरील नोंदी ऐवजी उपग्रह सर्वेक्षणाद्वारे क्षेत्र ग्राहय धरण्याच्या निर्णयामुळे शेतकरी मदतीपासून वंचित होणे.

**मु. शी.** :कापूस उत्पादक शेतक-यांना सातबाराच्या उता-यावरील नोंदी ऐवजी उपग्रह सर्वेक्षणाद्वारे क्षेत्र ग्राह्य धरण्याच्या निर्णयामुळे शेतकरी मदतीपासून वंचित होणे यासंबंधी सर्वश्री पांडुरंग फुंडकर, नितीन गडकरी, पाशा पटेल, शरद पाटील, जयंत पाटील, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. पांडुरंग फुंडकर ( विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील कापूस उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक सहाय्य करण्यासाठी सातबाराच्या उताऱ्यावरील नोंदीऐवजी उपग्रह सर्वेक्षणाद्वारे आढळलेले लागवडीखालील क्षेत्र ग्राह्य धरण्याचा निर्णय शासनाने घेणे तथापि कापूस उत्पादकांना प्रति हेक्टरी दीड हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्याच्या निर्णयानुसार उपग्रहाद्वारे केलेल्या पहाणीत कापसाचे क्षेत्र 27.29 लाख हेक्टर आढळणे तर महसूल खात्याने केलेल्या पहाणीत हेच क्षेत्र अडीच लाख हेक्टरने जास्त आढळणे, त्यामुळे मदत देताना ती कोणत्या पहाणीनुसार द्यावी याबाबत निर्माण झालेली साशंकता, शासकीय अधिकाऱ्यांमध्येच याबाबत असलेली मतभिन्नता, त्यामुळे शेतकरी मदतीपासून वंचित होणे, ऐन खरीपाच्या हंगामात ही मदत न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांत पसरलेली तीव्र नाराजी, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने याप्रकरणी त्वरित कार्यवाही करण्याची आवश्यकता व याबाबतची शासनाची प्रतिक्रिया."

श्री. राणा जगजितसिंह पाटील ( कृषी राज्यमंत्री ): सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...4



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, डिसेंबरच्या नागपूर अधिवेशनामध्ये महाराष्ट्रातील कापूस उत्पादक शेतक-यांसाठी एक विशेष बाब म्हणून शेतक-याला हेक्टरी किमान 1500 रुपये आणि कमीतकमी 2 हेक्टरच्या मर्यादेपर्यंत म्हणजे 3000 रुपये विशेष आर्थिक सहाय्य देण्याची घोषणा करण्यात आली होती. आता जुलै महिना उजाडून ऑगस्ट महिना येतो आहे परंतु अजूनपर्यंत अनेक शेतक-यांना ही मदत मिळालेली नाही. या ठिकाणी उत्तर देतांना असे सांगितले आहे की, 4 जानेवारी, 2007 या दिवशी प्रशासकीय मान्यता दिली आणि हा निधी महाराष्ट्र रिमोट सेन्सींग ॲप्लीकेशन, नागपूर यांच्या अहवालानुसार कापूस पिकाखालील 27.29 लाख हेक्टर क्षेत्र विचारात घेऊन आर्थिक सहाय्य देण्याच्या सूचना देण्यात आल्या. कापसाचे क्षेत्र हे सॅटेलाईटने नक्की करावयाचे, खरे म्हणजे शेतक-याला नुकसानभरपाई द्यावयाची असते ती सात-बाराच्या उता-या प्रमाणे महसूल विभाग सर्व्हे करुन त्या प्रमाणे अनुदान दिले जात होते. आता महाराष्ट्र शासनाने सॅटेलाईट सर्व्हे करुन कापूस उत्पादकाला अनुदान देण्याचा निर्णय घेतला परंतु त्यामुळे असे झाले आहे की, सात-बाराच्या उता-या प्रमाणे 2.5 लाख हेक्टर क्षेत्र आले आणि सॅटेलाईट प्रमाणे 27.29 लाख हेक्टर एवढे क्षेत्र आले. म्हणजे क्षेत्रामध्ये तफावत आलेली आहे. ही जी तफावत आलेली आहे त्याला जबाबदार कोण आहे? तुम्ही अनुदान देतांना महसूल विभागाच्या सातबाराला ग्राह्य धरणार आहात की, सॅटेलाईट सर्व्हेला ग्राह्य धरणार आहात? औरंगाबाद, बुलढाणा, अकोला, वाशिम, अमरावती, वर्धा या पाच जिल्हयातील शेतक-यांना अजून पर्यंत मदत मिळालेली नाही. आपण 500 कोटी रुपये उपलब्ध करुन दिले आहेत परंतु अजूनपर्यंत 90-92 कोटी रुपयांची मदत शेतक-यांपर्यंत गेलेली नाही. आता दोन-तीन महिन्यात नवीन कापूस बाजारात विक्रीसाठी येणार आहे. अनुदान दिले जाईल अशी घोषणा महाराष्ट्र शासन करते परंतु 6-6 महिने होऊन गेले तरी शेतक-यांना अनुदान दिले जात नाही. त्यामुळे माझा स्पेसिफिक प्रश्न आहे की, सातबाराच्या महसूल विभागाच्या सर्व्हे प्रमाणे पैसे देणार आहात की, सॅटेलाईट सर्व्हे प्रमाणे पैसें देणार आहात?

यानंतर श्री. अजित.......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर.........

सभापती महोदय, निवेदनात म्हटले आहे की, "दिनांक 10 जुलै, 2007 रोजी एक बैठक आयोजित करण्यात आली होती, सदर बैठकीत ज्या तालुक्यात फरक जास्त आहे, त्या तालुक्यातील पाच गावे रॅन्डम पध्दतीने निवडून त्याची पडताळणी करण्यासाठी एमआरएसएसी, नागपूर यांच्याकडे पाठविण्याचे ठरले आहे." मला मंत्रिमहोदयांना प्रश्न विचारावयाचा आहे की, आपण कशा पध्दतीने सर्व्हे करणार आहात ? सात जिल्ह्यांचे वाटप सात-बारा उताऱ्याप्रमाणे करणार आहात काय ? नसल्यास ही जी तफावत आढळून आलेली आहे त्यास कोण जबाबदार आहे ? रॅन्डम पध्दतीची कार्यवाही केव्हा सुरु करणार आहात ? या संदर्भात डिसेंबर महिन्यात निर्णय झाला असताना दिनांक 10 जुलै 2007 रोजी बैठक घेतलेली आहे. तेव्हा माझा मंत्रिमहोदयांना प्रश्न आहे की, शेतकऱ्यांना किती दिवसांत पैसे देणार आहात ?

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, कापूस उत्पादन 26 जिल्ह्यांमध्ये झालेले आहे. त्यापैकी चार जिल्हे वगळता इतर सर्व जिल्ह्यांमध्ये मदतीचे वाटप सुरु करण्यास काही अडचण नाही. त्याप्रमाणे सात-आठ जिल्ह्यांमध्ये वाटप झालेले आहे. एकूण 409 कोटीपैकी 10 कोटी 28 लाख रुपयांचे वाटप करण्यात आलेले आहे. सॅटेलाईट इमेजरद्वारा माहिती गोळा करण्यात आलेली आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, 500 कोटी मधून 409 कोटी रुपयांचे जिल्हानिहाय वाटप झालेले आहे, त्यातील फक्त 10 कोटी रुपयांचे वाटप शेतकऱ्यांना झालेले आहे.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, 2005-06 मध्ये सर्व्हे करण्याचे आदेश देण्यात आले होते. त्यावेळेस शेतकऱ्यांना हेक्टरी हजार रुपये मदत देण्याचे ठरविले होते. त्यावेळी राज्यात 35 लाख हेक्टर कापसाचे क्षेत्र असल्याचे आढळले होते. प्रत्यक्षात इतके क्षेत्र नव्हते. सात-बाराची नोंद आणि प्रत्यक्षात कापसाची लागवड यामध्ये तफावत होती. तसेच वित्त विभागाने पैसे देताना रायडर टाकले होते की, सॅटेलाईट इमेजरद्वारा पिकांचे फोटो काढण्यात यावे, त्यामुळे

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राणा जगजितसिंह पाटील..........

किती क्षेत्रात कापसाची लागवड झालेली आहे हे समजेल आणि त्याप्रमाणे पैशाचे वितरण करावे. दहा टक्के पर्यंत तफावत आल्यास ती ग्राह्य मानून वितरण सुरु ठेवायचे असे ठरविण्यात आले होते. खातेदारांचे क्षेत्र, त्यांच्या याद्या करण्यास वेळ लागला हे मान्य करावे लागेल, परंतु ही प्रक्रिया सुरु आहे. फक्त अमरावती, बुलढाणा, वाशिम आणि अकोला या चार जिल्ह्यांमध्ये तफावत दिसून आली. या जिल्ह्यांमध्ये सात-बारा उताऱ्याप्रमाणे आलेले क्षेत्र आणि सॅटेलाईट इमेजरद्वारा आलेले क्षेत्र यामध्ये 20 टक्केपासून 90 टक्केपर्यंत फरक दिसून आलेला आहे. त्यामुळे सात-बारा उताऱ्यावरील नोंदीनुसार डोळे झाकून पैसे देणे योग्य वाटत नाही. म्हणून शासनाने महाराष्ट्र रिमोट सेन्सिग ॲप्लीकेशन सेंटरकडे हे काम दिलेले आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सात-बाराच्या उताऱ्यावर तलाठी, तहसिलदार, नोंदी करतात. शेतकरी स्वत: नोंदी करीत नाहीत. महसूल विभागामार्फत पिकांची पाहणी केली जाते त्यानंतरच सात-बारा उताऱ्यावर नोंद केली जाते आणि ते शासनाचे अधिकारी असतात. तेव्हा सात-बारा उताऱ्यावरील नोंदी ग्राह्य धरण्यात याव्यात.

श्री.राणा जगजितसिंह पाटील : सभापती महोदय, महत्वाची गोष्ट म्हणजे सॅटेलाईट इमेजरमार्फत सर्व्हे केल्यामुळे आपणास संपूर्ण डिटेल्स मिळतात. एकेका गटाची सविस्तर माहिती मिळते. आपणास सविस्तर माहिती मिळत असताना डोळे झाकून पैशाचे वाटप केल्यास जादा 3 लाख हेक्टर क्षेत्रासाठी एकूण 45 कोटी रुपयांचे वाटप आपणास करावे लागेल अशी परिस्थिती आहे.

यानंतर श्री.पुरी...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.उल्हास पवार )**

श्री.राणा जगजितसिंह पाटील .....
तेव्हा मी पुन्हा क्लिअर करतो की, यामध्ये बुलढाणा, अकोला, वाशिम व अमरावती हे चार जिल्हे आहेत. बुलढाण्यामध्ये 50 टक्के जास्त क्षेत्र दिसून येत आहे, अकोल्यामध्ये 30 टक्के, वाशिममध्ये 90 टक्के आणि अमरावतीमध्ये 20 टक्क्यांची तफावत दिसून येत आहे. नागपूरच्या सेंटरने आम्हाला सांगिले आहे की, आपण आम्हास 7/12 चे डिटेल्स् दिल्यानंतर 10 दिवसामध्ये आम्ही यासंबंधीचे डिटेल्स् उपलब्ध करुन देऊ. याठिकाणी रॅण्डम चेक हा शब्द वापरणे बरोबर नाही. परंतु यामध्ये सुरुवातीस आपण एक-दोन तालुके देत आहोत. यामध्ये आपण खामगांव हा तालुका देत आहोत. ते आपल्याला 10 दिवसात रिपोर्ट देणार आहेत.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांच्या निवेदनातून अत्यंत मुलभूत प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यांच्या निवेदनाचा अर्थ असा आहे की, हे सॅटेलाईट चित्र असून ते निश्चितपणे बरोबर असलेच पाहिजे. याठिकाणी 90 टक्के आणि 50 टक्के फरक येत आहे. याचाच अर्थ यामध्ये महसूल विभागाचे अधिकारी मुद्दाम आणि जाणीवपूर्वक अशा उताऱ्यांवर नोंदी घेत आहेत, असा त्याचा अर्थ होतो. सभापती महोदय, मी थोडासा मागे जातो. सभागृहामध्ये दिलेल्या 2 आश्वासनांचे अजून काय झाले त्याचे उत्तर आम्हाला मिळालेले नाही. त्यामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येविषयी सदनामध्ये आश्वासन दिले गेले होते, त्याची पूर्तता अजूनही होत नाही. यासाठी आपण कुठे तरी प्रायॉरिटी दिली पाहिजे. कापसाच्या संदर्भात मोठया प्रमाणात भ्रष्टाचार झाला होता, त्यासंबंधी आम्ही दोन वर्षापूर्वी सदनामध्ये प्रश्न उपस्थित करुन चर्चा उपस्थित केली होती. त्यावेळी आम्ही पणन मंत्र्यांच्या हे लक्षात आणून दिले होते की, व्यापारी कास्तकरांचा कापूस मोठयाप्रमाणात खरेदी करुन पणन महामंडळाला देतात व मोठयाप्रमाणात पैसा उकळतात व त्याचा परिणाम शेतकऱ्यांच्या आत्महत्या होण्यावर होतो. त्यावेळी झालेल्या अटीतटीच्या चर्चेच्यावेळी माननीय पणन मंत्र्यांनी सदनाला जाहीरपणे सांगितले होते की, 100 क्विंटल पेक्षा जास्त कापूस पणन मंडळाकडे ज्यांचा कोणाचा आला असेल त्यांची यादी पटलावर ठेवण्यात येईल व त्यांची चौकशी करण्यात येईल. तसेच, ज्यांनी अशाप्रकारे पेरा

..2....



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

न करता पणन मंडळाला फसवले असेल तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात येईल. त्यावेळी माननीय पणन मंत्र्यांच्या अशा समर्पक उत्तराने आमचे समाधान झाले. त्यावेळी आम्हाला असे वाटले की, हे सचोटीचे सरकार आहे, शेतकऱ्यांच्या आत्महत्या थांबवण्याची त्यांची इच्छा दिसत आहे, शेतकऱ्यांच्या समस्या त्यांना कळलेल्या आहेत, परंतु पुढे तसे काहीही झालेले नाही. पुन्हा गेल्या अधिवेशनात याबाबत मी पणन मंत्र्यांना विचारले की, आपण दिलेल्या शब्दाचे, आश्वासनाचे काय झ ाले ? त्यावेळी त्यांनी हा विषय केवळ हसण्यावर नेला.

सभापती महोदय, खामगांव तालुक्यात मोठया प्रमाणात सावकारीची प्रकरणे झालेली आहेत. याबाबतीत सुमोटो केसेस दाखल झालेल्या आहेत. त्यांच्यावर 80-82 गुन्हे दाखल झालेले आहेत, परंतु याबाबतीत त्यांना अटक करण्यास आपण का कचरत आहात, हे आम्हाला कळत नाही. याठिकाणी माननीय फुंडकर साहेबांनी सांगितले की, खामगांव तालुक्यात 50 टक्के पेरा हा बोगस झ ालेला आहे. हा माननीय फुंडकर साहेबांचा तालुका आहे. या 4 जिल्हयांमध्ये आणखी दोन जिल्हे समाविष्ट केले तर या सहा जिल्हयांमध्ये आत्महत्याग्रस्त शेतकरी बरेच आहेत. याबाबतीत केंद्र सरकारने व राज्य सरकारने पॅकेज दिले. याठिकाणी ऊसाच्या बाबतीत माननीय मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली, त्याबाबतीत मला माननीय राज्यपालांना पत्र लिहावे लागले. ज्यांचे 7/12 वर पेरे असतील त्यांना नुकसान भरपाई देऊ, असे शासनाने जाहीर केले.

नंतर श्री.रोझेकर...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते........

आता ऊस उभा आहे, तो जाळा म्हणून सरकार सांगते आहे, तो विषय नंतर येईल. या ठिकाणी सॅटेलाईटव्दारा जे समोर आले आहे ते पहाता महसूल यंत्रणा कोणत्या प्रकारचे काम करते आहे, हा माझा महत्वाचा मुद्दा आहे. यासंदर्भात मला खूप काही सांगता येईल. सॅटेलाईटव्दारा त्या तालुक्याचे नकाशे प्राप्त झाल्यानंतर अशा प्रकारे सात-बारा उता-यावर वेगळया माध्यमातून नोंदी धेऊन पणन मंडळाला आणि शासनाच्या तिजोरीला लुटण्याचे प्रकार झाले आहेत, अयोग्य नोंदी घेतल्या गेल्या आहेत, असे जर निष्पन्न झाले तर संबंधितांवर निश्चित कारवाई झाली पाहिजे. अशी कारवाई करण्याची क्षमता शासनामध्ये आहे काय आणि असेल तर तशा प्रकारची कारवाई शासन करणार काय ? दहा दिवसात सॅटेलाईटचा रिपोर्ट येणार आहे, हे अधिवेशन संपण्यापूर्वीच येणार आहे. ही एक चांगली बाब आहे, हा अहवाल निश्चितच बाहेर आला पाहिजे. अमरावती येथे 90 टक्के क्षेत्राचा फरक आहे, असे मंत्रीमहोदय सांगत असतील तर ते अत्यंत गंभीर आहे. आमची अशी मागणी आहे की, हे सर्व करीत असतांनाच गेल्या पाच वर्षामध्ये प्रत्येक जिल्हयामधील कापसाची खरेदी कशा पद्धतीने झाली, नक्की काय झाले, याचीही छाननी करा. असे केले तर या माध्यमातून तुम्हाला व्यापारी, सावकार, बोगस नोंदणी घेणारी महसूल यंत्रणा यांचीही माहिती मिळू शकेल. ही माहिती मिळाल्यानंतर शासन त्यांच्यावर कारवाई करणार काय ? ही कारवाई करण्याचे जर संबंधित मंत्र्यांनी नाकारले तर सरकार कारवाई करणार काय ? हा महत्वाचा मुद्दा मी या ठिकाणी मांडतो आहे कारण या सदनात यापूर्वी असे उत्तर दिले गेले आहे आणि नंतर प्रत्यक्षात लिहिले गेले की, आवश्यकता नाही, माझ्याकडे त्याच्या छायाप्रती आहेत. म्हणून या सर्व बाबींचा खोलात जाऊन शासन शोध घेणार काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, ही वस्तुस्थिती आहे की, सन 2005-2006 मध्ये एक हजार रुपये याप्रमाणे अनुदान वाटप करण्याचा निर्णय घेतला गेला. त्यावेळी साधारणत: 29 लाख हेक्टर कापसाच्या क्षेत्रासाठी वाटप करण्याचे ठरविण्यात आले होते. जवळ जवळ 271 कोटी रुपयांचा नियतव्यय त्यासाठी देण्यात आला होता. नंतर 55 कोटी रुपयांची जादा मागणी करण्यात आली. आता अनुदान वाटप करावयाच्या क्षेत्रात मोठी वाढ म्हणजे जवळ जवळ 35 लाख हेक्टरपर्यन्त वाढ दिसते आहे. त्यानंतर ज्यावेळी पंधराशे रुपये अनुदान देण्याचा निर्णय घेण्यात

..2.........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.बाळासाहेब थोरात.........

आला त्यावेळी नियोजन विभागाने रिमोट सेंसिंग पद्धतीने क्षेत्र काढून वाटप करण्यात यावे, अशा प्रकारची अट घातली. यानुसार चार जिल्हयांमध्ये मोठी तफावत आढळून आली. या चार जिल्हयातील दहा खेडी ही निरिक्षणासाठी ठरविण्यात आली आहेत. यासाठी एक महिन्याची मुदत त्यांनी मागितली आहे. काही दिवस गट निश्चित करण्यासाठी लागतील. या निमित्ताने मी सांगू इच्छितो की, कृषि विभागाची सांख्यिकी शाखा गट निश्चित करीत असते, 7/12 उता-यावर महसूल विभागाकडून नोंदी घेतल्या जातात आणि आता तिसरी पद्धत रिमोट सेंसिंगची आली आहे.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, हे का घडत असेल याचा विचार केला तर असे लक्षात येईल की, आपल्याकडे दिला जाणारा कापसाचा भाव लक्षात घेऊन परप्रांतातील कापूस आणला जातो, त्यामुळे ही तफावत आहे.

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, या सर्व पद्धतींमध्ये कोणते दोष आहेत, ते कशा पद्धतीने दूर करावेत, यासंबंधी आपल्याला विचार करावयाचा आहे. रिमोट सेंसिंगचा आपण यापूर्वी उपयोग करीत नव्हतो. आता त्याचा उपयोग करीत असतांना त्यामध्ये कोणतेही दोष राहू नयेत, असा प्रयत्न सुरु आहे. अनेक कारणांनी ही आकडेवारी नियोजनाकरिता महत्वाची असते. जुना अनुभव लक्षात घेऊन या तिन्ही सिस्टिम्स दुरुस्त कराव्यात, असा प्रयत्न आहे. यासाठी काही कालावधी लागणार आहे. आता आपण दहा खेडी रॅण्डमली सिलेक्ट केली आहेत. जर जादा क्षेत्र लावले गेले आहे असे या पहाणीतून दिसून आले तर आपण म्हणता त्याप्रमाणे महसूल विभागाच्या अधिका-यांवर कारवाई करण्याचा सुद्धा निर्णय आम्ही घेत आहोत. हा सिस्टिम दुरुस्त करण्याचा भाग आहे. हा आमचा निर्णय आहे. त्या ठिकाणी कुणी चुकीचे वागले असेल, नोंदणी चुकीची झाली असेल तर निश्चित कारवाई करण्याचा निर्णय घेऊ. फार वेळ न लागता प्रत्यक्ष शेतक-यापर्यन्त मदत पोहोचली पाहिजे याकरिता कृषि विभाग आणि शासन प्रयत्नशील आहे.

यानंतर श्री.बोरले..........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धोंडीराम राठोड : सभापती महोदय, बोगस उतारे तयार करणा-या अधिका-यावर कठोर कारवाई करण्याचे आश्वासन माननीय मंत्री महोदयांनी दिलेले आहे. माझा प्रश्न असा आहे की, उपग्रह आधारीत माहिती आणि महसूल विभागाच्या 7/12 उता-यावरील नोंदीमधील माहिती यामधील फरक आपल्या लक्षात कधी आला आणि त्यासंदर्भात निर्णय घेण्यास एवढा वेळ का लागला ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, मागील मदत वाटपाच्या वेळी अशी शंका आली होती की, चुकीच्या नोंदी होत आहेत. त्यामुळे उपग्रह आधारीत माहिती घेण्याचा निर्णय घेण्यात आला. वास्तविक कापसाचे क्षेत्र किती होते, हे जाणून घेण्यासाठी वेळ लागला. या व्यतिरिक्त 7/12 च्या नोंदीची यादी देण्यात यावी, असे जिल्हाधिका-यांना सांगण्यात आले होते. त्यामध्ये वेळ लागला. परंतु दोन्ही प्रकारच्या माहितीमध्ये तफावत आढळून आलेली आहे. पुढच्या कालखंडामध्ये संपूर्ण सिस्टीम निर्दोष करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, दिनांक 7 जून, 2007 रोजी 409 कोटी रुपये वाटपासाठी उपलब्ध करुन देण्यात आले होते. जून महिन्यामध्ये निधी उपलब्ध करुन देण्यात आला होता. 409 कोटी रुपयांपैकी मागच्या महिन्यात 10 कोटी रुपयांचे वाटप झाल्याचे माननीय मंत्री महोदयांनी सांगितले. उर्वरित निधीचे वाटप केव्हा होणार आहे. शेतक-यांना वेळेवर मदत न मिळाल्यामुळे त्यांना पेरणी करण्यासाठी कर्ज काढावे लागले. काही बँकांनी शेतक-यांना कर्ज सुध्दा दिलेले नाही. त्यामुळे शेतकरी अडचणीत आलेले आहेत. म्हणून आपण उर्वरित निधीचे वाटप केव्हा करणार आहात ?

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, जेथे तफावत नाही तेथे या महिन्यामध्ये निधीचे वाटप पूर्ण करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, निधीचे वाटप निश्चितपणे किती दिवसात करण्यात येईल ?

श्री.बाळासाहेब थोरात : जेथे तफावत नाही तेथे 15 दिवसात निधीचे वाटप करण्यात येईल.

--------

..2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: विधानमंडळ सदस्यांचे निवृत्ती वेतन (सुधारणा) विधेयक.

**L.C. BILL No. III OF 2007.**
**(A BILL FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA LEGISLATURE MEMBERS' PENSION ACT, 1976.)**

डॉ.सुनील देशमुख (वित्त राज्यमंत्री) : सभापती महोदय, सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक 3-महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे निवृत्ती वेतन अधिनियम, 1976 यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी विधेयक मांडण्यासाठी मी सभागृहाची अनुमती मागतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**तालिका सभापती** : अनुमती देण्यात आली आहे.

डॉ.सुनील देशमुख : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने सन 2007 चे वि.प.वि.क्रमांक 3 मांडतो.

**तालिका सभापती** : विधेयक मांडण्यात आले आहे.

--------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मधुकर चव्हाण : सभापती महोदय, आजच्या कामकाज पत्रिकेवर दोन अर्धा तास चर्चा दाखविण्यात आलेल्या आहेत. त्या अर्धा तास चर्चा व विशेष उल्लेख कधी घेण्यात येतील ?

**तालिका सभापती** : विशेष उल्लेख उद्या घेण्यात येतील. उद्याच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये चार अर्धा तास चर्चा आहेत. आजच्या दोन अर्धा तास चर्चा आणि उद्याच्या चार अर्धा तास चर्चा अशा एकूण सहा अर्धा तास चर्चा उद्या घेण्यात येतील.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या गुरुवार दिनांक 19 जुलै, 2007 रोजी दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 6 वाजून 19 मिनिटांनी गुरुवार दिनांक 19 जुलै, 2007 च्या दुपारी 12.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही